REGISTERED NO. 6, 1877.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ११ अकोला, रविवार ता० ७ माहे अक्टोबर सन १८७७ इ० अंक ४०

## वऱ्हाडसमाचाराची किंमत

| | रुपये |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ६ |
| साल अखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डाकहाशील | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊ इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरु केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, १० ओळींचे आंत | १ |
| १० ओळीपुढें दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## जाहिराती.

### नादारी प्रकरणीं नियम.

(वऱ्हाडाकरितां नवीन तयार झालेले.)

मे० जुडिशियल कमिशनर साहेब मुलूख अमानी हैदराबाद यांणीं नादारी संबंधी मागील नियमांत फेरफार करून नुकतेंच एक पुस्तक छापून प्रसिध्ध केलें. त्याच्या कांहीं प्रति विक्रीसाठीं आह्माकडे तयार आहेत. किंमत आठ आणे पडेल. बाहेर गावचे घेणारास एक आणा डाक हाशील पडेल.

वऱ्हाडसमाचाराचे
मालक.

कार उपयोगी व फारच स्वस्त ग्रंथ. सोमवार तारीख १९ आक्टोबर १८७७ रोजीं विक्रीस तयार होईल.

### नवीन मराठी सिव्हिल प्रोसीजर कोड,

(ह्मणजे सन १८७७ चा आक्ट १० वा.)

विशेष समजुतीच्या खुलासे ?र टिपा व इंडेक्स सुद्धा.

सदरील कायद्याचें भाषांतर नुकतेंच प्रसिद्ध झालें आहे. हें भाषांतर प्रसिद्ध होण्यास इतकी दीनावधी लागली व तो लवकरच अमलांत येणार आहे. तरी हरत ऱ्हेचे परिश्रम करून, हा कायदा अमलांत येण्याचे वेळेवर लोकांस उपलब्ध व्हावा अशी तजवीज केली आहे. या कायद्यांतील प्रत्येक अवघड कलमावर खुलासेवार मजकूर लक्षांत येण्यासारख्या समजुतीच्या टीपा, तसेंच पूर्वीच्या कलमांवर हावाले वगैरे दिले आहेत. ग्रंथ समजुतीस व चालनास सुलभ व्हावा यासाठीं प्रथम, कलमांचे विल्हेवार विवेचन केलें आहे. तसेंच हा कायदा पसार करण्याचीं कारणें, व याचे हेतु हे प्रथम थोडक्यांत दाखविले आहेत. एकंदरींत हा ग्रंथ जितका सुलभ व सोईचा होईल तितका केला आहे.

उत्तम टाईपानें व जाड कागदावर हा ग्रंथ ता० १९ आक्टोबर रोजीं छापून तयार होईल. राहिलेला आल्प काळ तसेच ह्या कामास लागणारी मेहनत यांचे मानानें याची किंमत थोडी ह्मणजे ता० १ आक्टोबरपर्यंत पैसे भरणारांस २ रु० व मागाहून घेणारांस २॥ रुपये ठेविली आहे. याच पुस्तकांत सन १८७७ चा १ ला विशेष न्यायाचा कायदा सामील केला आहे.

विशेष सूचना.—ह्या ग्रंथाच्या प्रती आह्मी थोड्या काढणार आहों त्या अर्थी मागाहून लोकांस अडचण न पडावी या करितां लोकांनीं पैसे भरण्याची त्वरा करावी. पैसे भरणें ते ज्ञानचक्षूचे मालक भाऊ गोविंद सापकर यांजकडे अगर किरण छापखान्याचे मालक महादेव बल्लाळ नामजोशी, अथवा मुंबईंत पुरुषोत्तम गोविंद नाडकर्णी, यांजकडे किंवा आह्माकडे पाठवावे. तिकिटें पाठविणें झाल्यास वर्ताळ्यासकट पाठवावीं. नाटपेड पत्र घेतलें जाणार नाहीं. व पैसे आल्याखेरीज पुस्तकही रवाना होणार नाहीं. कळावे ता. १२ सप्तंबर सन १८७७ इसवी.

नारायण बापूजी कानिटकर,
वकील डि. को. पुणें.

## जाहिरात.

### प्रश्नसमुदाय पृथःकरण.

विक्रीस तयार.

या पुस्तकाची चौथी आवृत्ति छापून तयार झाली आहे. यांत केरोकृत अंकगणितांतील शेवटील प्रश्नसमुदायाचें पृथःकरण असून आणखी विमाकमीशन, ठेव, क्षेत्रफळ, घनफळ यांचेंही पृथःकरण करून यास जोडिलें आहे. किंमत आक्टोबर अखेर घेणारास ६ आणे पडेल; आणि पुढें घेणारांस ८ आणे पडतील. टपालांतून मागविणारास १ आणा बंगीखर्च पडेल. पुस्तकें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत अथवा खालील पत्यावर मिळतील. रुपयाच्या तिकिटांस वर्ताळा पडेल. नाटपेड पत्र घेतलें जाणार नाहीं.
तारीख १८ माहे सेपटेंबर.
सन १८७७ इसवी.

नारो रघुनाथ मोहोळकर
मास्तर ट्रेनिंग कॉलेज मराठी
भाग अकोला प्रांतवऱ्हाड.

### सन १८७८ सालाकरितां रोजनिशी.

सन १८७८ सालाकरितां रोजनिशीचा सांचा पूर्वीं पेक्षां सवाईनें जास्त वाढविला असून बरीच जास्त सुधारणा केली आहे. हें पुस्तक येते नोवेंबरच्या २९ वे तारखेस छापून तयार होईल. यांत सरसालचे दीनचर्येसंबंधी मराठी तिथी, वार, महिने व इंग्रजी तारखा, महिने, सूर्योदय, सूर्यास्त वगैरेची माहिती दिली जाईल; शिवाय सरसालांत येणारे विशेष उपवास, ग्रहणें, सण व त्या संबंधें सरकारी हापिसांस असणाऱ्या सुट्या वगैरेचीही माहिती दिली जाईल. हिंदु शास्त्राप्रमाणें मौंजी, विवाहाचे मुहूर्त, तसेच मुसलमानी महिने, तारखा, सण इत्यादिकांचा समावेशही या पुस्तकांत होईल. रेल्वे, तारायंत्र, स्टांप, मनीआरडर्स, पोस्ट, इत्यादि अनेक नेहमीं जरूर लागणारे उपयुक्त विषयांची अवश्य तितकी माहिती दिली जाईल. २० रुपये पर्यंत दरमहा रोजमुरा चुकविण्याविषयीं माहिती मिळेल. स्मरणार्थ टिपणें करण्यांत समयविशेषीं जास्त मजकूर लिहिण्याची पाळी आली तर तो लिहिण्याकरितां पुस्तकाच्या अखेरीस कोरीं पृष्ठेंही बरींच जोडलीं जातील.

या खेपेस अशी एक विशेष सुधारणा करण्यांत आली आहे कीं, इंग्रजींतही महिना, तारीख, वार दिला असून महिन्याची प्रत्येक तारीख, वार, तीथ वगैरे संक्षेपानें न देतां पूर्णपणें लिहिलीं आहेत व रवि उदयअस्ताचें कोष्टक तारीखवार निराळेंच दिलें आहे. इंग्रजी महिना, तारीख निराळी इंग्रजींतच घातल्यामुळें ज्यांस मराठी समजत नाहीं अशा गृहस्थांसही या रोजनिशीचा बराच उपयोग होणार आहे; व प्रत्येक तारीख महिना संक्षिप्त अक्षरानीं लिहिल्यामुळें त्याची बराबर समजूत होत नाहीं अशी जी तक्रार होती ती ही या व्यवस्थेपासून दूर होणार आहे. सन १८७९ सालचे महिनेवार तारखांचे एकंदर कोष्टक इंग्रजींत व मराठींत रंगीबेरंगी तयार करून जोडलें जाईल. हरएक प्रकारची होईल तितकी जास्त सुधारणा करण्यांत येईल.

याची किंमत अक्टोबर अखेरपर्यंत अगाऊ भरणारांस दरप्रतीस सहा आणे पडेल व डांक हाशिलाबद्दल दर प्रतीस किमती खेरीज १ आणा जास्त पाठवावा लागेल. एकदम १० प्रती घेणारांस डांक हाशील पडणार नाहीं.

भाऊ गोविंद सापकर
ज्ञानचक्षूचे मालक

### मनोरमा नाटक.

आह्मी पूर्वीं जाहिरात दिल्याप्रमाणें हें पुस्तक ठसे छापावर छापून तयार आहे. ह्या पुस्तकाचा सांचा पाकीट डिकसनरी सारखा आहे. त्याची किंमत १॥ रुपया व बंगीखर्च २ आणे एकंदर १॥= एक रुपया दहा आणे आह्माकडे पाठविले असतां पुस्तक रवाना करण्यांत येईल.

भाऊ गोविंद सापकर,
ज्ञानचक्षूचे मालक

### नवा दिवाणी कायदा.

अरुणोदयांत छापत असलेला नवा दिवाणी कायदा विक्रीस तयार झाला. वर्गणीदारांकडे बुकें तारीख २९ रोजीं रवाना झालीं. यांत १८७७ चे पहिला, तिसरा, व दहावा, हे तीन आक्ट दाखल केले असून हीं बुकें घेणारांस याच किमतींत १८७७ चा अक्ट १९ (मुदतीचा) मागाहून दिला जाईल. मात्र त्याबद्दल टपाल व बंगीखर्च निराळा पडेल.

ज्याणीं सह्या मात्र दिल्या आहेत त्याणीं दर प्रतीस किमतीबद्दल रु० ४ व टपाल बंगीखर्च आठ आणे व नवीन घेणारांसही दर प्रतीस टपाल व बंगीखर्च मिळून रु० पांच म्यानेजर अरुणोदय यांजकडे पाठवावे ह्मणजे बुकें तावडतोब रवाना केलीं जातील.

म्यानेजर अरुणोदय.

तारीख १४ अक्टोबर रोजीं विक्रीस तयार होईल.

सन १८७७ चा आक्ट १९ वा ह्मणजे १८७७ चा हिंदुस्थानचा मुदती विषयीं आक्ट.

### नवीन मराठी.

सदर्हू आक्टाचें भाषांतर काल रोजीं प्रसिद्ध होऊन लोकांत उपलब्ध झालें आहे. हेंच भाषांतर छापून लोकांचे सोयीकरितां अल्प किमतींत देण्याचें हेतूनें हा आक्ट छापण्याचें काम आह्मी ज्यारीनें ठेविलें आहे. लोकांचे सवडीप्रमाणें सर्वांस हा कायदा उपलब्ध व्हावा एतदर्थ आह्मी ह्याच्या चार तऱ्हा निरनिराळ्या किंमतीनें केल्या आहेत त्या खालीं लिहिल्या प्रमाणें:—

१. साध्या कागदावर सेडयूल सुद्धां नुसता कायदा किंमत ६ आणे ( नुसता शिवलेला. )

२. सदर्हू टिपा सगट किंमत ८ आणे.

३. जाड कागदावर नुसता कायदा किंमत ८ आणे ( नुसता शिवलेला )

४. जाड कागदावर टिपासह किंमत दहा आणे चांगलें बायडिंग केलेले व प्रत्येक पाना आड कोरें पान घातलेले दोन्ही जातीचे प्रतीस प्रत्येकी दोन आणे ज्यास्त पडतील व टपाल हशिलाबद्दल २ आणे ज्यास्त पडतील. तारीख २८ सप्तंबर सन १८७७ इसवी.

महादेव बल्लाळ नामजोशी
किरण छापखान्याचे मालक

* टीप— शेडूलसुद्धां नुसता कायदा ता. ६ रोजीं पैसे भरणारांस मिळेल.

या पुस्तकासंबंधी पैसे भरणें तेः—

मुंबई— गोपाळ नारायण अँड को बुकसेलर्स काळबा देवीरोड
रत्नागिरी— गणेश दादाजी देशमुख गव्हरमेंट प्रासिक्युटर
ठाणें— शंकर रामचंद्र भागवत व

सिस्टंट मास्तर इंग्लिश स्कूल
अलीबाग— सत्यसदनकर्ते
पुणें— रावजी प्रभाकर भावे ट्रान्सलेटर फ. क्षा. सवजज्ज
महादेव बल्लाळ नामजोशी किरण छापखान्याचे मालक.
नगर— गंगाधर गणेश धनेश्वर असिस्टंट मास्तर सरकारी मराठी शाळा नं. १
सातारा— शुभसूचक कर्ते
कोल्हापुर— कृष्णाजी गोपाळ भावे हेडमास्तर ट्रेनिंग कालेज,

---

## जाहिरात.

श्री व्यंकटेशजी स्वामी संस्थान पेठ देऊळगाव राजा तालुके चिखली जिल्हे बुलढाणे वि॥ राव जगदेवराव राजे मानसिंगराव जाधवराव जमीदार सरकार दौलताबाद वगैरे याजकडून.

कौलनामा जिल्हा अकोला साहू, व्यापारी, कासार, मन्यार, हलवई वगैरे जनसमूहसुद्धां सन १२८७ फसली कौलनामा सादर केला जातो कीं मामूलप्रमाणें आश्विन मासीं विजयादशमीस श्रीचा उत्साह आहे करितां सकुटुंबी दुकानदारीचे मालासह श्रीजीचे चरणापाशीं यावें. पूर्वसांप्रदाय विदितच आहे. त्याप्रमाणें वावगी तोशिस लागणार नाहीं. कळावें. तारीख २० सेप्टेंबर सन १८७७ इसवी.

---

### नोटिस.

रा. रा. राजे मानसिंगराव जाधव जामीन विनायक विश्वासराव वकील मुक्काम औरंगाबाद यांस अकोल्याहून लक्ष्मण गोविंद याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुह्मी हैदराबाद निझामच्या इलाख्यांत रेलवेचे रुपये येणें आहेत त्या रकमेंतून आमची रकम द्यावयाचा करार केला असून तो पैसा तुह्मी घेतला. हल्लीं देखत नोटिस रुपयांची आदाई व्याजासुध्धां न केल्यास आज तारखेपासून १५ दिवस वाट पाहून नंतर लागलीच फिर्याद करून नोटिशीचे खर्चासह रुपये द्यावे लागतील. कळावें. तारीख ६ माहे आक्टोबर सन १८७७ इसवी.

( सही ) लक्ष्मण गोविंद द. खु.

---

**वऱ्हाडसमाचार**

मिति आश्विन शुध्द १ शके १७९९

---

# शेतकरी लोक, सावकार लोक, व दिवाणी. कायदा

आपला हिंदुस्थान देश फार मोठा असून त्यांत परोपरीचे धंदे, कलाकौशल्यें किंवा आणखी कांहीं श्रेष्ठ प्रकारचे उद्योग लोकांस नाहींत. इकडील जमीन चांगली पिकाऊ याजवरच हजारो वर्षें लोकांची गुजराण होत आली, पण आतां दिवसानुदिवस पुढें कसें होईल याची सर्वांस मोठी काळजी वाटते सबब त्याविषयीं कांहीं विच्यारही करणें अवश्य आहे.

सर्व लोकांनां स्पष्ट दिसून आलें आहे कीं आपले देशाला विशेष दारिद्र येत चाललें आहे व याचें मुख्यत्वें कारण शेतकरी लोकांची स्थिति चांगली नाहीं हें आहे. जमीनीपासून चांगलें पीक घेण्यास खर्च अधिक केला पाहिजे, तो करण्यास शेतकरी लोकांना ऐपत नाहीं, व त्यांनां कर्ज देणारे सावकार लोक असावे तसे नाहींत, ते कुळाचा खग्रास व्हावा व आपली तुमडी भरावी अशीच सर्वकाळ इच्छा करणारे व सरकारचा कायदाही सर्वतोपरी त्यांस अनुकूळ असा आहे त्यामुळें देशाची स्थिति उत्तरोत्तर वाईट होत आहे व या विषयीं सरकारानें विच्यार केला नाहीं तर ती कोणत्या परिणामास जाईल या विषयीं कांहीं नियम सांगतां येत नाहीं.

सावकार लोकांच्या कर्जासंबंधी परोपरी जुलमानें गांजून थोडे वर्षांमागें पुण्याकडे गावचेगाव सावकारांवर उलटले होते व मोठा दंगा झाला होता ही गोष्ट सर्वांस महशूर आहे. पुढें सरकारानें त्या गोष्टीची चौकशी करण्याकरितां कमिशन नेमलें होतें त्या कमिशनानें पुष्कळ बारीक चौकशी करून व फार मेहनत घेऊन एक मोठा सविस्तर रिपोर्ट केला पण सरकारानें तो पाहून पुढें काय केलें तें कांहींच दृष्टीगोचर झालें नाहीं. सन १८७७ चा १० वा ह्मणजे नवीन झालेला दिवाणी आक्ट यांत शेतकरी लोकांस अनुकूळ असे कांहीं नियम होतील असें वाटत होतें परंतु तसें कांहीं घडलें नाहीं ही मोठी दुःखाची गोष्ट होय.

मुंबईचे म्युनिसिपल कमिशनर मि. पेडर साहेब यांनीं एका ठिकाणीं "हिंदुस्थानांतील दुष्काळ आणि कर्जदारी" या विषयावर एक निबंध लिहून प्रसिध्ध केला आहे. त्यांत शेतकरी लोकांची निकृष्ट स्थिति त्यांनीं चांगली दाखविली आहे. व त्यांनां बुडविणारे सावकार लोक होत व त्यांनां सहाय काय तें सरकारच्या दिवाणी कायद्याचें आहे हेंही स्पष्ट सांगितलें आहे. कुणबी लोकांस शेतांतून चांगलें उत्पन्न होत नाहीं त्यामुळें कर्ज करावें लागतें, मालाच्या हंगामापूर्वींच सरकार सक्तीनें सारा वसूल करिते त्यामुळें कुणबी लोकांस कर्ज करावें लागतें, सरकार जमीनीचे धारे चढवीत चाललें आहे त्यामुळें कुणबी लोकांस कर्ज करावें लागतें. व ते गरजवंत ह्मणून सावकार लोक त्यांस नाडून, जबरदस्त व्याज ठरवून व परोपरीच्या सक्तीच्या आटी ठेवून कर्ज देतात. व सरकारचा कायदा बिनतकार सावकारांच्या मनोदयानुरूप शेतकरी लोकांविरुध्ध फैसल देतो. हें मि. पेडर साहेब यांनीं फार चांगल्यारीतीनें स्पष्ट करून दाखविलें आहे. व हिंदुस्थान सरकारानें या विषयीं कांहीं विचार केला नाहीं तरी विलायतेंतील दयाभूत इंग्लिश लोक तो लेख वाचतील व त्याचा कांहीं विचार करून बंदोबस्ताचा मार्ग काढतील अशी आह्मी उमेद बाळगतों.

कांहीं वर्षांमागें गायकवाडींत विलक्षण प्रकारचा अन्याय व जुलूम चालला होता तेव्हां एक शेतकरी अतिशय त्रासलेला पाहून त्याला कोणी युरोपियन आफिसरानें ह्मटलें कीं, तूं गायकवाडी सोडून ब्रिटिश राज्यांत ये. तुला तिकडे आह्मी जमीनी वगैरे देऊ. तो ह्मणाला कीं ईश्वर करो व मजवर ब्रिटिश राज्यांतील दिवाणी कायद्याचा सपाटा न येवो. गायकवाडींत त्रास आहे तो पुरवेल पण ब्रिटिश राज्यांतील कायदेशीर जुलूम आह्मा लोकांस पुरवणार नाहीं. सारांश सावकार लोकांच्या हातीं कायद्यानें जी विलक्षण प्रकारची सत्ता दिली आहे तेणेंकरून शेतकरी लोकांचा कर्जबाजारीपणा वाढून ते धुळीस मिळत आहेत.

दिवाणी दाव्यांत कायदा हा वादी व प्रतिवादी यांची समता ह्मणजे सारखेपणा राखतो व असाच प्रकार इतरही सुधारलेल्या सर्व राष्ट्रांत आहे. पण हिंदुस्थानांतील सावकार वादी व शेतकरी प्रतिवादी यांच्या दरम्यानच्या दिवाणी दाव्यांत कायदा समता राखित नाहीं एवढेंच नव्हे पण एक लहान पोर आणि एक मोठा ब्रह्मराक्षस याप्रममाणें त्यांत विषमता रहाते. करार पुरा करवणें हें कायद्याचें मूलतत्व आहे; परंतु जेथें उभयपक्षकार सारखे नाहींत, करार खुशीनें झाले नाहींत, करारा विषयीं पुरें ज्ञान नाहीं, आणि जेथें खऱ्या कराराचें मूळबीजच वसत नाहीं तेथें देखील इकडील कायदा करार पुरे करवितो ही सामान्य विच्याराची गोष्ट आहे असें नाहीं.

इकडील शेतकरी लोकांची सामान्य स्थिति सर्वांस ठाऊकच आहे. ते हरहमेशाची गरज भागावी ह्मणून एकादा सावकार करून ठेवीत असतात व त्याजपासून शेतसाऱ्याकरितां पैसे, प्रपंच्याकरितां लागतील त्या वस्तु ते घेत असतात. आणि आपले शेतीचें उत्पन्न त्यास तारण लाऊन देत असतात. तरी दरएक जिनसाचे वेळीं सावकार त्यापासून कांहीं तरी लेख व त्याला जबरदस्त व्याज लावून घेत असतोच व शेतकरी लोकांनां लिहितां वाचतां येत नसतें. यामुळें त्या लेखापासून त्यांवर कसकसे परिणाम पुढें होतील याची त्यास कांहीं कल्पना नसते. पण दंग्याच्या कमिशनानें जो रिपोर्ट केला आहे व मि० पेडर साहेब यांणीं त्यासंबंधी जी माहिती लिहिली आहे तिजवरून या गोष्टी किती निकरास जातात हें सर्वांचे सहज लक्षांत येईल.

सदर्हू कमिशनानें सुमार ६०० शेतकरी लोकांच्या स्थितीचा विच्यार केला, तेव्हां त्यांनां तीन प्रकारची लोकस्थिति आढळली ती अशी:—

खानेसुमारीचे मानानें दरमाणसी ९॥ एकर जमीन व तिचा दर एकरी ९। आणे सारा देणें पडतो. अशा लोकांचा त्यांनीं एक वर्ग कल्पिला. त्यांत वार्षिक साऱ्याची रकम १०९३० रुपये, शेतांतील वार्षिक उत्पन्न १०८७०० रुपये आणि त्यांनां कर्ज आहे ते १२७५०० रुपये. सन १८६० सालीं या लोकांनां जें कर्ज होतें त्याची बेरीज पाहिली तर सारी १८८०० रुपये होती.

दुसरा त्यांनीं एक वर्ग कल्पिला त्याची स्थिति अशी आहे कीं साऱ्याची रकम ५४०० रुपये, मालाचें उत्पन्न ५७७५० रुपये, त्या लोकांनां सन १८६० सालीं १२२५० रुपये कर्ज होतें व तें हल्लीं ८०८०० रुपये पर्यंत वाढलें आहे.

तिसरी निकृष्ट प्रत— साऱ्याची रकम २७८० रुपये, शेतीचें उत्पन्न ३१७०० रुपये व त्यांस कर्ज १०२१५० रुपये आणि याच लोकांस सन १८६० सालीं १२१०० रुपये कर्ज होतें. या प्रतींत एकंदर शेतकरी १८७ त्यांत ८ जणास मात्र कांहीं कर्ज नव्हतें, बाकी सर्व कर्जबाजारी.

यावरून उत्तरोत्तर कर्जाचा बोजा शेतकरी लोकांवर वाढत चालला आहे हें स्पष्ट आहे. रयत लोक ह्मणतात कीं, ईस्ट इंडिया कंपनीच्या राज्यांत आम्ही इतके गांजलों नव्हतों. तेव्हां दामदुपटीहून अधिक पैसा सरकार आह्माकडून सावकारास देववीत नव्हते. मुदतीविषयींचा सन् १८५९ चा आक्ट १४ हा होण्यापूर्वीं फिर्यादीस बारा वर्षांची मुदत होती व शेकडा एकोत्र्याहून अधिक व्याज सरकार आकारित नव्हतें. तें नव्या कायद्यानें सर्व बदललें. देण्याघेण्याच्या फिर्यादीस मुदत तीन वर्षांची झाली तेव्हां सावकार दर दोन वर्षांनीं हिशेब करून मुदलावर व्याज चढवून नवा रोखा करून घेऊ लागले तेणेंकरून वारंवार चक्रवाढी होऊं लागल्या व व्याजाचे दर सावकार लिहून घेतील ते ते कायदा देववूं लागला ह्मणजे असें—

दरसाल दर शेकडा २५ रुपये व्याज देण्याचे करारानें आजचे दिवसांत १०० रुपये कर्ज काढले तर बारावे वर्षीं त्याला ११३९ रुपये देणें पडतात आणि सन १८५९ तील मुदतीच्या कायद्याच्या पूर्वीं १०० रुपयां करितां १२ वे वर्षीं फक्त २०० रुपये द्यावे लागत असत.

दंग्याच्या कमिशनानें कित्येक लोकांचे जमाखर्च पाहिले त्या वेळीं त्यांस जी अद्भुत माहिती मिळाली तिचे एकदोन चुटके आह्मी आपले वाचकांकरितां एथें घेतों.

सन १८५९ साला पूर्वीं एका गृहस्थाचे कांहीं शेतकऱ्यांवर २६०० रुपये कर्ज घेणें होते व त्याचें व्याज १४६० रुपये झाले होते. त्याबद्दल वसूल सन १८५९ सालीं त्यांनीं ३४६० रुपये दिले व बाकी ६०० रुपये राहिले. नंतर सन १८५९ सालापुढें कर्ज दिलें २९३० रुपये, त्यांचें व्याज ४४४२ रुपये, त्यांत वसूल २७८० रुपये व बाकी येणें राहिले ४६५० रुपये.

हा साधारण प्रकार झाला. पण कांहीं व्यक्तींच्या गोष्टी याहून अती अद्भुत आहेत त्या अशा:—

एका सावकारापासून एका कुळानें ८ रुपये कर्ज घेतलें होतें. त्याबद्दल त्यानें १६ रुपये दिले तरी ६० रुपयांचा त्यावर फैसल झाला आणि त्याच्या बनावर्णींत १२ बैल व ८० एकर मिराशी जमीन त्या कुळाची त्या सावकारानें घेतली.

एका कुळानें १९ वर्षांपूर्वीं एकाचे ६० रुपये कर्ज घेतले होते त्याचे फेडीकरितां वेळोवेळीं मिळून त्यानें १०० रुपये रोख, २२९ रुपयांचें धान्य, ४ बैल व घोडा दिला. तरी सावकार म्हणाला फेड झाली नाहीं. मग कुळानें आपलीं ४ शेतें गहाण लावून दिलीं असें असतां त्यावर सावकारानें सन १८७९ सालीं एक फिर्याद करून ६० रुपयांचा फैसल मिळविला व आणखी दुसरे कित्येक रोख त्यावर फिर्यादी करण्यास त्याच सावकाराच तयार होते.

अकरावर्षांपूर्वीं आनंदजी ह्मणून एक जण होता त्यानें रोखा लिहून देऊन एकापासून २९ रुपये कर्ज घेतले व पुढें कांहीं किरकोळ सामान घेतलें. पुढें त्याच्या फेडीसाठीं आपले एक शेत, ८ बैल व ४ गाई त्यानें दिल्या व ९०, १००, २००, ३०० व ३९० रुपयांचे रोखे लिहून दिले तरी त्या सावकारानें त्यावर त्या शिवाय ९०० रुपये घेणें काढिले होतें.

एका सावकारानें एका कुळापासून कर्जाचे फेडीकरितां त्याची बायको व मुलगी आपले खासगत चैनीकरितां लिहून घेतली. व तीं त्यास देणें भाग झालें.

दुसरें एक उदाहरण असें आढळलें आहे कीं. एके शेतकऱ्यानें आपलीं सर्व शेतें व जिंदगी सावकाराचे भरीस घालून नंतर १३ वर्षेपर्यंत बायकोसुद्धां सावकाराचे घरीं राहीन व पोटास अन्न, तंबाकू, आणि वर्षास एक घोंगडी घेईन असा करार लिहून दिला.

या सावकार लोकांच्या गोष्टी किती नीचतेच्या आहेत व शेतकरी लोकांची स्थिति किती दैन्यकारक आहे हें कोणास ही दिसल्यावाचून रहाणार नाहीं. पण लोकांस दिसून उपयोग काय? रयतेचे मायबाप जे सरकार त्यास ती दिसली पाहिजे. पण कमिशनरांचा रिपोर्ट, वर्तमानपत्रकर्त्यांचे लेख, व सदरील मि० पेडरसाहेब यांचा लेख यांवरून सरकारास कांहीं दिसलें नाहीं किंवा त्यांनीं डोळे झाकिले तें समजत नाहीं. दयाळू सरकारास आमची अशी शिफारस आहे कीं कर्जाबद्दल शेतकरी लोकांच्या जमीनी विकल्या जाऊं नयेत, त्यांस कर्जाबद्दलं तुरुंगांत टाकलें जाऊं नये. व त्यांचीं शेतीचीं हत्यारें व गुरें यांवर सावकाराची टांच येऊं नये. हुकूमनाम्याची फेड सवलतीने व्हावी व नादारीच्या कायद्याची अमलवारी जारी रहावी. इतक्या गोष्टी तरी सरकारानें अवश्य केल्या पाहिजेत. मि. पेडर साहेब तर निर्भीडपणानें स्पष्ट सांगतात कीं शेतकरी लोकांची स्थिति कायद्यानें सुधारली नाहीं तर लवकर किंवा उशीरा बहुत लोक गांजले जाऊन एकत्र होत्साते कांहीं गडबड करतील व तेणें करून हिंदुस्थानच्या राज्यव्यवस्थेसही धक्का बसूं शकेल ईश्वर करो आणि इतक्या पल्यावर गोष्ट न येऊन हें अनुमान खोटें ठरो व सरकारचें याकडे लक्ष पोंचो.

---

**पुस्तकांची पोंच**—रावबहादुर गोपाळराव हरी देशमुख ठाण्याचे जाइंटजडज यांजकडून खालीं लिहिलेलीं त्यांचीं पुस्तकें आह्मांस नजर आलीं तीं आह्मी अत्यादरानें स्वीकारून त्यांचे आभार मानितों.

१ ऐतिहासिक गोष्टी.

२ भिक्षुक.

३ प्राचीन आर्यविद्या व रीति.

याचप्रमाणें या आठवड्यांत विविधज्ञानविस्ताराचे म्यानेजर यांनीं त्या पुस्तकांतून निराळा छापलेला "नागपुरकर भोसले यांचा इतिहास" आह्मांस पाठविला तोही आदरपूर्वक स्वीकारून आह्मी त्यांचे आभार मानितों. आह्मी या च्यारी पुस्तकाविषयीं लवकरच आपला अभिप्राय लिहू.

---

## वऱ्हाड.

---

मि० जोन्स साहेब कमिशनर उमरावतीहून वाशिमास जाण्याकरितां गुरुवारीं सायंकाळीं एथें आले व शुक्रवारीं पहाटे वाशिमाकडे जाऊन काल पुन्हा एथें आले.

---

वऱ्हाडचें सदर स्टेशन कोठें असावें या विषयीं खात्याखात्याच्या मुख्य अधिकाऱ्यांस कमिशनर साहेबानीं अभिप्राय विच्यारले आहेत. या शिवाय उमरावतीस कमिशनर साहेबाचे अक्षत्वानें व अकोल्यास जुडिशियल कमिशनर साहेबाचे अक्षत्वानें अशा दोन कमिट्या भरून उमरावतीस व अकोल्यास सोयी गैरसोयी काय आहेत व कोणतें सदर स्टेशन होणें अवश्य आहे याचा विचार आहे. नंतर अखेर रिपोर्ट कमिशनर साहेबांकडून रेसिडेंट साहेबांस होणार असें समजण्यांत आलें आहे.

---

सिव्हिल प्रोसिजर ह्मणजे दिवाणी कामाचे वहिवाटीचा सन १८७७ चा आक्ट १० वा वऱ्हाडास या महिन्यांत लागू न करितां पुढील जानेवारी महिन्यांत लागूं करावा असा ठराव झाला आहे.

---

चांदुरचे स्टेशनमास्तर रा. रा. वामन जनार्दन बापट यांजवर लांच खाल्याचा मुकदमा शाबीद होऊन त्यांस ९ महिने सक्तमजूरी कैद व ३०० रुपये दंड अशी शिक्षा झाली.

---

मि० हाबसन साहेब एथील असिस्टंट पोलिस सुपरइंटेंडेंट यांची हैदराबादेस नेमणूक झाल्याप्रमाणें ते या आठवड्यांत तिकडे गेले.

---

हैदराबादेस कलाकौशल्याची शाळा स्थापन करण्याचा दिवाण साहेबाचा निश्चय झाला आहे. व त्या कामीं इटाली देशचा शिक्षक ते ठेवणार आहेत.

---

मेजर जे फिटझरल्ड विलायतेस रजेवर गेले त्यांमुळें जुलईचे दुसरे तारखेपासून खालीं लिहिलेल्या नेमणुका हिंदुस्थान सरकारानें केल्या आहेत:—

क्या० आर बुलक फर्स्टक्लास असिस्टंट कमिशनर यांस आफिशियेटिंग थर्ड क्लास डिपुटी कमिशनर केलें.

मि० ताजुदिन हुसेन सेकंड क्लास असिस्टंट कमिशनर यांस आफिशियेटिंग फर्स्ट क्लास असिस्टंट कमिशनर केलें.

मि० ए जे डनलाप थर्ड क्लास असिस्टंट कमिशनर यांस आफिशियेटिंग सेकंड क्लास असिस्टंट कमिशनर केलें.

---

सपटेंबरचे २९ वे तारखेस हैदराबादेस निजाम सरकारांनीं एक मोठा दरबार भरविला. त्यांत अलीशान रेसिडेंट साहेब यांनीं नवाब शमसुल उमराव अमीर कबीर ह्मणजे पहिले विकर उल उमराव यांस को अडमिनिस्ट्रेटर ह्मणजे जाइंट कारभारी नेमिल्याविषयीं हिंदुस्थान सरकारचा खलीता आलेला वाचून दाखविला. आफिसर सुमार ४० आले होते व गर्दी पुष्कळ झाली होती. या नेमणुकीचे योगानें सारे शहरांत फार आनंद झाला.

---

उमरावतीचे डाक्टर महालिंग पिले एथें खासगी रीतीनें डाक्टरीचें काम चालविण्याकरितां आले आहेत. ते उमरावती सारखे मोठें शहर सोडून एथें कां आले व भरवशा जोगा चांगला आश्रय मिळण्याविषयीं त्यांची खात्री आहे कीं काय, याविषयीं आह्मांस बरोबर ठाऊक नाहीं. व त्यांच्या गुणज्ञते विषयींहो आह्मांस विशेष कांहीं ठाऊक नाहीं. एथें सरकारचे व म्युनिसिप्यालिटीचे आश्रयानें चाललेली चारिटेबल डिस्पेन्सरी ह्मणजे धर्मार्थ दवाखाना आहे व त्यावर हुशार, चांगले अनुभविक, व मेहनती असे फर्स्ट क्लास आस्पिटल असिस्टंट मि. अप्पाकानू हे डाक्टर आहेत. त्यांकडून हजारो लोकांस धर्मार्थ औषधें मिळतात व जे लोक त्यांस घरीं बोलावितात त्यांकडे ते आस्थापूर्वक जाऊन औषध देतात व वेळोवेळ पुष्कळ खेपाही घालतात. आणि त्याबद्दल त्यांनां कांहीं लोक जे थोडे पैसे देत असतील ते केवळ बक्षीसा दाखल होत; कारण त्यांस सरकारी पगार आहे. ह्मणून त्या थोड्या पैशावर ते संतुष्ट व उल्हासभरीत रहातात. आतां महालिंगं यांचा प्रकार कसा होईल तो पाहिला पाहिजे. त्यांनां सरकारी पगार नाहीं, व औषधेंही नाहींत, तेव्हां जे कांहीं लोकांकडून त्यांस मिळणार त्यांतच त्यांचा पगार, बक्षीस व औषधीचा खर्च त्यानी समजून घ्यावयाचा आहे. ह्मणून तो जर यथेच्छ मिळेल तरच त्यांची संतुष्टता व उल्हासवृत्ती रहाणार आहे आणि आमचे लोकांस वर्गण्या देण्याची किती हौस व तत्परता असते तें लायब्रऱ्या, सभा दुष्काळ फंड वगैरेचे प्रकारावरून सवांस माहित आहे. सबब दवाखान्यासारखी नवी संस्थाना महालिंगं यांस करणें आहे तर त्यांनीं एका वर्षाचा तरी आपला बंदोबस्त करून घ्यावा. ह्मणजे पुढें त्यांचा उपयोग व लोकांची गोडी यांच्या धोरणावर जसें बस्तान बसावयाचें तसें बसेल. अस्तु. यांत डा० महालिंगं यांची आह्मी नाउमेद करितों असें कोणी समजूं नये. त्यांनीं एथें कामाची सुरवात केल्यास तें चांगलें चालावें एवढीच आमची इच्छा आहे.

---

सेशनचा मुकदमा—गेल्या आठवड्यात बुलढाण्यास एका सेशन मुकदम्याचा निकाल झाला. डाका घालणारे ह्मणून २४ असामी सेशनकामिट झाले होते त्यांतून १४ जणांस दहा दहा वर्षांच्या शिक्षा होऊन १० इसम सुटल्याचें कळतें.

---

या आठवड्यांत बुलढाण्याकडे एक दोन दिवस चांगला पाऊस झाल्याचें समजतें.

---

उमरावती हाय स्कुलाचे हेड मास्तर रा. रा. विष्णु मोरेश्वर महाजनी एम. ए. यांनीं शेक्सपियरकृत सिंबलाईन नाटकाचे मराठी भाषांतर केलें आहे त्याचा प्रयोग काल रात्रीं इचलकरंजीकरांनीं नाटकगृहांत केला.

---

मूर्तिजापुर ता. ३।१०।७७ इ.

हस्त नक्षत्र लागल्यापासून एथें पर्जन्य पडला नाहीं ह्मटलें तरी चालेल. आसपास थोडा बहुत पडला पिकाची स्थिति बरी आहे. बाजारांत काल भावें ज्वारी दर रुपयास वजनी शेर १६, गहू १०, तांदुळ ७ तुरीची दाळ ८ याप्रमाणें होता.

एथील सरकारी शाळा मिडलक्लास होती ती ता. १२ सप्तंबरपासून लोअरक्लास झाली व तिजवर रा. रा. वामन जिवनराव यांस हेडमास्तर नेमून एक १० चा व एक ८ रुपयाचा असे दोन असिस्टंट त्यांचे हाताखालीं दिले.

गेल्या रविवारीं एथील सरकारी शाळेंत लायब्ररीसाठीं व शाळेस उत्तेजन येण्यासाठीं सभा भरविली होती. सदहू सभेंत अध्यक्ष मि. मुबारकअली तहशिलदार असून इतर मंडळी सुमार ७९ होती. सभेंत लायब्ररीकरितां दरमहा वर्गणी सहा रुपये पर्यंत जमा होऊन शिवाय बक्षिसीदाखल ४० रुपये सरासरी झाले पैकीं शाळेस १७ रुपयांचें घड्याळ देण्याचा ठराव सर्वानुमतें तहशिलदार यांनीं केला. सेक्रेटरी हेडमास्तर यांस केलें आहे. व पांच सहा मराठी वर्तमानपत्रें घेण्याचा ठराव झाला आहे.

गेल्या शनिवारीं एथील स्टेशनावर मालाची पोतीं चोरण्या करितां कांहीं चोर आले होते. पोत्यांचे गंजा खालचीं पोतीं घेण्यासाठीं यत्न चालविला त्यावरून पोतीं सर्व खालीं येऊन त्या चोराचे अंगावर पडल्यामुळें दोन चोर त्या खालीं सांपडले एकाचा पाय फारच मोडला व दुसऱ्याची कंबर मोडली व सदहू चोर दुसरे दिवशीं त्या जाग्यावर पडलेले सापडले ते एथील डिस्पेन्सरींत आहेत.

---

## वर्तमानसार.

आगपेट्यांचा कारखाना — लवकरच बडोद्यास दिवाण साहेब व तेथील कांहीं मंडळी सुरू करणार आहेत असें ऐकतों.

इंग्लंडांतील एका माजिस्ट्रेटानें आपण अतिशय मद्यपान केलें सबब दुसरे दिवशीं कोर्टांत जाऊन आपण आपल्यास २ रुपये दंड करून घेतला दंड करण्याच्या विच्यारामप्रमाणें मद्य न पिण्याचा विच्यार करिता आला नाहीं. तेव्हां केवढा हा विच्यार! दी. बं.

सातार जिल्ह्यांत सर्व ठिकाणीं चांगला पाऊस पडून अबादानी झाली. हल्लीं पिकाची स्थिति फार चांगली असल्याचें समजतें. खरिपाचे पिकास मात्र थोडा दिसका बसला. हल्लीं शेतकरी लोकांची उपजीविका नव्या धान्यावर होऊं लागली यामुळें दुष्काळाचें स्वरूप कांहीं अंशीं नाहींसें झालें आहे ह्मणण्यास हरकत नाहीं. हल्लीं पावसानें खूप झोड उठवून दिली. लोकांची स्थिति बरी आहे. कित्येक ठिकाणीं तर लोक पावसास कंटाळले आहेत. म. मि.

दुष्काळास आरंभ झाल्यापासून रिलिफ संबंधी सोलापुर जिल्ह्यांत एकंदर १६१ लक्ष रुपये सरकारांतून खर्च झाले असावे असा अजमास आहे.

सोलापुर— पर्जन्यानें गर्दी करून सोडली आहे. कित्येक जागीं वाफसे सुद्धां होत नाहींत. पेरणीचीं कामें जशींचीं तशीं राहिलीं आहेत. ज्यांच्या पेरण्या होऊन धान्य उगवलें आहे त्यांचें पीक अति उत्तम येईल असें ह्मणतात. हल्लीं एथें बाजारभाव क्षणक्षणीं उतरत असून त्याची बिलकूल तेजी राहिली नाहीं.

हल्लीं सोलापुर स्टेशनावर धान्याचीं हजारों पोतीं पडलीं असून शिवाय वरचेवर येत आहेत. हल्लींचे मंदीमुळें व धान्याचे समृद्धीमुळें शेंकडों व्यापाऱ्यांचीं तोंडें सुकून गेलीं आहेत. व कित्येकांचीं दिवाळीं वाजण्याचा रंग आहे. कसेंही असो. सर्वत्र आबादानी होऊन लोक निष्काळजी झाले आहेत. हें पाहून फारच संतोष होत आहे. ईश्वर करो आणि लोकांचा आनंद असाच राहो असें आह्मी इच्छितों. क. त.

पुणें एथें ता. २६ रोजीं रात्रीं पुष्कळ पर्जन्य पडला असें कळतें.

मद्रास इलाख्यांत रेलवे मार्गानें व आगबोटीनें अतिशय धान्य गेल्यामुळें इकडील व्यापारास बराच धक्का बसला व दुसरे ठिकाणीं धान्य बिलकूल गेलें नाहीं ह्मणून बरेंच नुकसान झालें. हल्लीं असें समजतें कीं मद्रास एथें धान्याचा भाव उतरला असून नफा मिळण्याची आशा नाहीं सबब धान्य भरून गेलेलीं जहाजें परत चाललीं आहेत.

आह्मास लिहिण्यास अतिशय वाईट वाटतें कीं श्रीमंत परमहंस परिव्राजकाचार्य श्रीविद्या नरसिंह भारती स्वामी जगद्गुरु संस्थान मठ करवीर व संकेश्वर हे गेल्या रविवारीं संकेश्वर एथें समाधिस्त झाले. यांच्या जागीं श्री व्यंकटाचार्य यांची योजना झाली.

पंढरपुर— एथें पर्जन्य उत्तम पडला. लोक आनंदांत असून दुष्काळांतून पार पडूं असें त्यांस वाटूं लागलें आहे. रोगराई विशेष नाहीं. महागाई किंचित कमी झाली आहे.

कलादगी जिल्ह्यांत अलीकडे चांगला पर्जन्य पडल्यानें तिकडील लोकांस मोठा आनंद झाला व दुष्काळाचा अंमल पुष्कळ अंशीं कमी झाला.

हल्लीं नेपाळांत घोटाळा होऊन आपापसांत तंटे होण्याचा प्रकार सुरू झाला आहे.

सोलापुर— जे लोक अगदीं थकलेले आहेत त्यांस तूप साकर, दूध भात, मद्यमांस वगैरे जें लागेल तें देण्याचा क्रम सुरू झाला आहे. ने. ओ.

पुणें शेवटीं मेघराजानें कृपा केली एथें आतां अबादानी झाल्यासारखें झालें आहे. धारणेचा भाव चांगला उतरला आहे.

अहमदनगराकडे बहुतेक ठिकाणीं या आठवड्यांत पाऊस पडल्याचें आनंदकारक वर्तमान कळतें. किरण.

कलह— इंग्लंडांतल्या राजकीय घराण्यांत थोडा बेबनाव होऊन महाराणी साहेब व त्यांचे ज्येष्ठ चिरंजीव युवराज यांचे पटत नाहींसें झालें आहे. नार्मन किनाऱ्यावर युवराजांनीं सफर केली याबद्दल त्यांच्या मातुश्रीस फार राग आला. युवराज व त्यांच्या पत्नी आणि महाराणी साहेब व युवराज यांच्या मनांतली आढी काढण्याच्या हेतूनें डेन्मार्कचा राजा इंग्लंडास गेला होता; परंतु महाराणी साहेबांनीं त्याची भेट न घेता परस्पर त्याजकडे असा निरोप पाठविला कीं युवराज व त्यांची पत्नी या उभयतांनीं माझी क्षमा मागितल्यावाचून माझ्या मनांतला राग दूर होणें नाहीं हें प्रकरण लौकर विझलें नाहीं तर युवराजांच्या पत्नीस डेन्मार्कास आपल्या माहेरीं रहाण्याचें भाग पडेल.

होळकर सरकारांनीं आपल्या राज्यांत धान्याचीं सरकारी दुकानें काढून बाजार भावापेक्षां स्वस्त दरानें धान्य विकण्याचा क्रम सुरू केला आहे. या दुकानाची व्यवस्था सरकारी अधिकाऱ्यांच्या देखरेखीखालीं आहे.

अमेरिकेंतल्या शहरांत कोळशाच्या धुरापासून उत्पन्न होणाऱ्या धुराच्या दिव्याच्या ऐवजीं पाण्यापासून उत्पन्न होणाऱ्या धुराचे दिवे लावण्याची एक नवी युक्ती निघाली आहे. या दिव्यांस खर्च थोडा लागतो.

खरें औदार्य— इंग्रजी प्रधानमंडळ ब्रिटिश राज्याच्या वसुलांतली मोठी रक्कम हिंदुस्थानच्या साह्याकरतां देण्याला सिद्ध आहे. आणि या सत्कृत्यास पार्लमेंट सभा किंवा इंग्लंड देशांतले लोक अडथळा करणार नाहींत असें ह्मणतात. ही बातमी खरी असल्यास हिंदुस्थान देशाचें सुदैव समजलें पाहिजे.

इराणच्या बादशहानें कान्स्टांटिनोपल कडे १०००० शिपाई रवाना केले.

रशियनांचा तिसरा वकील काबूलांत लौकर जाणार आहे. इं० प्र०

## वेद आणि पुराण.

सर्व अध्यात्म विद्येचे दोन वर्ग होतात. एक वेद आणि एक पुराण. ह्या दोन वर्गांचा अर्थ काय होतो? वेद कशास ह्मणावें व पुराण कशास ह्मणावें? निरनिराळ्या जाती व पंथ वेद आणि पुराणाचे निरनिराळे अर्थ व आचार करतात. परंतु खोलविच्यारांअंतीं आपली अशी खात्री होईल कीं, वेद ह्मणजे सृष्टीरचनेंत परमात्म्याचें अस्तित्व व त्याची शक्ति याचा आत्मानुभव घेणें, आणि पुराण ह्मणजे मनुष्यांच्या चरित्रांत ईश्वराचा हस्त पहाणें. वेद सरिताच्या लहरींत, सागराच्या गर्जेनेंत, पर्वताच्या मस्तकावर, विद्युलतेच्या चकाकींत व नीलवर्ण नभांतील नक्षत्रांत ईश्वराचें हस्ताक्षर दाखवितो. पुराणाचा विषय वेदाप्रमाणें सृष्टीरचनेचा नाहीं. पुराण वेदासारखें दूर अंतरिक्षांत भ्रमण करीत नाहीं. तें ईश्वरास सन्निध पहातें; तें मनुष्याच्या प्रपंचांत ईश्वराचा दयाळू हस्त आहे असें दाखवितें. वेदाचें गांभीर्य थोर; परंतु पुराणांत रस आहे. वेद पुराणाच्या पूर्वी झाले व ते मानवजातीच्या बाल्यावस्थेंतील गीत आहे. आपले पूर्वज आर्य वेदगायन करीत यांत सूर्य, चंद्र, ग्रह, नक्षत्र द्युलोक, अग्नि, वायु, इंद्र व वरुण यांचीच प्रतिष्ठा व पूजा करीत असत, मनुष्याच्या चरित्रांत ईश्वराचा हस्त असल्याविषयीं वेदांत कांहींच नाहीं. बुद्धीच्या उदयारंभीं मनुष्यानें ईश्वराचा महिमा व सर्वसंपन्नता सृष्टिसौंदर्यांतच प्रथम पाहिली; व तेणेंकरून अत्यंत आश्चर्य व विस्मय होऊन उंच आणि गंभीर अशीं वेदस्तोत्रें मनुष्यानें रचिलीं. पुढें काळेंकरून ज्ञानाची प्रभा जसजशी फांकली व हृदयांत प्रेमरूप बाग फुलली आणि मनुष्यानें जाणलें, कीं ईश्वर दूर नाहीं पण अगदीं जवळ आहे. आपल्या अंतरात्म्यांत आहे; जसें जड जगत त्याच्या सत्तेखालीं आहे तसेंच आत्मिक जगतही त्याच्याच थोर सत्तेखालीं आहे. जो अंतरिक्षांतील ग्रहास फिरवितो तोच मनुष्याच्या इतिहासांत चोहोंकडे प्रेरक असा दिसतो. अशा विचाराच्या पोटीं पुराणांचा जन्म झाला. प्रथम दशावतार सांगितले व प्रत्येकाचीं अमानुषी कृत्यें कल्पून यथासांग रचिलीं आहेत. ब्राह्मपुराणाचा कर्ता दशावतार घेऊन स्वस्थ बसत नाहीं. तो जाणतो कीं ईश्वराचे अवतार अनंत आहेत.

ईश्वरानें अमक्याच युगांत अवतार धारण केला, तो अमुक एका पंथांतल्या एकाच पुरुषद्वारें प्रगट झाला अशा गोष्टींवर ब्राह्म विश्वास ठेवित नाहीं, तरी ज्या ज्या प्रसंगीं अवश्यकता दिसेल त्या वेळेस तो आपल्या भक्तांस नानाविध स्वरूपानें प्रगट होतो असें ब्राह्म मानितो. केव्हां केव्हां प्रेमळ मतीच्या, दयाळु पित्याच्या, शांतवन करणारा स्नेही, मैत्र मार्गदर्शक आणि शिक्षक यांच्या निरनिराळ्या स्वरूपानीं तो प्रगट होतो. ब्राम्हास दुसऱ्यापासून पुराण श्रवण करणें पुरें नाहीं. त्यानें आपल्या स्वतःच्या चरित्रांत पुराण वाचावें.. त्याचा असा विश्वास आहे कीं, ईश्वर प्रत्येक मनुष्यास विलक्षण रीतीनें दर्शन देतो. आपल्या आयुष्यांतील सुखाचे सर्व प्रसंगाची जर आपण नोंद ठेविली तर आपणास कळेल कीं, किती वेळा आपणास ईश्वराचें दर्शन झालें आहे. एकदा पक्षी सुस्वर गातांना ऐकून आपणास प्रेमाश्रु आले, दुसऱ्या वेळेस तृषा लागली ती अकस्मात तृप्त झाली, एकदा मित्र भेटून सुख झालें, कधीं संपत्ति मिळाली, पुत्र झाला, कन्या पुत्राचा विवाह केला, योग्य काळीं पर्जन्य पडून शेतास चांगलें पीक आलें किंवा फळभारानें लवलेल्या वृक्षांचीं अमृतफळें भक्षून सुख झालें, ह्या सर्व गोष्टी आपल्या चरित्रांत मनुष्य लिहून ठेवील तर ऐतिहासिक धर्मपुस्तकापेक्षां वर सांगितल्या प्रकारची नोंद आपणास अधिक प्रियकर धर्मपुस्तक होईल. कारण असल्या लेखांत खुद्द आपला आणि ईश्वराचा संबंध आपल्या ध्यानांत येईल व वारंवार आपल्यावर ईश्वरानें केलेले उपकार जे आपण विसरलों त्यांचें पुनः स्मरण होऊन चिंता दूर होईल. व परमेश्वरावर आपला भरंवसा व प्रेम अधिक जडेल. मधून मधून वेदाचा अभ्यास देखील अवश्य आहे. प्रपंच विसरून पृथ्वीवर व अंतरिक्षांत विश्वेश्वराचा जो महिमा सर्वत्र पसरला आहे त्यावर एकांतांत विचार करीत बसणें हेंही अगत्याचें आहे. परंतु वर सांगितलेले पुराण भक्तांस प्रियतम आहे आणि तें वाचतां वाचतांच तो हा लोक सोडून परलोकीं जातो. सु. प.

## नोटिस

रा० राघो वल्लद चाहादाजी वानखडे वस्ती पाटसुल प्रगणे पातुर शेखबाबू यांस खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुह्मी आह्मास खासगी कामाकरितां सत्तावीस रुपये कर्ज व्याजानें मागितले त्यास आह्मी तुह्मास वीस रुपये लक्ष्मण राजाराम सिंपी याजपासून व सात रुपये जवळून असे एकंदर २७ रुपये दिले यासी व्याज अर्धा आणा प्रमाणें कबूल करून जानेवारी महिन्याचे करारानें रुपये घेतले व रोखाही करून देतों ह्मणून तुह्मी कबूल केलें होतें. त्यास सदरील रुपयांचा करार जाऊन अजमास ८ महिने झाले. तुह्मास पुष्कळ वेळ रुपये मागितले असतां तुह्मी देतों देतों ह्मणता व देत नाहीं. याजकरितां ह्या नोटिशीनें कळविलें जातें कीं. ही नोटिस पावल्या तारखेपासून पंध्रा दिवसांत व्याजासुद्धां रुपये आणून देऊन पावती घ्यावी. असें न कराल तर तुमचेवर फिर्याद करून व्याजासुद्धां व या नोटिशीच्या खर्चासुद्धां सर्व रुपये भरून घेऊं कळावें. तारीख २८ आक्टोबर १८७७इ.

(सही) गनभट सितराम दस्तुर खुद्द.

हें पत्र अकोला एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

REGISTEREDNO. 6, 1877.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ११ अकोला, रविवार ता० १४ माहे अक्टोबर सन १८७७ इ० अंक ४१

## वऱ्हाडसमाचाराची किंमत

| | रुपये |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ५ |
| सालअखेर | ७ |
| केरकोळ अंकास | ०४ |
| डांकहाशील | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊ इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, १० ओळीचे आंत | १ |
| १० ओळीपुढें दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## जाहिराती.

### नादारी प्रकरणीं नियम.

(वऱ्हाडाकरितां नवीन तयार झालेले.)

मे० जुडिशियल कमिशनर साहेब मुलूख अमानी हैदराबाद यांणीं नादारी संबंधी मागील नियमांत फेरफार करून नुकतेंच एक पुस्तक छापून प्रसिध्ध केलें. त्याच्या कांहीं प्रति विक्रीसाठीं आह्माकडे तयार आहेत. किंमत आठ आणे पडेल. बाहेर गावचे घेणारास एक आणा डाक हाशील पडेल.

वऱ्हाडसमाचाराचे
मालक.

### विक्रीस तयार.
### नवीन मुदतीचा कायदा.

सन १८७७ चा आक्ट १५ वा.

( मराठींत )

मुंबईत नेटिव ओपिनियन छापखान्यांत सुंदर टाइपानें छापून विक्रीस तयार आहे. किंमत ०६ व टपालहाशील वगैरे ०२. पैसे सदर छापखान्यांत पाठविले असतां पुस्तकें ताबडतोब रवाना होतील.

## जाहिरात.

### नवा दिवाणी कायदा.
### किंमत कमी केली आहे!!

मुदतीचा, रजिस्टरचा व विशेषन्यायाचा यासुद्धां अरुणोदयांत छापलेला.

पाच प्रतींपर्यंत घेणारांस दरप्रतीस डाकेसह ३॥रु.प्र. दहा प्रती घेणारांस ३ रु. प्रमाणें.

२५ प्रती घेणारांस २॥ रु. प्रमाणें.

५० प्रती घेणारांस २ रु. प्रमाणें व

१०० प्रती घेणारांस डाकेसह १॥ प्रमाणें किंमत अरुणोदयांत पाठविल्यास बुकें लागलीच रवाना होतील; पण हे दर प्रती खपतपर्यंत कायम रहातील.

---

तारीख १४ अक्टोबर रोजीं विक्रीस तयार होईल.

**सन १८७७ चा आक्ट १५ वा ह्मणजे १८७७ चा हिंदुस्थानचा मुदती विषयीं आक्ट.**

### नवीन मराठी.

सदर्हू आक्टाचें भाषांतर काल खेर्जी प्रसिद्द होऊन लोकांत उपलब्ध झालें आहे. हेंच भाषांतर छापून लोकांचे सोयीकरितां अल्प किमतींत देण्याचें हेतूनें हा आक्ट छापण्याचें काम आह्मी ज्यारीनें ठेविलें आहे. लोकांचे सवडीप्रमाणें सर्वांस हा कायदा उपलब्ध व्हावा एतदर्थ आह्मी ह्याच्या चार तऱ्हा निरनिराळ्या किमतीनें केल्या आहेत त्या खालीं लिहिल्याप्रमाणें:—

१. साध्या कागदावर सेडयूल सुद्धां नुसता कायदा किंमत ६ आणे ( नुसता शिवलेला. )

२. सदर्हू टिपा सगट किंमत ८ आणे.

३. जाड कागदावर नुसता कायदा किंमत ८ आणे ( नुसता शिवलेला )

४. जाड कागदावर टिपासह किंमत दहा आणे चांगलें बायडिंग केलेले व प्रत्येक पानां आड कोरें पान घातलेलें दोन्ही जातींचे प्रतीस प्रत्येकी दोन आणे ज्यास्त पडतील व टपाल हाशिलाबद्दल २ आणे ज्यास्त पडतील. तारीख २८ सप्तंबर सन १८७७ इसवी.

महादेव बल्लाळ नामजोशी
किरण छापखान्याचे मालक

* टीप— शेडूलसुद्धां नुसता कायदा ता. ६ रोजीं पैसे भरणारांस मिळेल.

या पुस्तकासंबंधी पैसे भरणें तेः—

मुंबई— गोपाळ नारायण अँड को बुकसेलर्स काळबा देवीरोड

रत्नागिरी— गणेश दादाजी देशमुख गव्हरमेंट प्रासिक्युटर

ठाणें शंकर रामचंद्र भागवत असिस्टंट मास्तर इंग्लिश स्कूल

अलीबाग— सत्यसदनकर्ते

पुणें— रावजी प्रभाकर भावे ट्रान्सलेटर फ. क्ला. सबजज्ज

महादेव बल्लाळ नामजोशी किरण छापखान्याचे मालक.

नगर— गंगाधर गणेश धनेश्वर असिस्टंट मास्तर सरकारी मराठी शाळा नं. १

सातारा— शुभसूचक कर्ते

कोल्हापुर— कृष्णाजी गोपाळ भावे हेडमास्तर ट्रेनिंग कालेज,

## नोटिसा.

रूपाबाई जवजे मुलतानचंद मारवाडी वस्ती पिंपळगाव इला खालीं सही करणार नोटिस देतो ऐसीजे तारीख २३ सप्तंबर सन १८७७ इसवीचे वऱ्हाडसमाचार पत्रांत नोटिस दिली ती सर्वस्वी खोटी आहे मयत तुमचा नवरा मुलतानचंद याचे व आमचे शराकतींत असलेले दुकानाबद्दल तुह्मी व तुमचा मुलगा बजरंगलाल व तुह्मी दिलेल नोटिसींत तुमची सही करणार गोकुलचंद तुमचा चुलत सासरा व आणखी तुह्मी पंच वगैरे बोलावून सर्वां समक्ष व शराकतीचे दुकानाचा हिशेब पाहून शराकत तोडली व त्याबद्दल बह्यांत नोटिसींत दस्तुर करणारा तुमचा सासरा गोकुळचंद यांनीं स्वहस्तानें जमा खर्चेही केला आहे व परस्पर पावती फारकतीही झाली. फारकतीचा स्टांप सुद्धां तुमचा सासरा गोकुळचंद याणींच तुमचे मुलाचे नांवें खरिदी आणूनें फारकतीही तुमचे मुलाचे नांवें तुह्मी व तुमचे सासेर गोकुळचंद यांणीं दिली त्यावरही तुमच्या सासऱ्याची साक्ष आहे व आमचे पासूनही फारकती लिहून घेतली असतां विनाकारण तुह्मी दुसऱ्याचे नादी लागून खोटी नोटिस देता व तुह्मी फिर्याद कराल तर खर्चानें बुडाल यांत संशय नाहीं. विनाकारण तुह्मी नोटिस देण्याचा प्रसंग आणला यास्तव नोटिसीचे खर्चाचे रुपये तुह्मी द्यावे नाहीं तर कायदेशीर तजवीज केली जाईल. कळावें तारीख ९ अक्टोबर सन १८७७ इसवी.

( सही ) जयसिंग हंसराज दुकान पेठ
खामगाव याजकडून गोविंद रामचंद्र गुमास्ते
दस्तुर खुद्द

---

### नोटिस.

बापू वलद अंबरसिंग पाटील रहाणार वडगाव परगणे पंचगव्हाण तालुके अकोट यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं वडगाव हा गाव तुमच्या आमच्या मोकदमीचा व पांडेपणाचा आहे व तेथील वहिवाट पुष्कळ दिवसापासून आमचा बाप व आह्मीही करीत आलो व रा. रा. मारोती रामचंद्र गुमास्ते याजपासून वृत्ती घेत आलो. पण माझा बाप वारल्यापासून आपण एकटेच काम चालविता व सरकारही गावचे मानानें एकच पाटील बस आहे ह्मणून ह्मणते तगी वृत्ती आमची हिसकून घेतली असे नाहीं व पांडेपणाचा हक्क आमचा आह्मास मिळावा पण तो सन १२८५ फसली सालचा तुह्मी आह्मास न देतां एकटेच घेऊन बसला तें बरोबर नाहीं करितां सदर्हू सालचा हक्क आमचा आह्मास देऊन आमची पावती घ्यावी व आमच्या बापाचे नाव पांडेपणाचे मुक्त्यार पत्रावर जसें दाखल होते तसें आमचेही नाव दाखल करून घ्यावें हें तुमच्या कर्तबगारीस योग्य आहे कारण पांडेपणाची वृत्ती तुमची आमची समाईक आहे. याप्रमाणें तुह्मी न केल्यास रीतीप्रमाणें सरकाराकडे तजवीज करावी लागेल. कारितां आपसात निकाल करावा हें बरें आहे येणेंकरून तुमचा व आमचा खर्च वाचेल नाहीं पेक्षां एकंदर खर्च तुह्मास द्यावा लागेल. कळावें तारीख ८ अक्टोबर सन १८७७ इसवी.

( सही ) माधोजी वलद नारायण पाटील दस्तुर खुद्द हातचा

---

### नोटिस.

सेगी मर्द इसराम उमाळे माळी रहाणार पातुर शेखबाबु तालुके बाळापुर जिल्हे अकोलें इनला खालीं सही करणार याजकडून नोटिशीचें उत्तर देण्यात येते कीं, तूं मजला तारीख ३० माहे सपटेंबर सन १८७७ इसवी रोजीं नोटिस दिली ती सर्व खोटी आहे. व तूं ९ वर्षे आपले बापाचे घरीं राहिलीस तर तूं आपले खुषीनें राहिली आह्मी कांहीं तुजला टाकून दिले नाहीं. व तूं मेहरबान डनलाप साहेब यांजकडेस अन्न वस्त्राबद्दल फिर्याद केली त्याजवरून साहेब बहादूर यांनीं विचारिलें कीं, तूं याचे एथें रहाण्यास खुषी आहे किंवा नाहीं तर तूं तेथें सांगितलें कीं, मी त्याचे जवळ रहाण्यास खुषी आहे. व हल्लीं या नोटिशींत लिहिले आहे कीं, तूं पुरुषत्वात नाहीं ह्मणून ह्मणतें तर त्याप्रमाणें पंचानी मजला पाहून सांगितले कीं, तुझे ह्मणणें सर्व खोटे आहे. व तूं याचे एथें नांदण्यास जा ह्मणून सांगितले तरी तूं अद्यापपर्यंत आली नाहीं व दुसरा घरठाव करणार आहे ह्मणून लिहिले तर जो कोणी तुझ्याशी घरठाव करील त्याजला आह्मी करूं देणार नाहीं केलें असतां फौजदारींत फिर्याद करून जेलाची शिक्षा होईल कळावें तारीख ८ माहे आक्टोबर सन १८७७ इसवी.

( सही ) इसराम वलद रुनाजी
उमाळे माळी दस्तुर खुद्द.

---

### नोटिस.

रा. रा. मारुती रामचंद्र गुमास्ते कुळकर्णी मौजे वडगाव रहाणार वाडी अदमपुर तालुके अकोट यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येतें कीं, तुह्मी आमचे वडगावचे पांडेपणाचें काम गुमास्तेगिरीनें चालविता व तुह्मास मुकत्यारपत्र आह्मी दिलेलें आहे ह्मणून सरकारांतून सर्व हक्क तुह्मास मिळतो सन १८७५ पर्यंत पांडेपणाचा आमचा हक्क आह्मास दिला पण सन १८७६ फसलीचा दिला नाहीं तो ही नोटिस पावल्यापासून ४ दिवसांत आणून द्यावा नाहीं तर तुह्मावर फिर्याद करून रुपये घेऊं व तु

मचे मुकत्यारपत्र रद्द करून कळावें तारीख ८ माहे आक्टोबर सन १८७७ इसवी.

( सही ) माधोजी बल्लद नारायणजी पाटील मौजे वडगाव याचे हातची सही आहे.

वऱ्हाडसमाचार

मिति आश्विन शुध्द ८ शके १७९९

## हिंदुस्थानच्या हितार्थ झटणारे.

विलायतेंत कित्येक सत्पुरुष असे आहेत कीं, जे केवळ नीतीच्या दृष्टीनें हिंदुस्थानचें कल्याण पहाण्यास इच्छितात. प्रोफेसर फासेट साहेब याच कोटींतील आहेत. त्यांनीं हिंदुस्थानचें हितार्थ किती वेळां प्रयत्न केले आहेत ते वेळोवेळीं आह्मी आपले वाचकांस कळविले आहेत. हल्लींही त्यांनीं एके प्रसंगीं हिंदुस्थानच्या हितार्थ विलायतेंत भाषण केलें. त्याचा आशय असाः—

मद्रासेंतील दुष्काळास विलायतेंतील उदार लोकांनीं मदत करावी ह्मणून ड्यूक आफ एडिंबरो यांनीं त्यांस विनंती केली त्यावरून ठिकठिकाणीं सभा भरून विलायतेहून २९ लक्ष रुपये केवळ धर्मबुद्धीनें हिंदुस्थानांत आले आहेत. यासंबंधानें वर्गणी जमविण्याकरितां सालिस्बरी एथें सप्तंबरचे २० वे तारखेस सभा भरली होती तेव्हां प्रोफेसर फासेट साहेब तेथें होती त्यांनीं विलायतेंतील लोकांच्या या सदुद्योगाबदल व औदार्याबदल तारीफ केली व आणखी असें सांगितलें कीं विलायत सरकारानें आपले स्वतांचे खजिन्यांतून दाहा पांच कोटि रुपयांची हिंदुस्थानाला याबेळीं अवश्य मदत करावी. हिंदुस्थानावर जर आह्मी श्रीमंत झालों आहो आणि हल्लीं हिंदुस्थान दीन दशेप्रत आला आहे तर आपले सरकारचें कर्तव्यकर्म आहे कीं हिंदुस्थानास जरूरीपुरती रकम या वेळीं द्यावी. ह्मणजे त्याला कर्ज काढावें लागणार नाहीं किंवा जबरदस्त कर बसवावा लागणार नाहीं हिंदुस्थानांतील जंगल दिवसानुदिवस तुटत चाललें आहे त्यामुळें तिकडे पर्जन्य कमी पडतो व त्यामुळें वारंवार दुष्काळ पडतात तरी त्याकडून विलायतेस खर्चाकरितां प्रति वर्षी १६ कोटि रु. यावयाचे त्यांत कांहीं कमी होत नाहीं. शिवाय लष्करी खात्याची जी नवीन योजना झालेली आहे तिच्या योगानें दरसाल हिंदुस्थानावर तीन कोट रुपयांचा बोजा जास्त बसला आहे. इत्यादि प्रकार पाहिले असतां हिंदुस्थानच्या अडचणीच्या वेळेस त्याला इंग्लंडानें पैसे न द्यावे हें कोणतेही प्रकारें योग्य नाहीं. सबब याविषयीं विचार होईल अशी आह्मास फार उमेद आहे. याविषयीं पार्लमेंट सभा आपण होऊन गोष्ट काढील; नाहींपेक्षां आपण तिला या कामाकरितां एक कमिटी नेमण्याविषयीं विनंती करूं असें त्यांनीं त्या सभेंत आवेशपूर्वक बोलून दाखविलें.

कृपाळु परमेश्वर फासेट साहेबांचे शद्ब खरे करो. व त्यांच्या प्रयत्नास यश देवो असें आह्मी मनापासून इच्छितों.

## निजाम सरकारचा दुष्काळशमनार्थ उद्योग.

गुदस्त सालीं मुंबई व मद्रास इलाख्यांत दुष्काळ पडला तेव्हां आमच्या निजाम सरकारच्या राज्यांत सुबत्ता होती ह्मणून तिकडून बहुत धान्य दुष्काळाच्या मुलखांत जाऊन त्यास बरेंच सहाय झालें. परंतु दुःखाची गोष्ट ही कीं या वर्षी आरंभीं पर्जन्यानें निजाम सरकारचे मुलखांत ओढ दिली तेणेंकरून तिकडे अतिशय महागाई झाली व गोरगरीब उपाशीं मरूं लागले. तेव्हां निजाम सरकारानीं लोकांच्या बचावाची गोष्ट मनावर घेऊन लोकांस जगविण्याकरितां कांहीं कामें सुरू करण्याची तजवीज केली. व जे केवळ दुर्बळ ह्मणून कामास निरुपयोगी त्यांस पोसण्याकरितां अनाथ गृहें स्थापन करून त्यांतून त्यांस अन्न देऊन कोणासही मरूं दिलें नाहीं. हें निजाम सरकारचें औदार्य मनांत आणून आह्मी त्यांची तारिफ करितो व ही पुत्रवत् प्रजा पालनाची त्यांची सद्बुद्धी निरंतर जागृत राहून इतर राजे लोकांस ती उदाहरण होवो असें आह्मी इच्छितों.

निजामसरकारचे राज्याचे १७ जिल्हे आहेत त्यांतून ७ जिल्ह्यांत प्रस्तुतचा दुष्काळ आहे. ते जिल्हे कोणते, त्यांचें क्षेत्रफळ किती आहे, त्यांतून दुष्काळ किती परिघांत आहे, त्या त्या जिल्ह्याची लोकसंख्या किती आहे, व त्यांतून किती लोक दुष्काळाचे तडाक्यांत सापडले आहेत त्याचें टिपण याप्रमाणें आहे.

| | क्षेत्रफळ मैल | पैकीं दुष्काळग्रस्त | लोकसंख्या | दुष्काळगस्त लोक |
|---|---|---|---|---|
| गुलबर्गा | ३४५६ | २६७ | १९८०२३ | ७०३७० |
| सुरापुर | २६१२ | २५२ | २७२३४५ | ६४१०५ |
| पूर्व रायचुर | २७५२ | २५२ | २९९४८० | २६१५१ |
| पश्चिम रायचुर | ३२६४ | १२४५ | २६१९११ | १६२१५२ |
| नळदुर्ग | २४२० | ४१६ | २६७१८० | ४०००० |
| वालगोंडा | ७४२४ | ७७१ | २२६६१९ | ४०२३८ |
| बीड | ४०९६ | ४५४ | २५८३३८ | ४०२१९ |
| | २६०२४ | ३६६७ | ५०७०८०६ | ३९७६२४ |

यावरून दिसून येईल कीं सुमार च्यार लक्ष लोक दुष्काळाचे तडाक्यांत सापडले आहेत. आतां हे सर्वच निर्धन व निराश्रित असतील असें नाहीं यांतून कित्येकांस आपले पोषणास ताकद असेल, कित्येक सरकारचे व इतर धनिकांचे आश्रित असतील आणि बाकीचा भाग मात्र केवळ ईश्वरावर हवाला ठेवून असेल. तर त्यांकरितां निजामसरकारानें कामें काढिलीं त्यांची आगष्ट महिन्याच्या अखेर पंध्रवड्याची आह्मांस माहिती मिळाली आहे त्यावरून समजतें की दररोज सुमार तीस चाळीस हजार मिळून पंध्रा दिवसांत ४१८०९९ मनुष्यांच्या कामाची संख्या सरकारचे रजिस्टरीं दाखल झाली आहे. व त्याकरितां ४८६६०॥≡। खर्च झाला आहे. दुष्काळाच्या सुरवातीपासून रिलिफकामावर मनुष्य लागले त्यांची आगष्ट अखेर पावेतों दररोजची मिळून येकंदर बेरीज ९३१२२३१ आहे व त्यासाठी खर्च ६९११४७॥≡॥ झालेला आहे. कामें करण्यास अशक्त अशा लोकांस धर्मार्थ अन्न वाटण्यासाठीं जीं घरें केलीं आहेत त्यांत आगष्ट अखेर येकंदर लोकसंख्या १३७७०९१ झाली व त्यांकरितां १४६९९६॥—॥ खर्च झाला. व अजून दोन्ही प्रकारचीं कामें जारी आहेत. व ईश्वरकृपेनें पर्जन्यही तिकडे पडला आहे तेव्हां केवळ सरसाल दुष्काळ राहील असें दिसत नाहीं.

### पर्जन्याची आनंदकारक खबर.

६ वे तारखेपासून ९ वे तारखेपावेतो बहुत ठिकाणीं उत्तम पाऊस पडला अशीं तारायंत्रांतून वर्तमानें आलीं आहेत. दोन इंचापासून कोठेंकोठें दहा इंचही पाऊस पडला व अजून पडत असल्याचें वर्तमान आहे. अयोध्या, वायव्यप्रांत, वऱ्हाड, नागपुर, बिहार, गुजराथ, राजपुताना, मध्य हिंदुस्थान आणि पंजाब इतक्या प्रांतांत या आठवड्यांतील पर्जन्याची व्याप्ती आहे. येणेंकरून सुकत आलेल्या खरिपाचा व बागाईताचा चांगला बचाव झाला. आतां गुरास चारा लवकरच पुष्कळ होईल. बहुत गाव सोडून निघून आलेले लोक पुन्हा आपआपले गावीं तडक जाऊं लागले आहेत व शेती कामाचा झपाटा सुरूं झाला आहे. धान्याचे दर चोहोंकडे उतरले. आग्रा एथें गहूं बारा शेरांनीं मिळूं लागले. लखनौ प्रांतांत हरदुई एथें १० इंच पाऊस पडला. भरतपुरास ७॥ इंच पडला. व दरभंगा, बरेली, मुरादाबाद, निमच आणि दुसरीं कित्येक ठिकाणें एथें सात सात इंच पाऊस पडला. मद्रास इलाख्यांत ही या आठवड्यांत एक इंच, दोन इंच असा सर्वत्र पाऊस पडला. ही मोठी आनंदाची गोष्ट होय.

### (लिहून आलेला मजकूर )

असलेल्या दुष्काळांत किमानपक्षीं पांच लक्ष लोकांची आहुती झाली असा बहुतेक वर्तमानपत्रांचा अंदाज आहे. हा अंदाज खरा असेल तर आपल्या या आर्यभूमीच्या बालकांच्या राज्यकर्त्यांच्या अव्यवस्थेने व गैरमाहितीनें उद्भवणाऱ्या दुःख मालिकेचा अद्याप शेवट झाला नाहीं असें ह्मणण्यास अधिक उदाहरणांची गरज आहे काय? सुरस शद्बांनीं मोह पाडणारे अनेक गौरवर्ण, तसेंच त्यांचे असंख्य अनुयायी कृष्णवर्ण इतिहासकर्ते आह्मास वारंवार मधुर शद्बांनीं ह्मणतात. अहो आर्य पुत्रहो, स्वच्छंद वागणाऱ्या अनेक शिखानष्ट राजांनीं तुमचा छळ केला; तुमचे घरची अपार संपत्ती तुह्मापासून हिरावून नेऊन तिचा अति निंद्य मिजासी भोगण्यांत व्यय केला; न्यायमार्गाकडे पाठ करून तुह्मास अपरिमित क्लेश दिले; तसेंच त्यांच्या मागून राज्यपद पावलेल्या तुमच्या देशबंधूनींही तुमच्या खऱ्या कल्याणाकडे नजर पुरविली नाहीं; ऐषआरामांत, खाण्यापिण्यांत आणि गाणें नाचणें ऐकण्यांत आणि पहाण्यांत त्यांनीं आपला अमोल्य काळ घालविला; हल्लीं मात्र त्यांच्या मागून आलेले तुमचे पाश्चिमात्य राज्यकर्ते तुमच्या सुखासाठीं परोपरीनें झटतात तुमची जगदश्विरास दया येऊन त्यानें तुह्मास दुःखाच्या एका मागून एक येणाऱ्या लाटापासून बाहेर काढण्यास यांना पाठविलें आहे, या साठीं तुह्मी परमेश्वराचे आभार माना आणि या राज्यकर्त्यांचे उपकार विसरूं नका. वाचकहो आपणास अज्ञान सागरांतून काढण्याकरितां इंग्लिश राज्यकर्त्यांनीं जे असंख्य उपाय योजिले आहेत, युरोपखंडांत प्रगट झालेल्या ज्ञानभांडाराचा आपणास लाभ करून देण्याकरितां त्यांनीं खटपटी केल्या आहेत व आणखीही करीत आहेत. आगगाडी, तारायंत्र, छापण्याची युक्ती, वर्तमानपत्रद्वारें बातमी कळविण्याचा प्रकार अशीं त्यांच्या प्रसादानें आपणास लब्ध झालेलीं मनुष्याच्या सुखाचीं साधनें यांचा विचार केला असतां त्यांचे उपकार मानण्यास पुष्कळ कारणें आहेत असें ह्मटल्यावाचून कोणाच्यानेंही रहावणार नाहीं. परंतु निरंतर सावध, लोकहिताकरितां सर्व प्रकारें झटणार अशा या इंग्लिश सरकारच्या अमलांत दुष्काळरूपी चोरानें पांच लक्ष मनुष्यें यमसदनास पाठवीतोंपर्यंत सरकारानीं तिकडे डोळेझाक करावी ही केवढी दुःखाची गोष्ट आहे बरें? ज्या राज्यामध्यें एक मनुष्य देखील मरण पावला असतां सरकारी कामगाराच्या कांहीं अपराधामुळें किंवा हयगयीमुळें मरण पावला की काय याची चौकशी होते त्या राज्यांत पांचलक्ष मनुष्यें मरेपर्यंत डोळेझाक व्हावी हें प्रजेच्या दुर्भाग्याचेंच लक्षण असें ह्मणण्यास काय हरकत आहे? सन १८६६ सालीं ही अशाच महाभयंकर दुष्काळानें ओरीसाप्रांतांत कहर केला. दहालक्ष लोक अन्न अन्न करून प्राणास मुकले; लोक देशोधडी झाले, गावेंच्यागावें आणि प्रांतच्या प्रांत ओसाड पडले तरी सरकारास तिकडे लक्ष पुरविण्यास झालें नाहीं; मग सर्व पावरा धावर झाल्यावर, मृत्यूनें सर्व देशभर यथेष्ट धुमाळी उडविल्यावर सरकार जागें झालें. नंतर हा अनर्थ कोणाच्या अपराधानें झाला याची चौकशी करण्याचें कमीशन बसविलें, आणि लोक

कल्याणाकडे आह्मी फार नजर पुरवितों असें लोकांस दाखविलें.

---

## आमच्या लोकांची उदासीन व शिथिलपणाची स्थिति.

( सुबोधपत्रिकेंतून. )

आलीकडे आमच्या लोकांच्या स्थितीचा विच्यार करूं लागलें असतां सर्वत्र उदासीनपणानें भरलेले दिसतात. लोकांमध्यें हालचाल कोठें दिसत नाहीं आणि या जगाचा तर एकंदर सिद्धांत असा आहे कीं, हालचालीवाचून स्वाभाविक द्गुण रहात नाहीं. मग सद्गुणाची वृद्धि होण्याविषयीं तर बोलावयासच नको. जनसमूह हा केवळ समुद्राप्रमाणें आहे आणि समुद्रांत नेहमी हालचाल असते व त्यामुळें त्यांतील पाणी स्वच्छ राहून हवा सर्वांस हितावह होतें. तद्वत् जनसमूहामध्यें जेथें नेहमीं हालचाल असते त्यांजमध्यें पाणी राहून त्यांचा उत्कर्ष होतो; परंतु आमच्या देशांतील लोकांमध्यें अलीकडे औदासिन्य व सर्व प्रकारचें शैथिल्य उत्पन्न झाले आहे. जिकडे पहावें तिकडे एकाकीपणा, उदासवृत्ति व स्वस्यता अथवा ग्लानी हीं दृष्टीस पडतात. यामुळें लोकांमध्यें स्नेहभाव, ऐक्य, विच्यार, ईर्षा, उत्सुकता यांची वृद्धि तर एकीकडेच राहिली; परंतु त्यांचा अभावच होऊं पहात आहे. आतां लोकांची साधारण स्थिति केवळ एकाद्या ओढ्याच्या कांठच्या वाळवंटाप्रमाणें झाली त्यांतील वाळूचे कण निरनिराळे असून जसा त्यांचा एकमेकाशीं संबंध किंवा त्यांत स्नेहाळूपणा अथवा द्रव नसतो व त्यांस एक्या घाण्यांत घालून पिळलें तरी तेला प्रमाणें स्निग्ध व स्नेहाळ पदार्थ उत्पन्न होत नाहीं व परस्परांस परस्परांचा उपयोग होत नाहीं, त्या प्रमाणें तूर्त आमच्या लोकांची स्थिति झाली आहे. फार झालें तर वाळूचे कण जसे चुन्याच्या घाणींत घातले असतां चिरडून नाहींसे होतात त्याप्रमाणें आमच्या लोकांची दशा व्हावयाची वेळ आली आहे. आतां ही स्थिति आपल्या देशास व आपल्या लोकांस इष्ट व हितावह आहे किंवा कसें याचा विच्यार प्रत्येक मनुष्यास करणें अवश्य. परंतु आमच्या देशाच्या दुर्दैवानें व पूर्वापार चालत आलेल्या अनंत अनिष्ट वहिवाटीमुळें लोकांच्या बहु समाजामध्यें पूर्ण अज्ञान वास्तव्य करीत आहे या कारणानें त्यांस हिताहिताचा विचार करण्यास सामर्थ्य व समजूत नाहीं आणि जगद्गुरूसारिखे अधिकारी, ज्यांचा, असले विचार करण्याचें कर्तव्य होय, त्यांचा या गोष्टीकडेस कल व इच्छा नाहीं तेव्हां हा विचार करण्याचें काम लोकांपैकीं ज्यांस शिक्षण मिळून समजूत प्राप्त झाली आहे त्यांचेंच आहे. यास्तव लोकांमधील अज्ञान व औदासिन्य जाऊन हालचाल उत्पन्न होऊन देशाच्या व लोकांच्या उत्कर्षाविषयीं विच्यार व उद्योग या नवीन शिक्षण मिळालेल्या लोकांनींच केला पाहिजे. परंतु आह्मांस लिहिण्यास अतिशय वाईट वाटतें कीं, या सुज्ञ व सुशिक्षित ह्मणविणाऱ्या लोकांतही तोच औदासिन्याचा, शैथिल्याचा व ग्लानीचा प्रकार दिसावयास लागला आहे. ते लोक फक्त आपापल्या एकेकट्या पुरता विचार करितात आणि तो विचार देखील सरासरी स्वताचा चरितार्थ व चैन एवढ्या पुरतांच करितात असें दिसतें. आतां या लोकांची जर वाळवंटांतील वाळूच्या कणांप्रमाणें स्थिति होईल तर पुढें या देशांत व यांतील लोकांस उदयाची आशा कोठें राहिली आहे असें नाहीं. उदीम, धंदा, शारीर व मानासिक ज्ञान, सामर्थ्य, धर्म, इत्यादि गोष्टींचा विचार व उद्योग कसे चालू होतील व व्हावे हें आह्मांस समजत नाहीं. शारीर सामर्थ्य, आनंद, व स्नेह वर्धक खेळांच्या वगैरे मंडळ्या नाहींत. विद्या, विचार, ज्ञान व शहाणपण वाढविण्याकरितां उद्युक्त सभा यांचाही अभावच आहे. राजकीय, व्यापार, नीति व धर्म संबंधाचें स्वातंत्र्य व विचार यांची प्रवृत्ति व प्रसार होण्याकरितां साधनें व मार्गही नाहींत. आतां या प्रकारां पैकी कोठें कांहीं आहेत ते केवळ असून नसून सारखेच आहेत त्यांजमध्यें उत्सुकता, पाणी व योग्य हालचाल हीं सापडत नाहींत, याजमुळें त्यांचा देशास व लोकांस कोणत्याही प्रकारचा फायदा होत नाहीं. तेव्हां हें औदासिन्य व शैथिल्य यांचा नाश होऊन हालचाल आपल्या लोकांमध्यें कशी व्हावी याजविषयीं विचार करण्याविषयीं आह्मी आपल्या सुज्ञ व सुशिक्षित देशबांधवांस विनंती करतों.

---

## वऱ्हाड.

---

या आठवड्याच्या आरंभीं एक रात्र येथें चांगला पाऊस पडला. व अजूनही सायंकाळची तलखी फार होते त्यावरून एकादा पाऊस पडेल असें वाटतें, पाहाटे थंडीही येकादे दिवशीं पडत असते.

---

मे० जोन्स साहेब कमिशनर वाशिमाहून गेल्या शनिवारीं आले ते रविवारीं सकाळीं गाव पाहण्यास आले होते. बरोबर जुडिशियल कमिशनर साहेब, डिपुटी कमिशनर साहेब व असिस्टंट कमिशनर दस्तुर बहिमनजी साहेब होते. सर्व रस्त्यांनीं सावकाश चालून त्यांनीं गाव व पेंठ पाहिली. व दोनप्रहरचे गाडींतून उमरावतीकडे गेले. आसाहेबाची स्वारी वाशिमास जातांनां व परत आल्यावरही येथें रहदारी बंगल्यांत उतरली होती.

---

आह्मास लिहिण्यास संतोष वाटतो कीं, हिंदुस्थान सरकारानें दहा बेसनदी कामदारांस असिस्टंट कमिशनरच्या जागा खालीं होतील तसतशा द्याव्या असें मंजूर केलें आहे त्यांत आमचे एथील एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर मि० डेविस साहेब यांचे नाव आहे. व यावरून आह्मी त्यांस लवकरच असिस्टंट कमिशनर झालेले पाहू अशी उमेद आहे,

---

वऱ्हाडमित्रांत लिहिलें आहे कीं कामिशनर साहेब उद्या परवा चिखलदऱ्यास जाणार आहेत व सदर स्टेशन तेथें किंवा इलिचपुरास होण्याची बोलवा आहे.

---

जुडिशियल कमिशनर साहेबाची स्वारी सेशनाकरितां उमरावतीस गेली आहे.

---

मि. एदलजी साहेब अक्याची रजेवर गेले होते ते परत येऊन आपले कामावर रुजू झाले.

---

आह्मास लिहिण्यास वाईट वाटतें कीं रा. रा. बाळकृष्ण लक्ष्मण शास्त्री बापट उमरावतीचे डिपुटी इन्स्पेक्टर यांचे घरीं चोरी होऊन सुमार १२०० रुपयांचा विषय गेला. चोरीचा पत्ता अजून लागला नाहीं.

---

रा. रा. श्रीराम भिकाजी जटार इजुकेशनल इन्स्पेक्टर उमरावतीच्या हायस्कुलाची परीक्षा घेण्याकरितां गेले रविवारीं गेले होते ते काल परत आले. रा. ब. नारायण भाई डायरेक्टर यांनीं एथील हायस्कुलाची या आठवड्यांत परीक्षा घेतली.

---

रा. रा. वामननराव बाळाजी ओझरकर वाशिमचे डिपुटी इन्स्पेक्टर ९ दिवसांची रजा घेऊन एथें आले व मित्रमंडळीस भेटण्याकरितां उमरावतीस वगैरे जाऊन परत आले. आज वाशिमास जातील.

---

बडोद्याचा एक पैलवान एथें आला आहे तो कसरतीचा खेळ चांगला करितो. मिडल क्लास स्कुलापुढें काल त्याचा खेळ झाला आज डायरेक्टर साहेबांकडे होणार आहे.

---

इचलकरंजीकर नाटकवाले यात्रेचा हंगाम साधण्याकरितां देऊळगावास जाणार होते परंतु पाऊस पडून रस्ते खराब झाल्यामुळें गेले नाहींत. दिपवाळीपर्यंत एथेंच रहातील.

---

डा० लिटल साहेब व डा० रीड साहेब कांहीं कामाकरितां उमरावतीस गेले आहेत ह्मणून ते परत येईपर्यंत त्यांचीं कामें डा० अप्पा कानू सिनियर सबार्डिनेट यांनीं पहावीं असा त्यांस हुकूम झाला आहे.

---

वाशिम जिल्ह्यांतून मोघ एथून पत्र आल्यावरून समजतें कीं, हस्त नक्षत्र लागल्यापासून पर्जन्य बरा पडत आहे. परंतु तो चोहोंकडे सारखा पडत नाहीं गावांत आहे तर त्याचेच सिंवेवर बिलकूल नाहीं. गुरांस रानांत चारा बरा झाला आहे परंतु पाणी पिण्यास अद्यापपर्यंत मिळत नाहीं हल्लीं बरसातींत पाण्याची ही दशा तेव्हां पुढें उन्हाळ्यांत काय होईल कळत नाहीं.

एथें सरकारी शाळेंत मुलांची संख्या बरीच आहे परंतु मास्तराचे हाताखालीं असिस्टंट नसल्यामुळें अभ्यास चांगला चालविणें त्याचे शक्ती बाहेर आहे करितां मेहेरबान डायरेक्टर साहेब यांणीं कृपा करून त्यांचे मदतीस असिस्टंट दिल्यास शाळेची स्थिति चांगली सुधारेल असें पत्र पाठविणारा ह्मणतो.

---

इलिचपुर— हस्त नक्षत्रानें गर्दी करून दिली आहे. शनिवारीं रात्रौ पर्जन्य पडण्यास आरंभ होऊन सोमवार प्रातःकाळपर्यंत सुमारे ३ इंच झाला, जिकडे तिकडे या पावसानें आनंद करून दिला. धारणेचे भावांत ही मंदाई. ज्वारीचे पिकास हा पाऊस फारच फार उपयोगी पडून पुढें रब्बीचे पिकासही चांगला झाला. आतां पर्जन्य न पडल्यास हरकत नाहीं असें शेतकरी लोकांचे ह्मणणें आहे. रोगराई ह्मणण्यासारखी नाहीं.

---

मि० शेषाचलम तहशिलदार तालुके वणी यांनीं तीन महिन्यांची रजा घेतली व त्यांचें काम पहाण्यास मि० किसोरखा यांस नेमिलें असें कळतें. प्र. सि.

---

## वर्तमानसार.

---

खांडव्याहून आह्मास पत्र आलें आहे त्यावरून समजतें कीं तिकडे गेले आठवड्यांत ४।५ दिवस चांगला पाऊस पडला. तेणेंकरून सर्वांस आनंद झाला व धारणही बरीच उतरली. गहूं १० शेर, तांदुळ ७ शेर, तुरीचीदाळ ७ शेर, तूप १। शेर असा भाव आहे.—इंदुरास जाणारे लोक आगगाडींतून येथें उतरत असतात. तिकडे इतके दिवस वाखयाचा उपद्रव होता पण पाऊस पडल्यापासून त्याची शांती झाली आहे. येथें तापाची सांथ आहे. दरयेक कुटुंबांत येकादा तरी मनुष्य आजारी आहेच, दगावत मात्र नाहीं एवढीच संतोषाची गोष्ट आहे. येथील डाक्टर या कामीं चांगली मेहनत घेतात. येथें पुणेकर नाटकवाले आहेत त्यांचा पहिला खेळ प्रमिळास्वयंवर हा झाला. दोन आठवडे राहून ते पुढें जाणार आहेत.

मद्रास इलाख्यांत दुष्काळ संबंधी कामाची नवीन व्यवस्था लवकरच सुरू होणार. जे अतिशय दुबळे असतील त्यांस मात्र धर्मार्थ अन्न मिळेल बाकी कोणास मिळणार नाहीं. पब्लिकवर्क्स खात्याच्या मार्फत त्या लोकांकरितां कामें काढिलीं जातील. आठवड्यांत ६ दिवस काम घेतील. रविवारीं काम घेणार नाहींत व त्या दिवसाची मजुरीही देणार नाहींत. सशक्त मनुष्यास अच्छेर धान्याची किंमत व बरदीड आणा देतील. बायकांस तितकेंच धान्य व एक आणा, मुलास पावशेर धान्य व पाऊण आणा मिळेल जे फार सशक्त नाहींत अशा मनुष्यास अच्छेर धान्य व एक आणा, बायकांस तितकेंच धान्य व पाऊण आणा, मुलास पावशेर धान्य व अर्धा आणा; सातवर्षांच्या आंतील मुलास आयांजवळ कामाचे वेळीं राहूं देणार नाहींत त्याकरितां पोषणगृहें केलीं आहेत तेथें त्यास पोशिलें जाईल. जेव्हां पाऊस पडत राहून कामास हरकत होत जाईल तेव्हां सशक्त मनुष्याला अशक्त मनुष्याचे दर दिले जातील. व अशक्तास दोन पै

कमी मिळतील. सशक्त मनुष्यापासून एरवीच्या कामाच्या पाउणपट व अशक्तापासून निमें काम घेतलें जाईल. कमी काम केल्या बद्दल दंड केले जातील.. व दांडगाई बद्दल कामावरून काढून दिलें जाईल. पगाराची वाटणी तीन तीन दिवसांनीं केली जाईल.

नामदार व्हाइसराय साहेब नोवेंबरचे पहिले आठवड्यांत सिमल्याहून निघणार आहेत. ते रजपुत संस्थानांत जाऊन अलवार, जयपुर, अजमीर आणि भरतपुर एथें बहुधा जातील. व नंतर ग्वालेरीसही जाऊन येतील.

मुंबईचे गव्हरनर सर रिचर्ड टेंपल साहेब गेले आठवड्यांत अहमदनगराकडील स्थिति पहाण्यास गेले होते. ते आतां पुण्याकडून मुंबईस जातील व तेथें थोडे दिवस राहून काठेवाड आणि सिंधप्रांत पहाण्याकरितां निघतील असें कळतें.

मुंबई शहरांत दुष्काळ मुलखांतून ८०००० मनुष्य गेलें आहे व दररोज सुमार ५०० लोक अजून जात आहेत. रिलिफकामिटीनें आलेलीं मनुष्यें त्यांचे त्यांचे ठिकाणीं परत पोंचविण्याची तजवीज चालविली आहे.

मुंबईस गेले आठवड्यांत ३ दिवस फार मोठा पाऊस पडला. अक्टोबर महिन्यांत असा पाऊस १५ वर्षांत पडला नव्हता असें ह्मणतात.

गुजराथेंत महागाई फार झाली आहे. गुरांस वैरण न मिळाल्यामुळें बहुत लोक आपलीं गुरें विकीत आहेत पण नुकतेंच तारायंत्रांतून वर्तमान आलें आहे कीं, भडोच, भावनगर आणि सुरत एथें मोठा पाऊस पडला.

मुंबई इलाख्यांत दुष्काळ संबंधी कामावर २०९००० मनुष्यें आहेत व धर्मार्थ अन्न ९१००० मनुष्यांस दिलें जातें. मद्रास इलाख्यांत कामावर ६१४६२५ मनुष्यें आहेत व सुमार १५ लाखाहून अधिक मनुष्यें धर्मार्थ अन्नावर निर्वाह करून आहेत.

कलकत्यास मद्रासेकरितां ४०००० रुपये वर्गणी जमली आहे.

मद्रासेकडे ईशान्य दिशेचा पाऊस सुरू झाला यंदा बारमाहा पेक्षां हा १० दिवस आधी आला.

वायव्य प्रांतांत धान्याच्या चोऱ्या होऊं लागल्या आहेत. त्यावरून सरकारास अवश्य झालें आहे कीं अशा खटल्याची चौकशी जूज करीत जावी ह्मणून ठिकठिकाणचे अधिकाऱ्यांस हुकूम द्यावे.

अमदाबादेहून पालनपुरापर्यंत रेलवे करावयाची तिची मोजणी सुरू झाली. दोनवर्षांत सर्व काम पुरें होऊन गाडी चालू होणार आहे.

धोंड मनमाड रेलवेच्या कामावर २९००० मनुष्य लागलें आहे. व जानेवारी महिन्यांत रेल घालून काम पुरें करण्याचा विचार आहे.

झांजीबारच्या सुलतानानें गुलामाच्या व्यापाराचा बंदोबस्त करण्याकरितां इंग्लिश सरकारास कांहीं जहाजे देणगी किंवा उसनवार ह्मणून मागितली होती पण सरकारानें देण्याचें ना कबूल केलें.

लखनौ शहरच्या आसपास गवताची फार महागाई झाली आहे. सबब तेथील घोडेस्वारांची छावणी दुसरे जागीं न्यावी असा तारायंत्रांतून हुकूम झाला आहे.

निजाम सरकारच्या स्टेट रेलवेवरील १० रुपयांचे आंतले नोकरांस महागाई भत्ता मिळावा असा ठराव झाला.

वायव्य प्रांतांत लोकांची फार आपदा झाली आहे. धान्य मिळत नाहीं. बहुत लोक घरें दारें व गुरें सोडून परागंदा होत आहेत.

## नोटिस

रा. तुकाराम वल्लद आकाजी टेकाळे रहाणार तालुके अकोट यास महादाजी वल्लद लक्ष्मण दुतंडे रहाणार पिंपरी तालुके जळगाव याजकडून नोटिशीचें उत्तर देण्यांत येते कीं, तुह्मी उर्दूअखबारांतून आह्मास नोटिशीनें कळविता कीं, ज्वारी तोट्यानें विकली तो तोटा तुह्मी भरून द्यावा. हें तुमचें लिहिणें फार गैर आहे. कारण प्रथम तुमचा आमचा जवारीचा मोघम सवदा झाला व २५ रुपये बयान्या बद्दल तुह्मास रोख दिलेही. व बाकीचे जवारी विकून द्यावयाचे होते पण दुसरेच दिवशीं भाव थोडा तेज झाल्यामुळें सर्व रुपये तुह्मी अगाऊ मागूं लागले ते माझ्यानें देववत नाहींत असें मी सांगितल्यावरून तुह्मीच पंचासमक्ष सवदा तोडून माझे बयान्याचे रुपये पचऊन बसले. व मला जवारी न देतां मजपेक्षां १ रुपया जास्त दरानें माळेगावकर मारवाड्यास तेव्हांच विकली व अगाऊ एकदम रुपये मला नगदी मिळेनात ह्मणून २५ रुपयांवर पाणी सोडून मी आपले घरीं स्वस्थ बसलो. या गोष्टीस सुमार १० महिने गुजरून गेले व मधें जवारीचा भाव तर पुष्कळ महाग झाला होता तरी तिकडे लक्ष्य दिलें नाहीं व तुह्मीही आजवर एक अक्षर काढलें नाहीं व आता तोट्याचे रुपये मागण्याची नोटिस दिली व आह्मास जबाब देणें भाग पाडलें करितां ही नोटिस पावल्यापासून १५ दिवसांत २५ रुपये नहाक पचवून बसले ते या नोटिशीच्या खर्चासह आणून द्यावे. याप्रमाणें न केल्यास नुकसानी बद्दल तजवीज करावी लागेल. कारण ही सर्व तुमची बेमानी आहे तुह्मी सवद्याप्रमाणें तेव्हांच जर जवारी मला मोजून दिली असती तर मला दोन पैसे मिळाले असते. कळावें ता० ९।१०।१८७७

( सही ) महादु वल्लद लक्ष्मण दुतंडे
याचे हातची निशाणी रेघ.

---

नोटिस.

माधोजी लांडे व करकाजी लांडे व रामजी लांडे रहाणार पारस तालुके बाळापुर यास खालीं सही करणार इजकडून नोटिस देण्यांत येते कीं, माझे वय ५५ वर्षांचे असून शरीर प्रकृती अस्वस्थ आहे व हल्लीं मी मांदगीत आहे माझा घटकेचा भरवसा नाहीं. माझा नवरा राघोजी ह्यास मरण्यास सुमारें २ वर्ष झाले तितक्याचे दरम्यान तुह्मी माझे अन्न वस्त्राची बिलकूल काळजी घेतली नाहीं. तसेच नवरा मयत झाला तेव्हां त्याजला सुमारें तीनशे पन्नास रुपये कर्ज होते. त्या कर्जाचीही तुह्मी व्यवस्था न केल्यमुळें मी झाडेगावकर मारुती वल्लद भगवान पाटील याजला शेते ५, अमराइसुद्धां माझे नावें असलेले माझे नवऱ्याचे हक्काचे रुपये ४९५ चारशें पंच्याणव ऐवजी फरोक्त करून त्याचे ताब्यांत दिलीं. व ते रुपये घेऊन मी सावकाराचे कर्ज फेडिले व राहिलेली बचत पंढरपुरास यात्रेस गेली तिकडे खर्च केली. तिकडून आल्यावर मी भगवान रामजी झाडेगावकर ह्यांचे एथें राहिले आहे कारण तुह्मी माझी अन्नवस्त्राची बिलकूल फिकीर ठेवित नसून माझे अंगात मोल मजूरी करून प्रपंच करण्याची ताकत ही नाहीं सबब भगवान पाटील ह्याची बायको ही माझे भावाची कंन्या असल्यामुळें आप्त संबंधानें त्याचे एथें राहिलें आहे. तुह्मास नोटिशीनें कळविण्याचें कारण इतकेंच कीं, कोणते वेळेस मला मरण येईल हा माझा भरवसा नाहीं. व मेल्यावर पुढें तुह्मी माझी जिनगी करितां सदरील भगवान पाटील ह्यांच्याशी तंटा कराल तर तुह्मास आतांच मी कळविते कीं, मजपाशी फक्त अंगावर पोलटे तोळे ४ व गरसोळी मासा दीडची याशिवाय दुसरें कोणतेच प्रकारचा माल नाहीं. मी जिवंत आहे तो पावेतो तुह्मी मजजवळ येऊन काय विचारावयाचे असेल ते विचारावे पुढें तुमचे भांडणे निरर्थक असें समजावें कळावें तारीख ५ माहे अक्टोबर सन १८७७ इसवी.

( सही ) मोहना मर्द राघोजी लांडे
वस्ती झाडेगाव निशाणी
खुद्द बांगडी.

---

नोटिस.

बळी वल्लद चिमणाजी फुलंबरकर सुतार रहाणार वाशीम यास खालीं सही करणार इजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तूं माझा लग्नाचा नवरा असून लग्न झाल्यास सुमार १५ वर्षें झालीं व मला कळू लागल्यास ९।१० वर्षें झालीं तूं मला वागवीत नाहींस याजवरून पंचानीं सात वर्षां पूर्वीं तिऱ्हाइताचे घरीं तुला मला ६ महिने ठेविलें होतें. त्या वेळीं असें आढळून आलें कीं तुला बायकोची गरज नाहीं. व तुजपासून संसारसुख मला व्हावयाचें नाहीं या गोष्टीविषयीं तुला विचारल्यावर तूं एकत्र होण्याविषयीं टाळाटाळ करूं लागलास व पळून जाऊं लागलास. पंचानीं तुला विच्यारल्यावर तूं फारकत देण्यास कबूल झालास पण अजून दिली नाहींस नंतरही दोन वर्षांनीं माझ्या चुलत्यानें तुला आपले घरीं शिवणीस आणलें व सहा महिनें ठेविलें तेथेंही तुह्मी वर्तणूक सदर प्रमाणेंच दिसून आली तूं पळून गेलास. त्या गोष्टीलाही पांच वर्षें झालीं त्यावरही आजपर्यंत बहुत वेळां तुला पंचांनीं बोलावणीं केलीं परंतु तूं आला नाहींस इत्यादि सर्व कारणावरून हल्लीं ही नोटिस दिली आहे कीं दहा वर्षें तूं मला पोटाला दिलें नाहींस त्याजमुळें चुलत्यानें दरसाल ५० रुपये प्रमाणें ५०० रुपये कर्ज खाण्यापिण्याचें झालें आहे हें रुपये ही नोटिस पावल्यापासून १५ दिवसांत रोख आणून द्यावें व मला घेऊन जावें. पोटगीचे पैसे माझे मला दिलेस व पुढें वागविण्याचे कबूल केलेस तर तूं कसाही असल्यास आई बापानीं गाठी घालून दिल्याप्रमाणें मी तुजजवळ रहाण्यास सिद्ध आहे. व त्याप्रमाणें तूं पैसे देऊन घेऊन जाशील तर मी बरोबर येईन आणि याप्रमाणें करावयाचें नसेल तर सदरील १५ दिवसांचें मुदतीचें आंत कायदेशीर रीतीनें फारकती लिहून पाठवून द्यावी ह्मणजे मी दुसरा घरठाव करीन. १५ दिवसांपुढें तूं रुपये दिले नाहींस, फारकत दिली नाहीं व जबाबही दिला नाहीं तर तुह्मी मला दुसरा घरठाव करण्यास कांहीं एक हरकत नाहीं असें समजून मी कायदेशीर रीतीनें दुसरा घरठाव करीन मग तुझा माझा अर्थाअर्थी संबंध रहाणार नाहीं. हें तुला अगाऊ कळविलें आहे. कळावें तारीख १० माहे अक्टोबर सन १८७७ इसवी.

[ सही ] सई मर्द बळी सुतर वस्ती
शिवणी प्रगणे वाशीम निशाणी
इचे हातची बांगडी

---

नोटिस.

कृष्णा वल्लद काशीबा जात कुणबी रहाणार भटमोगरें यास सोनी मर्द कृष्णा जात कुणबी रहाणार मौजे बाभुळगाव प्रगणे नायगाव तालुके यवतमाळ इजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तूं माझा लग्नाचा नवरा आहेस आज सुमार ४ वर्षें झालीं तूं मला आपल्या घरीं न नेतां दुसरी रांड ठेविली व मला टाकून दिलें. ह्मणून मी विद्यमान असिस्टंट कमिशनर साहेब बहादूर जिल्हे वणी यांजकडे अर्ज दिला. त्यावरून सरकारांनीं असा ठराव केला कीं माझे अन्नपाण्याचा व वस्त्राचा जो सावकारी खर्च चार वर्षांपासून झाला तो देऊन तूं मला घेऊन जावें. त्यावरून आतां या नोटिशीनें असें कळविण्यांत येतें कीं, आजवर माझ्या खर्चाचे सावकारी कर्ज झालें आहे तें देऊन मला घेऊन जावें. यासाठी ही नोटिस पावल्यापासून एक महिना तुह्मी वाट पाहीन. व मुदत संपतांच मी कायदेशीर तजवीज पाहीन. मग तुला करणें असेल तें करावें. कारण मुदत संपून एक दिवस जास्त झाला तर तुझा हक्क मजवर नाहीं असें समज तुला माझी गरज असल्यास मुदतींत खर्च देऊन मला घेऊन जावें करितां ही नोटिस अकोला वऱ्हाडसमाचार छापखान्यांत छापून प्रसिद्ध केली आहे. कळावें. तारीख ६ माहे आक्टोबर सन १८७७ इसवी.

(सही) सोनी मर्द कृष्णा कुणबीइचे
हातची निशाणी बांगडी.

---

हें पत्र अकोला एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ११ | अकोला, रविवार ता० २१ माहे अक्टोबर सन १८७७ इ० | अंक ४२


## वऱ्हाडसमाचाराची किंमत

| | रुपये |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ६ |
| सालअखेर | ७ |
| केरकोळ अंकास | ०४ |
| डाकहाशील | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| ,, अखेर | २ |

☞नवीन वर्गणीदार होऊ इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केले जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, १० ओळीचे आंत | १ |
| १० ओळीपुढे दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## जाहिरखबर.

### कर्जाऊ रकमा देण्याबद्दल.

आह्मी सर्वांस कळवितो की कांहीं कारणानें कांहीं दिवस बंद पडलेला आमचा व्यापार आह्मी विजयादशमीपासून पुन्हा सुरू केला आहे. तर कारकून लोक, साधारण नोकर लोक, शिपाई लोक व ओळखीचे असे कुणबी व इतर लोक यांस शेकडा दीड रुपयापासून दोन रुपयेपर्यंत व्याजाच्या दरानें त्यांची त्यांची लायकी पाहून दहा, वीस, पन्नासपर्यंत रुपये थोडे थोडे मुदतीपर्यंत कर्जाऊ देण्याचें काम त्यांस गरज लागेल तस तसें आह्मी करीत जाऊ, मनोती, बट्टा वगैरे कांहीं कापलें जाणार नाहीं व हप्तेबंदीच्या वसुलाप्रमाणें कटमितीचें व्याज आकारलें जाईल. तर ज्यांची इच्छा असेल त्यांनीं खालीं सही करणारास सदर्हू बाबदींत भेटून विचारावे. ता० १६ अक्टोबर सन १८७७ इसवी.

नारायण मोरेश्वर.

पत्ता— वऱ्हाडसमाचार छापखाना.

## नवीन मुदतीचा कायदा

( सन १८७० चा आक्ट १९ )

उपयुक्त समजुतीच्या टीपासुद्धां सदर्हू आक्ट तारीख २० माहे अक्टोबर सन १८७७ इसवीपर्यंत छापून तयार होईल. त्याची किंमत रुपये ०१ आणे व टपालखर्च ०२ आणे पडेल.

पुणें पेठ शनिवार
न्यायाश्रय आफीस
ता० ३।१०।७७ }

त्रिंबकराव नारायण
राजमाचीकर

## जाहिराती.

### नादारी प्रकरणीं नियम.

(वऱ्हाडाकरितां नवीन तयार झालेले.)

मे० जुडिशियल कमिशनर साहेब मुलूख अमानी हैदराबाद यांणीं नादारी संबंधी मागील नियमांत फेरफार करून नुकतेंच एक पुस्तक छापून प्रसिध्ध केलें. त्याच्या कांहीं प्रति विक्रीसाठीं आह्माकडे तयार आहित. किंमत आठ आणे पडेल. बाहेर गावचें घेणारास एक आणा डाक हाशील पडेल.

वऱ्हाडसमाचाराचे
मालक.

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्याच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

### लायब्र्या

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस —

वि० वि० महाराज, मी लायब्र्याचा मोठा शोकी आहे व देशपर्यटण करणारा आहे. नागपुर प्रांतांत, वऱ्हाड प्रांतात, व खानदेशांत मी फिरून आलो आहे व हल्लीं नेमाड प्रांतांत आहे. इतक्या ठिकाणच्या पांच पन्नास लायब्र्र्यांत मला एक उमरावतीची मात्र लायब्ररीची व्यवस्था व स्थिति उत्तम दिसली. बाकी ठिकाणीं कोठें वर्गणीदार कमी, कोठें लायब्ररीशीं व पत्रांशी गांट नाहीं, कोठें पत्रें मोठ्यांच्या घरीं जातांत, कोठें लायब्ररीला नोकरच नसतो, कोठें असला तर त्याला खासगी कामें पुरवतात, कोठें लायब्ररीला सारा वेळ कुलूप असतें, कोठें बजनदार अधिकारी व श्रीमान लोक आपल्याच घरीं पोस्टांतून परभारें पत्रें नेऊन फोडितात व किस्येक दिवस ठेवून फुरसत होईल तेव्हां वाचतात व पुढें आपल्या बरोबरीच्याकडे आपल्या अनुकूळ मजकुर असला तर पहाण्यास पाठवितात मग त्यांकडून परत आल्यावर तीं पत्रें लायब्ररींत येऊन पडतात. कोठें कनिष्ठ प्रतीचे वर्गणीदारांनीं पिच्छाच पुरविला तर दुसरे पंध्रवड्यांत पत्रें त्यांच्या हातास लागतात. कोठें लायब्ररीची जागा बाहेरून दिखाऊ चांगली असते आणि आंत पाकोळ्या, उंदीर व चिलटें यांची गर्दी. कोठें लायब्ररी उघडण्याचें मुळींच काम पडत नाहीं. पत्रें सेक्रेटरीकडे जातात व तेथून त्यांच्या स्नेह्याकडे जातात, मग फाइलांचीसुद्धां हाकाहाक. परंतु या संबधानें जास्ती लिहून उपयोग नाहीं. कारण मुळ सुधारणेचें स्थान वाचनगृह ह्मणजे लायब्ररीच. तेव्हां तिची निंदा केली असतां दोष लागेल. ह्मणून किस्येक लायब्र्र्यास मी समक्ष सांगून पाहिले पण कांहीं फल झाल्याचें दिसत नाहीं. आतां कांहीं अधिक सूचना करणें व त्या सुधारणें आपणास इष्ट वाटल्यास आपण खटपट करून पहावी.

पत्रकर्ते महाराज ही सार्वजनिक गोष्ट असल्यामुळें व पांच पन्नास सेक्रेटरीचा यांत संबध असल्यामुळें कोणाचें नाव लिहून प्रसिद्ध करणें मला बरें वाटलें नाहीं. व नावें लिहिल्यापासून कोणास संतोष न होतां व सुधारणा न होतां दुसमानी मात्र उत्पन्न होणार ह्मणून मी तसें केलें नाहीं. तुमचा मुलुख पडला वऱ्हाडी, व किस्येक लायब्र्र्यांचे कामांत सरकारी अधिकाऱ्यांचाही हात आहे. त्यांतून कोणा कोणाच्या तबेती विलक्षण व ते करितील तें होऊन माझा गरीबाचा नाश होणार सबब मोहगम लिहिलें आहे. किस्येक लायब्र्र्या मास्तरांच्या ताब्यांत वे ते विद्यागुरू. तेव्हां त्यांनां दोष कसा द्यावा ? मी विद्यासंपादन त्यांपासून केलेलें तेव्हां माझा इलाज नाहीं परंतु लायब्र्र्यांची सुधारणा अवश्य झाली पाहिजे ही तर इच्छा ह्मणून आपणास तसदी दिली आहे मर्जीनुरूप स्वीकार व्हावा. कळावें. तारीख १० आक्टोबर सन १८७७इसवी मुक्काम खांडवा. एक पत्र वाचणारा.

×× सदरील पत्रांत तीन चार जिल्ह्यांतील लायब्र्र्याविषयीं मोहगम लिहिलें आहे त्याविषयीं आह्मांस कांहीं विशेष माहिती नाहीं. उमरावतीची लायब्ररी फार उत्तम व बाकी सर्व गचाळ असा उद्गार पत्र पाठविणाराचा दिसतो. पण अकोल्याची लायब्ररी अलीकडे त्यानें पाहिली नसावी. असें दिसतें अलीकडे एथील व्यवस्था चांगली आहे.

ए० व० स०

रा. रा. नेटिवओपिनियन कर्ते यांस:—

वि. वि. सन १८५९ चा आक्ट नंबर ८ रद्द होऊन त्या ऐवजी सन १८७७ चा आक्ट नंबर १० झाला. मागील कायद्यांत पुष्कळ फरक आहेत. त्यांत कांहीं प्रकरणीं उत्तम प्रकारची सोय केली आहे. व कांहीं ठिकाणीं फारच अडचणी केल्या आहेत. नव्या कायद्यांतील थोडी फार कलमें ( मराठींतून ) वाचण्यांत सहजगत्या मुळाशीं ताडून पहातां जें कांहीं दिसलें तें आपणास कळवितों. कलम ३७ ( ब ) च्या तिसऱ्या ओळींत "अशा दाखलेवाले मुखत्यारास असेल" या ठिकाणीं नुसते "मुखत्यारास असेल" असें असावेंसें वाटतें. कारण दाखलेवाले मुखत्यारास या योगें दोन प्रकारचे शद्ब होतात. व त्या योगें थोडा विपरीत अर्थ दिसतो. मुळांत ( इंग्रजींत ) "मुखत्यारास असेल" असें आहे कलम ९३ पारिग्राफ २ " प्रोसेस अशा रीतीनें लागू करण्याबद्दल ध्यवयाची कोर्ट फी प्रोसेस करण्यापूर्वीं घेतली पाहिजे" या वाक्यांत करणें या जागीं निघण्यापूर्वीं ह्मणजे बजाविण्यास जाण्यापूर्वीं असें असावें असें वाटतें. "करणें" या शद्बाबद्दल मुळांत Issue हा शद्ब आहे. सन१८६१ चा आक्ट २३ कलम २ यांतील शेवटले वाक्यांत व कलमातील शेवटले पारिग्राफांत इंग्रजींत बिलकूल फरक नाहीं. मागील आक्टाचे भाषांतरांत ( १८६१ चा आक्ट २३ कलम २ "निघण्यापूर्वीं" असें होतें. त्याच Issue शद्बाबद्दल हल्लींच्या भाषांतरांत करण्यापूर्वीं अशा प्रकारचे शद्ब याच ठिकाणीं घालण्यांत भाषांतर कर्त्यांचा हेतु काय असावा ? कलम २२३ पारिग्राफ २ यांत "इसमे जप्तीस व विक्रीस पात्र नाहींत. इसमे या शद्बाचा उपयोग या कलमांत दोन ठिकाणीं केला आहे वस्त्र प्रावर्ण, सामान, गुरें, पगार या ऐवजी इसमे हा शद्ब किती अप्रयोजक योजिला आहे. Particulars या ऐवजीं दुसरा एखादा याच अर्थाचा शद्ब भाषांतरकर्त्यांस नव्हता कीं काय? कलम २७३ यांतील शेवटचे पारिग्राफांत ३ रे ओळींत हुकुमनामा बजावणारे कोर्टास मदत देणें भाग आहे" असें आहे. कोणता हुकूमनामा बजावणारें कोर्ट याची परिस्फूटता होत नाहीं. मुळाप्रमाणें " तोच " ( The same ) हुकूमनामा बजावणारें कोर्ट असें पाहिजे होतें. तसें असतें तर मराठी जाणणारास फारसें घोटाळ्यांत पडण्याचें कारण नव्हतें. कलम २८७ यांतील शेवटील पारिग्राफांत "त्या मुकदम्यास या कोडत कलमांतील" असें आहे. यांत कोडत कलमांतील याचा अर्थ बिलकूल लागत नाहीं. मुळाशीं ताडून पहातां "त्या कामास या कलमांतील" इतकेच शद्ब आहेत. काय हा गोंधळ! कलम २९१ यांतील दुसरे पारिग्राफाचे १ ले व २ रे ओळींत "कोर्टाचे इमल्याचे सीमेंत व इमल्याचे सीमेचे आंत" असें आहे. यांत दोन प्रकारचे अर्थ मुळींच होत नाहींत. इमल्यांत व इमल्याचे सीमेचे आंत' असें मुळांत आहे व या योगें दोन अर्थ होतात. या ठिकाणीं थोडा संशय येण्याचेंही कारण आहे. कलम २९२ यांतील पहिले ओळींत "लिलावांच्या संबंधें" जे आहे तेथें "विक्रीच्या संबंधें" असें पाहिजे होतें असें दिसतें. यावरून विक्री या शद्बामध्यें जास्त व्याप्तीचा समावेश होतो कारण या बाबे अन्वयें सर्वच विक्रया लिलावानें होतात असें नाहीं. यांत माझ्या कोत्या समजुतीनें मजलाच जर विसंगत दिसत असून आहे तेंच बरोबर असेल तर त्याचा उलगडा भाषांतर कर्त्यांनीं केल्यास मी त्यांचा फार आभारी होईन. व पुनरपि शंका निवारण करून घेण्यास्तव आपणाकडे येण्याची उमेद बाळगीन. पत्र विस्तारास्तव साग्र कलम न लिहितां जरूर तितकेच शद्ब लिहिले आहेत. साग्र कलम वाचिल्यास सोयकर जाणारें आहे.

V. J. K.

## नोटिसा

शाबुदीन काजी बावनबीरकर यास मदारबक्ष काजी प्रगणे अडगाव याजकडून नोटिशीचा जबाब देण्यांत येतो कीं, तुह्मी २४ डिसेंबर सन १८७६ इसवीचे वऱ्हाड समाचारांत नोटिस दिली कीं, "आपण इनायतहुसेन यास दत्तक घेणार व त्याचे नावें वतन करून देणार तें बरोबर नसून दत्तक घ्यावयाचा तो वंशांतील असावा" इत्यादि. ह्मणून या नोटिशीनें आह्मी तुह्मास असें कळवितो कीं तुह्मी जरी आमचे वंशज आहा तरी तुमचा आमचा निकाल सात वर्षांपूर्वींच झालेला आहे. व तशांतून तुह्मी आमचे जशा प्रकारें वंशज असावें तशा प्रकारचें नाहींही, हें आपणास माहित असेलच. ह्मणून आह्मास कोणत्याही कुळांतील दत्तक घेण्याची अडचण नाहीं व आह्मी घेतलेल्या दत्तकाचा हक्क तुमच्यानें कोणत्याही प्रकारें रद्द करवणार नाहीं. हें जाणून आपण स्वस्थ बसोंवे यांतच बरें आहे. इतक्या उपर तुह्मी पुढें कांहीं तक्रार चालविल्यास या संबंधांतील तुमची नालायकी जगजाहिर करण्यांत येईल. अमुक एका कुळांतील दत्तक घेण्यास आह्मी जर बांधलेलों नाहीं तर आमच्या इच्छेप्रमाणें आमच्या मनास येईल तो दत्तक घेण्यास आह्मी मुखत्यार आहो तुह्मी विनाकारण दखल देऊन आह्मास जबाब देण्यास कारण पाडलें सबब या नोटिसीचा खर्च द्यावा लागेल. कळावें तारीख २० अक्टोबर १८७७ इसवी.

( सही ) सेख मदारबक्ष काजी प्रगणे अडगाव याचे हातची सही फार्सी

---

नोटिस.

लक्ष्मीबाई जवजे माधवगीर गोसावी रहाणार बोरगाव व गोविंदगीर गोसावी भंडारजकर यास नोटिस देणार भागिर्थीबाई जवजे गनपतगीर अज्ञान पालन करणार मातोश्री सोनाबाई जवजे विठ्ठलगीर व बंधु खुशालगीर वल्लद विठ्ठलगीर गोसावी रहाणार दोनवडे इजकडून लिहून जाण्याचें असें कीं गणपतगीरें याला यादवगीर गोसावी यांणीं आपलें दुकान सांगळुद बुजरूख एथील स्थावर जंगम माल सर्व बक्षीस करून दिला व गणपतगीर बाईचा प्रत्यक्ष पुत्र असून त्यांचा भ्रतार मरण पावल्यावर सर्व जिनगी गणपतगीर याचे स्वाधीन होऊन कांहीं दिवस त्यांणीं वहिवाट केल्यावर तेही मरण पावले लक्ष्मीबाई नें आपला जावई नामे गोविंदगीर भंडारजकर यास आणून दोघींचें नाववें मुख्त्यारपत्र देऊन काम चालविलें तें नाव दाखल केल्यानें गोविंदगीर याणें लक्ष्मीबाईचे अनुमतानें पैशाची व जिनगीची व्यवस्था केली आहे यांतही बरेंच नुकसान केलें. पण याकडे आह्मी पाहिलें नाहीं आणि हल्लीं त्या गोविंदगीरचे नावें मुख्त्यारपत्र व बक्षीस आणि मृत्युपत्र व दुकानचे वहिवाटचे हक्क वगैरे बद्दल दस्तैवज करून बाईनें आपली सही करून दिल्याचें कळून येत आहे. त्यास सदई सर्व जिनगीची मी मालकीण असतां व माझी मंजुरात नसतां असा दस्तैवज करून देणें व करून घेणें हें तुह्मा दोघांसही गैरकायदा आहे व तें आह्मास बिलकूल कबूल नाहीं. सासू व जावई यांच्या लोभामुळें तो दस्तैवज झाला असावा त्यास हल्लीं मी तुह्मास असें कळविते कीं, त्या दस्तैवजावरून कोणतेही प्रकारें गोविंदगीर याची मालकी नाहीं व झालेला दस्तैवज कपटाचा आहे. त्या आधारें गोविंदगीर याणें कोणतेंही काम करूनये व दुकानचें काम चालविणें विषयीं त्याजवळ जें मुख्त्यारपत्र आहे तें या नोटिशीवरून रद्द केलें आहे तरी त्याणें व्यापारांत किंवा कोणतेही कामांत दखल देऊं नये. व काम करूं नये. व गोविंदगीर याजला जे दिवसापासून मुख्त्यारपत्र दिलें त्या दिवसापासून रद्द केल्या तारखेपावेतों दोन्ही दुकानचा हिशेब आठ दिवसांचेआंत समजून द्यावा. हें न केल्यास रीतिप्रमाणें तजवीज केली जाईल. कळावें. तारीख १९ आक्टोबर सन १८७७ इसवी.

[ सही ] भागिरथीबाई जवजे गणपतगीर गोसावी अज्ञान पालन करणार मातोश्री सोनाबाई जवजे विठ्ठलगीर व बंधू खुशालगीर यांची नि.

---

नोटिस.

गणपतगीर माधोगीर याचे दुकानचे गुमास्ते गणपती पाटील व पांडु गुमास्ते मौजे सांगळुद बुदरूख व सखाराम विठूर गुमास्ते व केवजी माळी गुमास्ते कसबे बोरगाव यास खालीं सही करणार याजकडून कळविण्यांत येते कीं गोविंदगीर गोसावी भंडारजकर याचें मुख्त्यारपत्र आह्मी रद्द केलें आहे तर त्याजला दुकानची बिलकूल वहिवाट करूं देऊं नये व पैसाही त्याजला देऊं नये अगर दिल्यास त्याचा जबाब तुह्मापासून घेतला जाईल. कळावें. तारीख १९ आक्टोबर सन १८७७ इसवी.

( सही ) भागिरथीबाई जवजे गणपतगीर गोसावी रहाणार बोरगाव अज्ञान पालन करणार मातोश्री सोनाबाई व बंधू खुशालगीर वल्लद विठ्ठलगीर याची निशाणी.

---

## वऱ्हाडसमाचार

मिति आश्विन शुध्ध १५ शके १७९९

---

## तुर्कस्थान व रशिया यांमधील लढाई.

गेल्या आठवड्यांत लढाईसंबंधीं ज्या तारेंतून बातम्या आल्या आहेत त्यांवरून असें कळतें कीं आशिया मायनरमध्यें आहमद मुखत्यार पादशाहाचा मोठा पराभव होऊन मोठाले सात पादशाहा, ३२ तोफा, आणि दुसरी पुष्कळ लढाईची सामग्री रशियाच्या हस्तगत झाली. व आहमद मुखत्यारही त्यांत सापडला होता पण मोठ्या युक्तीनें निसटून जाऊन तो कार्स येथें पळून गेला. त्याचेकडून जी सुलतानास तार गेली आहे त्यांतही तो आपला पराभव कांहीं अंशीं कबूल करतो, पण आपल्यापेक्षां शत्रूचा नाश फार झाला आहे असें कळवितो. आतां यांत खरें कोणतें मानावें हा विचारच आहे पण रशियाची थोडी सरशी झाली आहे इतकें मात्र कबूल केलें पाहिजे. इकडे युरोपांतील तुर्कस्थानांत जी लढाई चालली तींत विशेष महत्वाची अशी कोणतीच गोष्ट झाली नाहीं. पण तिकडे हिवाळा सुरू झाल्यामुळें बर्फ पुष्कळ पडत आहे आणि तेणेंकरून हल्ला वगैरे करण्याची कामें बंद पडलीं आहेत. बालकन पर्वतात सिपका पास. नें ठिकाण हल्लीं रशियाच्या ताब्यांत आहे तेथें तर तीन इंच बर्फ पडलें अशी बातमी असल्यामुळें रशियाचे सैन्यास फार गैरसोय आणि इजा झाली असावी. प्लेवना या प्रसिद्ध ठिकाणीं रशियाचा दोनदा पराभव होऊन फारच खराबा झाला हें वाचकांच्या लक्षांत असेलच तरी अद्याप तें ठिकाण पाडाव करून आपल्या ताब्यांत घेण्याचा प्रयत्न रशियानें सोडला नाहीं. नवीन कुमक चोहीकडून आणून त्या ठिकाणास वेढा घालण्याचें काम सुरू आहे आणि तें पुरें झाल्यावर नोवेंबर महिन्यांत मोठी निकराची लढाई होईल असा अजमास दिसतो. या शिवाय रशियाचे बादशहाचा बेत सर्व हिवाळाभर बुकारेस्ट एथें छावणी करून रहाण्याचा आहे आणि पुन्हा उन्हाळा सुरू झाल्याबरोबर लढाईला सुरवात करावयाची. आजपर्यंतच्या उभयतांमध्यें पुष्कळ झटापटी झाल्या त्यांत पुष्कळ वेळां तुर्की लोकांस जय मिळून रशियन लोकांचे अतोनात नुकसान झालें अशीं वर्तमानें आहेत. तरी रशियाचा अगदींच मोड होऊन पुढें लढाई चालवावयाची नाहीं अशा मजलेपर्यंत गोष्ट येऊन ठेपली नाहीं. अशीच पुढें लढाई चालल्यास कोणत्या बाजूचा जय किंवा पराजय होईल हें अनुमान आजच करतां येत नाही. तरी हें खरें आहे कीं, दोन्ही देशांतील द्रव्य व मनुष्यांची हानी होऊन त्यांनां पुन्हा भरभराटीच स्थितींत येण्यास निदान वीस पंचवीस वर्षें लागतील व हल्लीं चालू असलेल्या लढाईपासून व्यापाराचे संबंधानें त्या दोन देशाबरोबर दुसऱ्या अनेक देशांचें नुकसान होत आहे. याकरितां कोणत्याही तऱ्हेनें या भयंकर लढाईचा शेवट होऊन सर्व युरोपभर स्वस्थता झाल्यानें त्या खंडांतील देशांचेंच नाहीं तर आशिया खंडांतील ह्या आपल्या व दुसऱ्या कित्येक देशांचें हित होणार आहे.

---

## दिवाणी नवा कायदा.

या कायद्याच्या संबंधानें हायकोर्टांत अशी वाटाघाट झाली कीं नव्या कायद्यात कर्जाच्या संबंधानें कुळास कैदेंत ठेवण्याची पराकाष्ठा मुदत सहा महिन्यांची आहे आणि जुन्या कायद्यांत दोन वर्षांची होती त्यामुळें नवा कायदा अक्टोबरचे पहिले तारखेस अमलांत आला तेव्हां त्यापुढें ज्यांचे कैदेचे सहा महिने पुरे झाले त्यांस सोडून द्यावें किंवा नाहीं? याविषयीं जडजांची वेगवेगळीं मतें पडलीं. तरी बहुमतानें चीफ जस्टिस यांनीं ठरविलें कीं जुन्या कायद्याप्रमाणें जो ठराव झाला आहे त्याचा पुरा अंमल जुन्या कायद्या प्रमाणेंच झाला पाहिजे सबब सहा महिन्यांनीं कैदीस सोडू नये.

ठाण्यास या नव्या कायद्याच्या संबंधानें एक तक्रार निघाली कीं समन्सें. तयार करण्याच्या पूर्वीं साक्षीदाराचा भत्ता भरावा असें नव्या भाषांतरांत आहे. तें बरोबर आहे किंवा कसें? जडजांनीं जाइंट जडज राव बहादूर गोपाळराव हरी देशमुख यांनां त्याविषयीं निकाल करण्यास सांगितलें. त्यांनीं मूळ कायदा व तरजुमा पाहून सांगितलें कीं, भाषांतरांत चूक झाली आहे. साक्षीदाराचा भत्ता समन्सें होण्याच्या पूर्वीं न भरतां तीं रवाना करण्याच्या पूर्वीं भरला पाहिजे.

तसेंच आजचे आमचे पत्राचे पहिले पृष्ठावर नेटिव ओपिनियनमधील एक पत्र आहे त्यांतही या कायद्याच्या भाषांतरसंबंधानें कांहीं दोष दाखविले आहेत. या प्रकारावरून उत्तम लोकवासी मेजर क्यांडी साहेब यांचें आह्मास फार स्मरण झालें. त्यांनीं मागील दिवाणी व फौजदारी वहिवाटीच्या कायद्यांचें भाषांतर व पिनलकोडचें भाषांतर किती उत्कृष्ट, सुगम व निर्दोष केलें आहे! यावरून त्यांची योग्यता समजून येते.

---

### सिव्हिल सर्व्हिसविषयीं खटपट

बाबू सुरेंद्रनाथ ब्यानर्जी ह्मणून कलकत्यास एक तरुण गृहस्थ आहेत. ते विलायतेस जाऊन सिव्हिल सर्व्हिसची परीक्षा देऊन आलेले आहेत. हे उत्तम विद्वान असून देशाच्या कल्याणार्थ मनापासून झटणारे आहेत. सिव्हिल सर्व्हिसच्या परिक्षेला नेटिवांचे वयाची संख्या फार कमी ठेविली आहे या साठीं नेटिवांनीं खटपट करावी हा उद्देश त्यांचे मनांत फार दिवसांपासून आहे. व कित्येक ठिकाणीं त्यांनीं या विषयीं व्याख्यानें देऊन लोकांचे मनावर ठसा बठविला व लोकांनींही त्यांच्या खटपटीस यश यावें असें इच्छिलें. हल्लीं त्यांची तयारी इतकी झाली आहे कीं ते स्वतां विलायतेस जाऊन तेथील लोकांपुढें व पार्लमेंट सभेपुढें हें गाऱ्हाणें नेणार. या कामास खर्च सुमार ६००० रुपये लागणार तो भागविण्याकरितां तिकडील मंडळींनीं वर्गणीची यादी केली आहे. व ते याच महिन्यांत विलायतेस जाण्यास निघणार आहेत.

आह्मी बाबूसुरेंद्रनाथ यांस ओळखतों. दिल्ली दरबारचे वेळीं ते हिंदुपेट्रियट वर्तमानपत्राचे रिपोर्टर या नात्यानें दिल्लीस आले होते. त्यांची बुद्धी, विद्वत्ता व लिहिण्याची आणि भाषणाची शैली फार उत्तम आहे. व या सर्वांहून अधिक असा त्यांचा सुस्वभाव आहे. त्यामुळें ते ज्या कामा

स हात घालतील तें शेवटास नेतील व परमेश्वरही त्यांस यश देवो असें आह्मी इच्छितों.

---

**५५ वर्षांची मुदत**— सरकारची नोकरी करणारांचें वय ५५ वर्षांचे झालें ह्मणजे तो चाकरीस नालायक झाला सबब त्यास काढून टाकावें व पेनशन द्यावें असा किंत्येक वर्षांमागें ठराव झाला आहे व त्याप्रमाणें वहिवाटही चालू आहे. पण हल्लीं सरकारांत त्या विषयीं कांहीं नवीनें विचार झाला आहे. ह्मणजे असें आढळून आलें आहे कीं केवळ ५५ वे वर्षीच मनुष्य निरुपयोगी होतो किंवा अगदीं अशक्त होतो असें नाहीं. ह्मणून तशा प्रकारच्या मनुष्यास पेनशन दिलें आणि तो साठ किंवा ऐंशी वर्षांचे वयापर्यंत वाचला तर सरकारच्या पेनशनी पैशाचें विनाकारण नुकसान होतें. आणि उद्योगास लायक अशा मनुष्यास निकामी पोसलें अशी ही व्यर्थता उत्पन्न होते याकरितां जो मनुष्य ५५ वर्षांचे वयाचा सरकारी-नोकरींत आहे तो खरोखर चांगला आहे व सरकारी काम करण्याची त्याला ताकद राहिली नाहीं असें स्पष्ट दिसत असेल तेव्हांच त्याला नोकरींतून काढून पेनशन द्यावें. केवळ ५५ वें वर्ष संपलें एवढ्याच कारणानें त्यास काढीत जाऊ नये असा सरकारानें नवीन ठराव केल्याचें समजतें. या योगानें किंत्येक ज्ञात्याच्या नोकरांस संतोष होईल. व बढतीविषयीं टपलेल्यास नाउमेद होईल.

---

## वऱ्हाड.

हैदराबादेस गेले रविवारीं रात्रीं ४ इंच पाऊस पडला.

---

नवाब हुसेनमिया ज्यांनीं डा० जान्सन यास ठार मारिलें त्याची चौकशी होऊन पाऊण लक्ष रुपये त्यास दंड ठरविला. त्यांत कांहीं रकम कमी व्हावी ह्मणून त्यानें आर्जवानें लोकांच्या भिडाभाडा दिवाण साहेबाकडे नेल्या. परंतु न्यायानें जें ठरलें त्यांत एक पैसा कमी व्हावयाचा नाहीं असें दिवाण साहेबांनीं सांगितलें. मराठी संस्थानांत असे निश्चयी दिवाण असणें ही मोठ्या संतोषाची गोष्ट होय.

---

सर्व हिंदुस्थानांतील सरकारी विद्याखात्यांत अभ्यासाकरितां कोणकोणतीं पुस्तकें असावींत तें ठरविण्या करितां सिमल्यास कमिटी भरविली होती व तिजकरितां येथून राव बहादूर डायरेक्टर साहेब गेले होते त्या कमिटीनें आपला त्या बाबदचा रिपोर्ट लिहून तो गेले शनिवारीं सरकारचे हातीं दिला.

---

हिंदुस्थानांतील दुष्काळास विलायतेहून धनिक लोक धर्मार्थ सहाय देत आहेत त्याचा अंश आमचे मुलुखास नको आहे असें हैदराबादच्या निजाम सरकारांनीं कळविलें आहे. एरंच ,ते जर आपले स्वतांचे प्रयत्नानें व खर्चानें रयतेचें पोषण करीत आहेत तर त्यांनां दुसऱ्याच्या भिक्षेची मदत कशाला पाहिजे? व भिक्षा स्वीकारणें ही प्रतिष्ठा नव्हे, निरुपाय असेल तेव्हां कसें तरी जीवन करणें आहे.

---

रा. रा. श्रीराम भिकाजी इजुकेशनल इन्स्पेक्टर पुन्हा उमरावतीस परीक्षेस गेले होते ते शुक्रवारीं सायंकाळीं परत आले.

---

अकोल्याप्रमाणें उमरावतीसही या आठवड्यांत युरोपियन लोकांचा चेंडूफळीचा खेळ झाला. येथून बरीच मंडळी गेली होती. या खेपेस पूर्व वऱ्हाडची सरशी झाली असें समजतें.

---

मुदतीचा नवीन कायदा झाला आहे तोही दिवाणी नवीन कायद्याप्रमाणें जानेवारी महिन्यांतच वऱ्हाडांत सुरू करावयाचा ठराव झाला आहे असें समजतें.

---

१४ वे तारखेस ह्मणजे रविवारीं अकोल्याचे तुरुंगांतील कैदी पळाले त्या विषयीं माहिती समजली आहे ती अशी:—

या दिवशीं रविवार असल्यामुळें मामुलीप्रमाणें जेलाबाहेरून कचरा आणण्याकरितां कैदी निघाले. त्यांपैकीं १० इसमांची एक तुकडी जिजवर बालमुकुंद नामें शिपाई व हिफाजती करितां नेमलेला नंबरदार हुदेवाला कैदी असे दोन इसम पहाऱ्यास होते. त्यां पैकीं बालमुकुंद यानें मुलाहिजा करून त्यांतून ४ कैदी पळूं दिले— तुरुंगाचे जवळ घेऊन जाण्याचा हुकूम तोडून बालमुकुंदानें दीडकोस लांब जंगलांत कैदी नेण्याचे योगानें जाणूनबुजून त्यांस पळून जाण्याची सोय करून दिली. व त्यांस अवकाश मिळावा ह्मणून सरकारी आधिकाऱ्यास लवकर बातमीही कळूं दिली नाहीं. मग सुमार दीडतास दिवस शिलक असल्या वेळीं त्यानें येऊन खबर दिली. सरकारी नोकर अशी निमक हरामी करूं लागले तर कोणतेवेळेस काय होईल तें सांगता येणार नाहीं. कुंपणच जर शेत खाऊं लागेल तर इलाज काय? असा विश्वासघात करणारा पाहऱ्यावरील शिपाई बाळमुकुंद याजवर फौजदारी मुकदमा चालू आहे. त्याचा निकाल पुढें कळेल. दुःखाची गोष्ट ही कीं दोन मनुष्यांचे दगाबाजीनें ६ मनुष्यांच्या अन्नांत माती कालविली गेली. ह्मणजे बाहेर गेलेले कैदी वेळेवर परत न आल्याचा रिपोर्ट जुन्या नोकरांनीं केला नाहीं इतक्याच आरोपावर जुने नोकर बरतर्फ झाले. याप्रमाणें येकादोघांचा संसर्ग समुदायास कसा भोवतो हें या गोष्टीवरून चांगलें दिसून येतें.

असें एकण्यांत आलें आहे कीं शिगावच्या पोलिस स्टेशनांतूनही नुकताच एक कैदी पळून गेला त्याची हकीकत समजली नाहीं. पण या दोन्ही गोष्टींवरून असा संभव होतो कीं तुरुंगांत राहाणें गुन्हेगारास गोड वाटतनाहीं! हें फार चांगलें आहे. पण योजिलेला मार्ग मात्र चांगला नाहीं. कारण तशानें तुरुंगांत राहण्याची मुदत वाढते. यापेक्षां गुन्हे करण्याचे लोक सोडून देतील तर फार चांगलें!

---

मे० जुडिशियल कमिशनर साहेब कारंजाकडे गेले आहेत. पुढील आठवड्यांत येथें येतील.

---

मेजर फ्यारर साहेब असिस्टंट कमिशनर विलायतेस रजेवर आहेत ते नोवेंबरांत येथें आपले कामावर येतील. व मि० हेर साहेब वाशिमाकडे जातील.

---

रा. रा. लक्ष्मण भास्कर वकील यांनीं मानेगावचे पाटलावर दिवाणींत दावा केला होता त्याचे चौकशींत त्यानें मे० दस्तुर बहिमनजी साहेबां यांजपुढें असें सांगितलें कीं, मागें एके प्रकरणांत या वकिलानीं माझे बापापासून आपणास लांच देण्याकरितां ह्मणून ३०० रुपये घेतले आहेत. या गोष्टीचा खुलासा व्हावा ह्मणून बहिमनजी साहेबांनीं डिपुटी कमिशनर साहेबास यादी लिहिली त्यावरून त्या गोष्टीची चौकशी होणार आहे. आह्मी असेंही ऐकिलें आहे कीं, पाटील मजकुरानें भर कोर्टांत असें बोलून आपली अब्रू घेतली सबब त्यावर मुकदमा करावा ह्मणून लक्ष्मण राव यांनींही डिपुटी साहेबाकडे अर्ज दिला आहे. वकील मजकुरांनीं आपले निर्दोषीपणा करितां ही गोष्ट फार चांगली केली. आतां चौकशींत काय निष्पन्न होतें पाहूं.

---

या आठवड्यांत एक दोन दिवस तिसरे प्रहरीं पावसाची बुरबुर आली होती ती पिकास चांगली नाहीं असें ह्मणतात.

---

कलकत्त्याहून मुंबईस जाणारे आगगाडीचे वेळांत नोवेंबरचे पहिले तारखेपासून फेरफार होणार आहे. जबलपुराहून भुसावळेस रात्रीं ११॥ वाजतां जी गाडी येते ती आतां १० वाजतां येत जाईल. व दुसरे दिवशीं मुंबईस ११॥ वाजतां पोचे, ती आतां १०। वाजतां पोचत जाईल. या अदलाबदलीनें इकडून भुसावळेकडे जाणारे गाडीचेही वेळांत सुमार दीड तासाचा फेरबदल होईल. ह्मणजे संध्याकाळीं एथून गाडी जाई ती आतां ४॥ वाजण्याचे सुमारास जात जाईल. असें वाटतें. लवकरच पक्की खबर कळेल.

---

मि. हेक्सटर या नावाचे एथें एक कंट्राक्टर आहेत. ते विलायती तऱ्हेचीं कौलें तयार करितात.

---

मे. जोन्स साहेब कमिशनर यांची स्वारी उमरावतीसच आहे.

---

अकोल्यास सदर स्टेशन केलें असतां सोयी कशा काय आहेत त्यांचा विचार करून रिपोर्ट करण्याकरितां एथें कमिटी नेमली होती तिचा असा विचार झाला ह्मणतात कीं सर्व प्रकारच्या चांगल्या सोयी अकोल्यास आहेत.

तारीख २९ सेप्टेंबर रोजीं हैदराबादेस नबाब विकर उल उमराव यांस त्यांचे बंधूची ह्मणजे नबाब अमिरी काबीरची जाइंट आडमिनिस्ट्रेटरची जागा हिंदुस्थान सरकारांनीं देण्याचा ठराव केला त्याजबद्दल रेसिडेन्ट साहेबांनीं मोठा दरबार भरवून त्यांस निजाम सरकारचे समक्ष तो बहुमान दिला. व उठून उभे राहून अमिरी काबीर याजपाशीं गेले व त्यांनां नेऊन निजाम सरकारास भेटविलें. व त्यांच्या लायकीविषयीं वर्णन केलें. नंतर उत्तम रीतीनें राज्यकारभार चालविण्याविषयीं त्यांस उपदेश करून दिवाण साहेबासही त्यांनीं सांगितलें कीं, आपला व अमिरी काबीरे यांचा खासगी बेबनाव असला तरी तो बाजूस ठेवून उभयतांनीं एकविचारें एकदिलानें राज्याचें हित पहावें. व आपण तसें वागलां तरच उत्तम राज्यरीतीचा अमोल्य फायदा सर्वत्रास मिळणार आहे. त्यानंतर त्या उभयतांनीं ती गोष्ट मान्य केली. व अमिरी काबीर ह्मणाले कीं ब्रिटीश सरकारानें आह्मांस ही पदवी देऊन आमचा बहुमान केल्या बद्दल आह्मास अत्यंत समाधान झालें. नंतर निजाम सरकारास व सर्व मंडळीस रेसिडेंट साहेबांनीं असेंही सांगितलें कीं या नेमणुकीच्या योगानें हैदराबादच्या राज्यव्यवस्थेच्या अंतर्गत भागांत ब्रिटिश सरकारानें हात घालण्याची सुरुवात केली असें लोक ह्मणूं लागल्याची गप्प आमचे कानावर आली आहे पण त्यांत कांहीं तथ्यांश नाहीं. निजाम सरकार अल्पवयी आहेत तों पर्यंत ब्रिटिश सरकार त्यांचे गार्डियन आहे सबब त्यांच्या राज्याचें हिताची गोष्ट हिंदुस्थान सरकारच्या कानावर जाऊन किंवा जरूर असल्यास त्यांच्या सला मसलतीनें व मंजुरातीनें व्हावी इतकेंच ब्रिटिश सरकारचें काम आहे. लोकांनीं कंडी उठविली आहे त्याप्रमाणें निजाम सरकारच्या राज्य कारभारांत अधिक हात घाण्याची त्यांस कल्पनाही नाहीं. पूर्ववत प्रमाणें दिवाण साहेबच राज्याचे मुख्य प्रधान या नात्यानें कामकाज चालवितील त्यांत कांहीं बदल होणार नाहीं.

---

## वर्तमानसार.

हिंदुस्थानांतून विलायतेस स्टेट सेक्रेटरीकडे खर्चास पाठवावे लागते त्याजबद्दल हुंडणावळ खर्च जो पडतो त्याची एप्रिल पासून सेप्टेंबरपावेतों बेरीज ९०७७०२९ रुपयांची झाली आहे ह्मणजे दरमहा सुमार १५ लक्ष रुपये नुसती हुंडणावळ जाते.

भावलपुरच्या नबाब साहेबांनीं मद्रास फ्यामिन रिलीफ फंडाला १०००० रुपये दिले.

बंगलोरास देशी तऱ्हेच्या सतरंज्या चांगल्या तयार होतात व हल्लीं तेथें मि० स्व्यांडिश ली साहेब आहेत त्यांनीं सतरंज्या तयार करण्याचें विलायतेहून एक यंत्र आणिलें आहे तें लवकरच सुरू करतील. व त्यांतून अति उत्तम माल तयार होईल.

व्हाईसराय साहेब डोंगरी राजांकरितां ३० वे तारखेस दरबार भरविणार आहेत.

मुंबईचे एक पारशी सभ्य गृहस्थ सरकाराशी फार नेकीनें वागतात त्याच्या स्मारक त्याच्या मुलाला सर रिचर्ड टेंपल साहेब एक मोठी जागा देणार असें वर्तमान आहे.

पुण्यास राव बहादुर महादेव गोविंद रानडे आहेत त्यांची सरकार तेथून बदली करणार असें वर्तमान आहे.

सर. बी. एच एलिस साहेब पेनशनर होऊन विलायतेस गेले होते ते तिकडे मरण पावले. हे ३२ वर्षें हिंदुस्थानांत नोकर होते.

सिंध प्रांतांत अजून नद्यांनां चांगले पूर येत नाहींत येणेंकरून काळजी आहे.

ह्मैसुराकडे गेले आठवड्यांत चांगला पाऊस पडला. धान्याच्या किमती उतरल्या व धर्मावर निर्वाह करणारांची संख्या ३९६८८ नीं कमी झाली.

बंगाली अफूच्या पेट्या आक्टोबरांत ४००० विकल्या. त्यांची किंमत रुपये ९११०७२९ रुपये आली. तेंव्हां दर पेटीस १२७७८१०८११ आले. हा भाव फारच चांगला आला. या वर्षी अफू-४९५०० पेट्या होईल व ११४८ रुपयांच्या भावानें तिची किंमत ५६८४०००० रुपये होईल असा अजमास होता. आज पर्यंत २८००० पेट्या विकल्या त्यांचे ३५०३१७०५ रुपये आले ह्मणजे सरासरी भाव १२५७८२ पडला.

ह्मैसुरास एक राणी मरण पावली तिचें वय ७३ वर्षांचें होतें.

सप्तंबर महिन्यांत मद्रासेकडे ६७ लक्ष रुपयांचें धान्य. गेलें गेले सालीं याच महिन्यांत सारें ६३ हजार रुपयांचें गेलें होतें.

विलायतेहून सरकारचे पोस्टाचे स्टांप येत असतां त्यांतून ३०००० रुपयांचे स्टांप चोरीस गेले.

ऱ्हिया किंवा चिनी गवत या नावाची एक वनस्पती आहे तिचे धागे काढण्याकरितां एकादें यंत्र किंवा अन्य कांहीं युक्ती कोणी शोधून काढावी अशी सरकाची इच्छा आहे व त्याकरितां सरकारानें ५०००० रुपये बक्षीस ठरविलें आहे. सन १८७१ सालींही अशी जाहिरात सरकारानें दिली होती व तेव्हां एकानें कांहीं नमुना केला होता. तो पास झाला नाहीं तरी सरकारानें त्याला १५००० रुपये दिले होते असे कळतें.

गायकवाडाच्या मुलखांतील फौजदारी व दिवाणी अपिलांची चौकशी यापुढें बडोद्याचे रेसिडेंट हे करणार व ह्यांजला त्याबद्दल बडोदें दरबारांतून १५०० रुपये पगार मिळणार आहे.

रशिया देशांत 'एक नवीन खिस्तभक्त मंडळी निघाली आहे तिचें असें मत आहे कीं सर्व पुरुषांनीं आपल्या स्त्रीच्या आज्ञेंत असलें पाहिजे व ती कुटुंबांची मुखत्यार या संबंधानें दर आठवड्यांतून एकवार तरी तिजजवळ पुरुषानीं आपलीं पातकें कबूल केलीं पाहिजेत. रशिया देशांतील स्त्रियांच्या स्थितीच्या संबंधानें ही मोठीच सुधारणा आहे.

सगळ्या हिंदुस्थान देशांत रविवारीं टपालखात्याचें काम बंद ठेवणें सोईचें आहे किंवा कसें या विषयाचा हिंदुस्थान सरकार विचार करीत आहे.

व्हाइसराय साहेबांनीं मद्रासच्या दुष्काळास साह्यार्थ १०००० रुपये दिले.

नागपुर प्रांतांतल्या कोर्टांत वकिली करण्याच्या सनदा देण्याची परीक्षा तारीख ५ नोव्हेंबर सन १८७७ पासून नागपुर एथें सुरू होणार आहे. इं. प्र.

बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी या महिन्यांत सिविल सर्विसच्या वयाची इयत्ता वाढविण्याच्या उद्योगाकरितां विलायतेस जाणार आहेत व त्यांच्या खर्चाकरितां ६००० रुपये लागतील यास्तव फंड जमविण्याचें काम चाललें आहे असें समजतें.

अयोध्या व वायव्य प्रांत यांतील दुष्काळ संबंधाचीं बहुतेक कामें पाऊस पडल्याच्या सबबेनें बंद करण्याचा हुकूम झाला असें टैम्समधील अलाहाबादच्या तारेवरून समजतें.

हिंदुस्थानांतील दुष्काळ — दिल्लीग्याझेट कर्त्यांनीं अलीकडील पांचशें वर्षांत हिंदुस्थानांत पडलेल्या मोठ्या दुष्काळांची यादी व संख्या दिली आहे तिजवरून सन १३४५ पासून यंदाच्या वर्षापर्यंत २३ मोठे दुष्काळ पडले. त्यांची सालवारी येणेंप्रमाणें:—१३४५, १४७१, १६३१, १६६१, १७३३, १७४४, १७५२, १७७०, १७८३, १७८७, १७९०, १८०३, १८१३, १८१९, १८२६, १८३२, १८३७, १८५३, १८६१, १८६६. १८६७, १८६८ १८७४, १८७७. यावरून इंग्रजी होण्यापूर्वींच व राज्यास आरंभ झाल्यापासून १७ मोठे दुष्काळ पडले. त्यांतून अलीकडे वरचेवर व मोठे कठीण पडत चालले आहेत. तशांत यंदाचा दुष्काळ तर सर्वांत मोठा व भयंकर आहे असें दिसतें. याजवरून देशाची व लोकांची दारिद्रावस्था वाढत व कठीण होत चालली आहे असें स्पष्ट होतें.

जपान देशांत मुलीचें लग्न झालें ह्मणजे कांहीं औषध लावून तिचे दात काळे करण्याची चाल आहे.

विलायतेंत हल्लीच्या लढाईनें वर्तमानपत्रांच्या प्रतींच्या खपाची संख्या विशेष वाढत चालली आहे. डेली टेलेग्राफ पत्राच्या २,६०,०००; स्टांडर्डच्या एक लक्ष ऐंशी हजार व डेली न्यूजच्या एक लक्ष वीस हजार प्रती या लढाईपासून खपूं लागल्या आहेत असें समजतें.

मुंबई इलाख्याचें एकंदर १२४४६२ चौरस मैल क्षेत्रफळ आहे त्यांत २६६५२ गावें असून ३२७७६७९ घरें व लोकसंख्या १६३४९२०६ आहे.

मद्रास इलाख्याचे १२४४९९ चौरस मैल क्षेत्रफळ आहे व त्यांत ५५४२१ गावें असून ५८५७९९४ घरें व लोकवस्ती ३०२०३००० आहे.

ने. ओ.

इंग्लंडांत दर हजार बायकांस २२४ मुलें होतात व ऐर्लंडांत २२३ होतात.

फ्रान्स देशाच्या किनाऱ्यापासून इंग्लंडाच्या किनाऱ्यापर्यंत काविल नावाचा एक मनुष्य समुद्रांतून पोहोत गेला!

बडोद्यांतील महाजन लोकांची सभा भरली होती, ते समयीं त्यांनीं असा एक नियम केला कीं, आगगाडींतून महार, चांभार, व धेड हे कधीं कधीं उतारू असतात. व त्यांचे शेजारीं बसून जाणें हें अशास्त्र आहे ह्मणून ह्यापुढें डाकोर एथें ज्यास जावयाचें असेल त्यांनीं पायवाटेनें जावें. व कोणी आगगाडींतून गेल्यास त्यास कांहीं दिवस बहिष्कृत करावें असें ठरलें.

भविष्य— अश्वीन व कार्तिक या दोन महिन्यांत पुष्कळ पाऊस पडेल,- त्यांत अश्विनी पौर्णिमेपासून पांच दिवस अतिशय पर्जन्य पडेल व मार्गशीर्ष, पौष आणि माघ या मासांत महर्गता फार होईल; याचें कारण पुष्कळ पर्जन्य पडल्या कारणानें शेतकीची स्थिति चांगली न होता उलटी वाईट होईल. असें खरे पण कोणत्या देशांत हा प्रकार होणार हें भाविष्य करणारानें कळविलें असतें तर बरें झालें असतें.

---

## दुष्काळ व तत्संबंधी विलायतेंतील लोकांचे विचार.

सृष्टीनियमाप्रमाणें चालू दुष्काळापासू नही- कांहीं या देशास हितावह असे परिणाम घडत आहेत. या देशाच्या संबंधानें आपल्या शिरावर केवढें मोठें जोखीम आहे याचें अनुमान इंग्रज सरकारास होऊं लागलें आहे, व विलायतेंतील लोकांचा असा ग्रह होऊं लागला आहे कीं, परकी राज्यें आपल्या हस्तगत करून घेऊन त्यांची वहिवाट व देखरेख नीटपणें चालविण्याचें काम सुलभ नाहीं, आणि आहेत त्यांपेक्षां आणखी जास्त राज्यें मिळण्याची इच्छा करणें हें ब्रिटिश सरकारास अनहितकारक आहे. इंग्रज लोकांचे याप्रकारचे विचार कसे होत आहेत हें आमच्या वाचकांस समजण्या करितां आह्मी लंडन टाइम्स या विलायतेंतील प्रमुखवर्तमान पत्रांतून खालीं कांहीं उतारा घेतों.

" रशियानें यःकश्चित् असें मानून जें भयंकर काम अंगिकारिलें आहे. त्यापेक्षां हिंदुस्थानांतील दुष्काळ हा कमी महत्वाचा आहे असें नाहीं. रशियाचें कर्ज जितक्या रकमेनें वाढलें जाईल तिचा पांचव्या हिशा इतकाही आह्मांस या दुष्काळांत खर्च होणार नाहीं. परंतु हिंदुस्थानची खानेसुमारी पुढें जेव्हां आह्मी काढूं तेव्हां असें दिसेल कीं, रशियाच्या लढाईचें स्वरूप अतीशय मोठें होऊन ती पुष्कळ दिवस चालली तथापि तिजमध्यें जितके लोकें मरतील त्यांचा निदान पांचपट तरी लोक या दुष्काळामुळें कमी होतील. या दोनही प्रसंगाच्या स्वरूपाविषयीं विचार केला तर, ते एकाच प्रकारचे आहेत असें भासणार नाहीं तथापि त्यांपासून पुढें होणारे तोटे सारखेच दिसतील. आह्मी लोकप्रीति व सुधारणुकेचा, ढोल मिरवितों; रशियाच्या मनांत कांहीं दुसरे जुन्या प्रकारचे हेतू आहेत. आमच्या आत्मसंतोषाकरितां आह्मांस व रशियाच्या राज्यलोभा करितां रशियास लोक टपका देतात. रशियानें जर अपलीं संकटें आपणावर ओढून आणिलीं आहेत, असें ह्मणावें तर आमचीं संकटें आपेआप आह्मांवर गुदरलीं आहेत असें नाहीं. हिंदुस्थानांत वीस कोटि लोक आमच्या प्रजेसारखे होऊन राहिले आहेत ते कशानें? तर आह्मी जुने राजवंश पदच्युत केले व आह्मांस संपूर्ण स्वामित्व मिळावें ह्मणून त्या देशांतील ऐक्याची घटना निर्मूळ करून तेथील लोकांस परतंत्र केलें ह्मणून. परंतु असें करण्यानें आमच्या अडचणी दुर झाल्या नाहींत; त्या उलट्या अह्मी आह्मांकडे ओढून आणल्या आहेत. पृथ्वीमध्यें अतीशय मोठें व निराश्रित अशा मुलांचें कुटुंब आह्मांस प्राप्त झालें आहे व त्याची काळजी पाहून कधींकधीं त्यास अन्न आह्मास पुरवावें लागतें * * * असें मोठें कुटुंब असण्यांत प्रतिष्ठा आहे व कांहीं अंशीं सुखही आहे, व परंतु त्या सोबत अडचणीही आहेत. या लोकांचीं धर्ममतें व जातिसंबंधी त्यांचे नियम व अभिमान किंवा त्याच्या जमीनीची वाटणीं व सत्ता यांमध्यें आमच्यानें एकदम फेरफार करवत नाहीं; परंतु हल्लीं पांचलक्ष लोक मेले आहेत त्या प्रमाणें एकजण मेला असतां ही त्याचा मृत्यु आमच्या अज्ञानामुळें, चुकीमुळें अथवा हयगयींमुळें घडला नाहीं असें दाखविणें हें आमचें कर्तव्य आहे." सु. प.

---


## विक्रीस तयार.
## नवीन मुदतीचा कायदा.

सन १८७७ चा आक्ट १५ वा.

( मराठींत )

मुंबईत नेटिव ओपिनियन छापखान्यांत सुंदर टाइपानें छापून विक्रीस तयार आहे. किंमत ८६ व टपालहाशील वगैरे ८२. पैसे सदर छापखान्यांत पाठविले असतां पुस्तकें तावडतोब रवाना होतील.

---

## जाहिरात.
## नवा दिवाणी कायदा.
## किंमत कमी केली आहे!!

मुदतीचा, रजिस्टरचा व विशेष न्यायाचा यासुद्धां अरुणोदयांत छापलेला.

पांच प्रतीपर्यंत घेणारांस दरप्रतीस डाकेसह ३॥रु.प्र. दहा प्रती घेणारांस ३ रु. प्रमाणें.

२५ प्रती घेणारांस २॥ रु. प्रमाणें.

५० प्रती घेणारांस २ रु. प्रमाणें व

१०० प्रती घेणारांस डाकेसह १॥ प्रमाणें किंमत अरुणोदयांत पाठविल्यास बुकें लागलींच रवाना होतील; पण हे दर प्रती खपतपर्यंत कायम रहातील.


---

हें पत्र अकोला एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ११ अकोला, रविवार ता० २८ माहे अक्टोबर सन १८७७ इ० अंक ४३

## वऱ्हाडसमाचाराची किंमत

| | रुपये |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ६ |
| सालअखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डाकहाशील | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊ इच्छिणार लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी म्हणजे पत्र सुरू केले जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, १० ओळीचे आंत | १ |
| १० ओळीपुढे दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## जाहिराती.

### नादारी प्रकरणीं नियम.

(वऱ्हाडाकरितां नवीन तयार झालेले.)

मे० जुडिशियल कमिशनर साहेब मुलूख अमानी हैदराबाद यांणीं नादारी संबंधी मागील नियमांत फेरफार करून नुकतेंच एक पुस्तक छापून प्रसिध्द केलें. त्याच्या कांहीं प्रति विक्रीसाठीं आह्माकडे तयार आहेत. किंमत आठ आणे पडेल. बाहेर गावचे घेणारास एक आणा डाक हाशील पडेल.

वऱ्हाडसमाचाराचे
मालक.

## विक्रीस तयार.

### नवीन मुदतीचा कायदा.

सन १८७७ चा आक्ट १९ वा.

( मराठींत )

मुंबईत नेटिव ओपिनियन छापखान्यांत सुंदर टाइपानें छापून विक्रीस तयार आहे. किंमत ०६ व टपालहाशील वगैरे ०२. पैसे सदर छापखान्यांत पाठविले असतां पुस्तकें तावडतोब रवाना होतील.

## जाहिरात.

### किंमत कमी केली आहे!!

मुदतीचा, रजिस्टरचा व विशेष न्यायाचा यासुद्धां अरुणोदयांत छापलेला.

पांच प्रतींपर्यंत घेणारांस दरप्रतीस डाकेसह ३॥रु.प्र. दहा प्रती घेणारांस ३ रु. प्रमाणें.

२५ प्रती घेणारांस २॥ रु. प्रमाणें.

५० प्रती घेणारास २ रु. प्रमाणें व १०० प्रती घेणारास डाकेसह १॥ प्रमाणें किंमत अरुणोदयांत पाठविल्यास बुकें लागलींच रवाना होतील; पण हे दर प्रती खपतपर्यंत कायम रहातील.

## जाहिरखबर.

### कर्जाऊ रकमा देण्याबद्दल.

आह्मी सर्वांस कळवितों कीं कांहीं कारणानें कांहीं दिवस बंद पडलेला आमचा व्यापार आह्मी विजयादशमीपासून पुन्हा सुरू केला आहे. तर कारकून लोक, साधारण नोकर लोक, शिपाई लोक व ओळखीचे असे कुणबी व इतर लोक यांस शेकडा दीड रुपयापासून दोन रुपयेपर्यंत व्याजाच्या दरानें त्यांची त्यांची लायकी पाहून दहा, वीस, पन्नासपर्यंत रुपये थोडे थोडे मुदतीपर्यंत कर्जाऊ देण्याचें काम त्यांस गरज लागेल तस तसें आह्मी करीत जाऊ. मनोती, बट्टा वगैरे कांहीं कापलें जाणार नाहीं व हप्तेबंदीच्या वसुलाप्रमाणें कटमितीचें व्याज आकारलें जाईल. तर ज्यांची इच्छा असेल त्यांनीं खालीं सही करणारास सदहू बाबदींत भेटून विचारावे. ता० १६ अक्टोबर सन १८७७ इसवी.

नारायण मोरेश्वर.

पत्ता— वऱ्हाडसमाचार छापखाना.

## नवीन मुदतीचा कायदा

( सन १८७७ चा आक्ट १९ )

उपयुक्त समजुतीच्या टीपासुद्धां सदहू आक्ट तारीख २० माहे अक्टोबर सन १८७७ इसवीपर्यंत छापून तयार होईल. त्याची किंमत रुपये ०४ आणे व टपालखर्च ०२ आणे पडेल.

पुणें पेठ शनिवार
न्यायाश्रय आफीस
ता० ३।१०।७७

त्रिंबकराव नारायण
राजमाचीकर

## नोटिस

लक्ष्मणजी वल्लद न्याहानी लांडे रहाणार सांगळुद बुदरूख तालुके अकोले यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुह्माकडे खातेबाकीवरून २६२०७०६ दोनशें बासष्ट रुपये सात आणे सहा पै व शिवाय व्याज येणें असून तुह्मी अद्याप पर्यंत दिलें नाहीं व तुह्माला पुष्कळ वेळा मागितले असतां देऊ देऊ ह्मणता तर आतां ही नोटिस पोचल्यापासून १५ दिवसांत आमचे रुपयाचा निकाल करावा नाहीं तर आह्मी तुह्मावर दिवाणींत दावा करून सर्व रुपये भरून घेऊ व या नोटिसीस जो खर्च झाला आहे तो घेतला जाईल. कळावें तारीख २२ अक्टोबर सन १८७७ इ०

( सही ) कृष्णाजी वल्लद गंभीरजी
काकड दस्तुर खुद

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस:—

वि, वि. आपल्या तारीख १६ सप्तंबर १८७७चे अंकांत "एक फिरस्ता" या सहीचें पत्र छापिलें आहे त्यांत एक गृहस्थ आणि दुकानदार यांचा संवाद आहे तो वाचून फार आश्चर्य वाटलें. त्या संबंधी चार ओळी खालीं लिहिल्या आहेत त्या येत्या अंकीं आपण कृपा करून छापाल अशी आशा आहे.

फिरस्त्याचे लिहिण्याचे झोंकावरून तो व गृहस्थ भिन्न व्यक्ती नसाव्यात आणि सादिलाबद्दल "एक रुपया मिळतो;" हलक्या पगाराचे तर कुत्रा हाल खाईनासें झालें आहे;" ही गोष्ट दहा रुपयांचे आंतील नोकरांची झाली;" "इत्यादि वाक्यांवरून तो गृहस्थ मास्तर असावा असें अनुमान होतें इतकेंच नाहीं परंतु त्याची नेमणूक नुक्तीच झाली असून तो दहा अकरा रुपये दरमहाचा असावा असें खचीत वाटतें. आपल्या अधिकाऱ्याविरुद्ध मास्तर लोकांनीं इतकी मोकळीक घेणें हें वाजवीपेक्षां फाजील आहे याचा ते अधिकारी विचार करतीलच.

सादिलाचे बाबदींत या गृहस्याचे [ मास्तराचे ] विचार फार चमत्कारीक दिसतात. सवड सापडेल तर सादिलाचा पैसा आपल्या खानगी उपयोगाकडे लावण्यास हा गृहस्त मागें पुढें पहात नसेल यांत संशय नाहीं हें "त्यांतील एक कवडी ह्मणाल तर दातावर हणायाला उरत नाहीं" यावरून स्पष्ट दिसतें. कित्येक मास्तर सादिल कशा रीतीनें खर्च करितात. याची बारकाईनें चौकशी केली असतां "झाडसारवणास दरमहा आठ दहा आणे लागतात. शिवाय कागद शाई दऊत लेखण्या वगैरेस दोन तीन आणे जातात आणि बाकीच्या दोन तीन आण्यांत खडू सुई दोरा, किरकोळ मोडतोड, केरसुण्या व कूलपकिल्ली वगैरे जिन्नस. शिवाय अंदरकी राम जानें." इत्यादि लिहिण्यांत कितपत् खरेंपणा आहे हें त्यांतील मर्मज्ञांस सहज समजेल. हलक्या प्रतीच्या शाळांस झाड सारवणाबद्दल दरमहा सात आठआण्याचा खर्च असेल परतु कागद शाईकरितां दोन तीन आणे लागतात हें ह्मणणें खरेंपणापासून अगदी दूर आहे. मास्तरांस लिहिण्याचें काम किती पडतें व दरमहा त्यांचे रिपोर्ट डे० ए० इ० यांजकडे किती येतात याबद्दल विचार केला तर दोन पैशांचे फ्रेंच कागदांत त्यांचे कार्य होत असेल यांत संशय नाहीं. डे० ए० इ० यांस सरकारांतून वर्षाची जी स्टेशनरी मिळते त्यांपैकीं शाई लेखण्यांची किंमत केली तर दरमहा दोन तीन आण्यांचा त्यांचा खर्च असेल, असें असून मास्तरांस तितकाच खर्च कां लागावा हें समजत नाहीं. कित्येक शाळेंत खडूची व फळ्याची महिनोगणती गांठ पडत नसेल. सुई दोऱ्याचा उपयोग होण्यासारखी मोठमोठी प्रकरणें चालत नाहींत ( मास्तरांचे कपडे शिवण्यास असेल तर कोण जाणे) कुलूप किल्लीचा दरमहा खर्च असण्यासारख्या दरमहा शाळेंत नवीन कोठड्या होत नाहींत. शिवाय "अंदर की राम- जानें" या लिहिण्यांत तसें काहीं सादिलाबद्दल एक रुपया सर्व खर्च होऊन मास्तरांस आपल्या पदरचे जास्त खर्च करावे लागतें. हीं त्यांवर केवढी धोंड! कां एडिटर महाराज, या गृहस्थाचे लिहिण्यांत किती तथ्यांश आहे याचा आपणच निर्णय करावा. सादिलाचे खर्चांतून बचत रहात नाहीं एवढेंच नाहीं परंतु थोडाबहुत आपल्या पदराला खार लावावा लागतो याशीं व "सरकार आह्मास एक रुपया देतें त्यांतून हरमहा दोन चार आणे कापून घेतील किंवा आह्मास राखण्यास सांगतील तर हरकत नाहीं' या लिहिण्याशीं कसा मेळ घालावा हें समजत नाहीं. यावरून दरमहा चार पांच आण्याची सवड सापडते हें उघड आहे व ते सादिलांतून कांपिले असतां मास्तरांची हरकत नाहीं हेंही दिसतें.

गृहस्थाचें ह्मणणें की, "शाळेकरितां कांहीं बुकें लागतात तीं आह्मी एथें कशीं तरी थोडे बहुतानें करून घेत होतों तीं आतां सरकारांतून ह्मटलें ह्मणजे पैशाचे ठिकाणीं दीड पैसा पडेल. हें असो पण आज एकदम चार रुपये कोठून आणावे? सर्वांस माहित असेल कीं कोणतीही वस्तु खेडे गावांत तयार करविली असतां तीस शहरच्या किमतीपेक्षां दीडपट दुप्पट किंमत पडते. इतकेंच नाहीं तर शहरांत जसें सफाईचें काम होतें तसें खेडे गावांत होणार नाहीं. गृहस्थाचे ह्मणण्याप्रमाणें सरकार इतकें मूर्ख व अविचारी नाहीं कीं पैशाचे ठिकाणीं दीड पैसा खर्च करील. सरकार खजिन्यांत पैसा इतका ओतूं आला नाहीं. हरएक कामांत सरकारची किती काटकसर आहे हें जगविख्यात आहे.

फिरस्ता ह्मणतो कीं. सरकारी कामासाठीं खासगी पैशांतून एकदम चार रुपये देण्याविषयीं हुकूम आला आहे. या बाबदींत मला जी माहिती मिळाली आहे त्यावरून कळतें कीं, खासगी पैशांतून चार रुपये देण्याविषयीं हुलींच हुकूम नाहीं. मास्तर लोकांचें सरकारी कागद

पत्र नीट व्यवस्थेनें रहावें व सर्व जिल्ह्यांत सारखी व्यवस्था असावी याकरितां सादिलाचे पैशांतून चार चार रुपये घ्यावे असा हुकूम आहे. या चार रुपयांत चार फाइलाच्या जोड्या व एक बारनिशी बुक असें दिलें जाईल. अशी व्यवस्था वऱ्हाडांतील आणखी एक दोन जिल्ह्यांत पूर्वीच झाली आहे. याप्रमाणें आतां ही एका जिल्ह्यांत झाली यांत मोठी अडचण ती कोणती ? जसा डे० ए० इ० यांस सादिलाबद्दल वर्षाचे आरंभीं पर्मनेंट अडव्हान्स (अगाऊ पैसा) मिळतो तसा मास्तरास मिळत नाहीं. महिना झाला ह्मणजे पगाराचे बरोबर सादील मिळतें. परंतु महिन्यांत जो सादिलाबद्दल खर्च होईल तो आपले पदरच्या पैशांतून अगोदर करावा लागतो अशी सर्वत्र वहिवाट आहे हें फिरस्त्यास किंवा गृहस्थास माहित नाहीं असें वाटतें. नाहीं तर खासगी पैशांतून चार रुपये देण्याची "मोठी अडचण पडली आहे" "हा कवढा अन्याय" वगैरे फिरस्ता लिहितांना आमचे राव बहादुर डायरेक्टर होण्यापूर्वी शाळाखात्यांत 'बिरार एज्युकेशनल रेकॉर्ड' ह्मणून शाळापत्रक नियत असे त्याचा खर्च भागण्यापूर्वी सरकारांतून मदत नसे ह्मणून तेव्हांच्या डायरेक्टर साहेबांनीं असा हुकूम फर्माविला होता कीं हाय स्कूलचे हेड मास्तर, डे० ए० इन्स्पेक्टर व मिडल क्लास स्कूलचे मास्तर यांणीं आपापल्या सादिलांतून दरमहा कोणीं आठ आणे कोणी एक रुपया असे देत जावेत. तो क्रम बरेच दिवस चालला. हा डायरेक्टर साहेबांनीं "अन्याय" केला होता कीं, काय ? किंवा त्यावेळेस "कोणी सदय अधिकारी" विचार करण्यास नव्हते कीं काय ? आतां जसा मास्तरांनीं फिरस्त्याचे मार्फत आपल्यावर आलेली पैशाची धोंड काढून टाकण्याविषयीं प्रयत्न केला आहे तसा करणार त्या वेळेस मास्तर नव्हते कीं काय ? पुष्कळ होते परंतु अशा रुपयांचे मात्र नव्हते. कित्येक गोष्टी अशा आहेत कीं त्यांत हाताखालच्या लोकांस थोडीशी अडचण झाली तरी खात्याची एकंदर सुव्यवस्था करण्याकरितां त्या कराव्या लागतात. वर्तमानपत्रांतून ओरडलें ह्मणजे वरिष्ठ अधिकाऱ्याचे कानावर गोष्ट जाऊन त्याचा बंदोबस्त होईल अशा हेतूनें फिरस्त्यानें आपले तोंडाची व हाताची गाठ घातली असावी. परंतु आमचे राव बहादूर साहेब फार विचारी आहेत. ते न्यायदृष्टीनें या बाबतींत दूरवर विचार करतील अशी माझी पक्की खात्री आहे. चार रुपये हा खर्च फाजील आहे असे कदाचित ते ह्मणतील. परंतु सरकारी कागदपत्र नीट व्यवस्थेनें रहाण्याकरितां फाइलाच्या जोड्या देणें ही घाणेरी-व्यवस्था आहे असें ते कदापि ह्मणणार नाहींत यांत संशय नाहीं.

फिरस्ता ह्मणतो कीं "मास्तर लोकांची सध्याची तुमच्या एथील स्थिति पाहून मला फार करुणा यते." कां एडिटर महाराज, आपण सुज्ञ आहाच. तेव्हां आपल्यास जास्त लिहिणें नको. मास्तर लोकांची हल्लीची स्थिति वाईट आहे काय? अलीकडे या खात्यांत इतका बंदोबस्त चालला आहे, अधिकारी लोक आपले कामांत इतके दक्ष आहेत व लोक आपापलीं मुलें इतक्या उत्सुकतेनें शाळेंत पाठवितात व पैशाची मदत इतकी करतात कीं, मास्तरांस पहिल्यासारख्या आतां अडचणी फार थोड्या असतील, व एकंदरीत त्यांचा पहिल्यापेक्षां फार चांगली स्थिति आहे हें सर्व कबूल करतील. मात्र आतां कोणास बढतीची फारशी आशा राहिली नाहीं हें पाहून काय तें दुःख वाटतें.

तारीख २२ सप्तंबरच्या उर्दू अखबारांतहीं राव बहादुरांचे स्तुतिपर व मास्तर लोकांस झालेल्या सर्क्युलरापासून त्यांस त्रास होत आहे अशा मतलबाच्या चार ओळी छापण्याची कृपा केली आहे. पण सर्द्हू सर्क्युलर काय आहे, त्यांत व्यवस्था काय केली आहे, व तसें करण्याचा हेतु काय याविषयीं कांहींएक विचार न करितां त्यांणीं असें मत दिलें आहे हें पाहून मोठें आश्चर्य वाटतें! फार काय लिहावें लोभ करावा ही विनंती. तारीख १६ आक्टोबर सन १८७७ इसवी.

आपला एक सत्यवादी.

---

# वऱ्हाडसमाचार

---

मिति आश्विन वद्य ७ शके १७९९

## मध्य हिंदुस्थानांतील पिका पाण्याचा आहवाल

आजपर्यंत मध्य हिंदुस्थानांत २०।२१ इंच पाऊस पडला. वर्षास पाऊस पडण्याचे सरासरी मान तिकडे ३९ पासून ४० इंचाचें आहे. पण गेल्या सालीं आज मितीपावेतोंच ५० इंच पाऊस होऊन गेला होता. या वर्षी जरी पाऊस थोडा पडला तरी जवारीचें पीक हमेशा प्रमाणेंच आहे. व तें चांगलें हातास येईल असा सर्व लोकांचा समज आहे. जोंधळ्या बरोबरचीं तूर वगैरे दुसरीं धान्येंही बरीं दिसताहेत. त्यांत कापूस तर विशेष चांगला दिसत आहे. अर्ध्या जुलै पासून आगष्टच २४ वे तारखे पर्यंत तिकडे पाऊस अगदीं पडला नाहीं पण त्या सवा महिन्यांत देव अतिशय पडलें व त्यानेच बहुतक सर्व धान्याचा बचाव केला यांत संशय नाहीं. पाऊसही जो कांहीं पडत गेला तो ऐन वक्तावर पडत गेला. ह्मणजे असा:— अर्ध्या जूनपासून अर्ध्या जुलै पावेतों १० इंच पाऊस पडला त्याच्या योगानें सर्वत्र पेरण्या झाल्या. पुढें तारीख २४ आगष्टपासून ता. ३ सप्तंबर पावेतों ८ इंच पाऊस पडला. त्या योगें करून डबघाईस आलेलीं पिकें सावरलीं. पुढें ता. ३ सप्तंबरपासून ता. ४ अक्टोबर पर्यंत पाऊस नव्हता तरी दिवसा आकाश मेघांनीं आच्छादित असे व रात्रीं पुष्कळ दहिवर पडे तेणें करून पिकास मोठा फायदा झाला. आणि ४ थे तारखेपासून १० वे तारखेपावेतों पावसाची बुरबुर येत होती तीही पिकास पोषक झाली. जवारीचीं शेतें कणसाला आलीं आहेत व तेणेंकरून लोक मोठे उमेदींत आहेत. रब्बी विषयीं मोठा त्यांस धाक वाटतो. त्या पिकाला पुरेसा पाऊस पडला नाहीं. तरी अजून जमीनींतील ओल कांहीं सरली नाहीं. सकाळचे प्रहरीं नांगरटींतून चाललें तर जोड्यास बरीच ओली माती लागते. डिसेंबर महिन्यांत इकडे एक दोन चांगले पाऊस पडत असतात व जानेवारी फेब्रुवारी आणि मार्च महिन्यांतही थोडा थोडा पाऊस इकडे दरसाल पडत असतो त्याप्रमाणें यंदाही पडेल असा लोकांस भरवसा आहे. आतां लोकांस मुख्य अडचण पडणार आहे ती काय तो पिण्याच्या पाण्याची. या भागांत तलाव पुष्कळ आहेत व कित्येक तलाव फार मोठे व खोलही आहेत त्यांत बारमहा पाणी विपुल असतें. व बाकी कांहीं आहेत ते उथळ आहेत व त्यांतून आफूला पाणी दिल्यानें ते मार्च किंवा एप्रिल महिन्यांत कोरडे होतात पण या वर्षाची गोष्ट विलक्षण आहे. सद्हू उथळ तलाव आतांच कोरड असल्यासारखे आहेत. व विहिरींच्या पाण्यावर लोकांचा निर्वाह तूर्त चालू आहे. मोठमोठाले तलाव जे आहेत त्यांतील पाणी आतांच चैत्र वैशाखप्रमाणें खोल गेलेलें दिसतें. तेव्हां या वर्षी आफूची लागवड पुष्कळ होण्याविषयीं संशय दिसतो. बारीक सारीक नद्या व ओढे नाले यांनीं गेल्या सालीं व यंदाच्या मार्च्य एप्रिल महिन्यांत बहुत ठिकाणीं पांच सात फूट पाणी होतें तेथें आतां प्रवाह बंद होऊन डबक्यांतून थोडथोडें पाणी राहिलें आहे. वाहातें स्वच्छ पाणी पिण्याला मिळण्याची पंचाईत झाली आहे. गुरांना विहिरीचें पाणी काढून लोक पाजूं लागले आहेत. शिवाय अंघोळी करण्याची व धुणें धुण्याची आणि तेथीलच पाणी पिण्याची लोकांची इकडील वहिवाट आहे आणि या वर्षी पाण्याचें असें दुर्भिक्ष्य आहे त्यामुळें दुखणीं या वर्षी जास्ती वाढतील असें वाटतें. जेथें युरोपियन लोकांची वस्ती असते तेथें नेटिव लोकांस अशी पिण्याच्या पाण्याच्या जागीं अंघोळीची व धुण्याची मोकळीक नसते. पण इतर ठिकाणीं ते स्वैरपणें पाण्याचा गैरशिस्त उपयोग करितात. इतर ठिकाणीं पाण्याच्या बंदोबस्ता करितां पोलिस ठेविले तर होण्याजोगें आहे पण तेच लोक पाणी खराब करतात. तेव्हां याची नीट व्यवस्था लागणें कठीण आहे. आणि येत्या उन्हाळ्यांत पाण्याचा विशेष खडखडाट होईल तेव्हां उत्तम बंदोबस्त गावोगाव ठेवणें फार अवश्य आहे.

---

## मुंबईची म्युनिसिप्यालिटी

म्युनिसिप्यालिटी ह्मणजे शहर सफाईच्या देखरेखीची मंडळी टी याचा खरा अर्थ इतकाच आहे कीं स्वच्छतेकरितां, रोगनिवारणाकरितां, व लोकांच्या सोयीकरितां कामें करावीं व त्यांकरितां जो पैसा लागेल तो तेथीलच लोकांवर कर बसवून वसूल करावा. हा प्रकार इंग्लिश राज्यांत सुरूं झालेला आहे. व त्याचा उद्देश असा आहे कीं, लोकांनीं आपला आपण राज्यकारभार करण्यास शिकावें. लहानसाम गावांतील म्युनिसिप्यालिट्यांचे प्रकार पोरीच्या बाहुल्याच्या खेळाप्रमाणें आहेत. आणि हें उघड आहे कीं, जेथें जितकी घडामोड तितकाच तेथें पसारा असावयाचा. तालुक्याच्या गावच्या म्युनिसिप्यालिटीचा खटाटोप पांच, चार शें रुपयांत सारा आटपतो. अकोलें आमचा जिल्ह्याचा गाव आहे. तर एथें पांच चार हजार रुपयांची घडामोड होते. याहून अधिक उमरावती, खामगाव हीं शहरें चांगलीं व्यापाराचीं आहेत तर तेथें पांच पंचवीस हजाराची घडामोड होते. याच मानानें मोठ्या शहराचा मोठा कारखाना. व तशा मोठ्या शहरांत म्युनीसिप्यालिटीचें काम करणें ह्मणजे खरोखर राज्यकारभार करावयास शिकणें आहे यांत संशय नाहीं. पण म्युनिसिप्यालिटीच्या खऱ्या अर्थाप्रमाणें हें काम सरकारानें केवळ लोकांवर सोंपविलें आहे असें नाहीं. मुख्य सूत्र सरकारचेच हातीं असतें. ह्मणजे तालुक्याच्या लहानशा गावच्या देखील म्युनिसिप्यालिटीच्या वहिवाटीस तहशिलदार प्रमुख असतो. जिल्ह्याला तर ९।७ सरकारी कामदार असून डिपुटी कमिशनर प्रमुख असतात. मग मुंबई सारख्या सर्व प्रकारें विख्यात शहराच्या म्युनिसिप्यालिटीचा कारभार सरकारानें नुसत्या लोकांवर सोंपविला असेल असें कोणास वाटणार नाहीं. तेथील पैशाचा कारभार पाहिला तर साऱ्या वऱ्हाडच्या मूळ वसूली बेरजेच्या सुमार निम्याहून अधिक येईल. तेथें सुमार अडीच हजार रुपये दरमहा पगाराचा एक कमिशनर आहे. शिवाय इंजिनियर, कंट्रोलर, अकौंटंट वगैरे हजारो रुपये पगाराचे दुसरे कामदार आहेत. तेव्हां मुंबईची म्युनिसिप्यालिटी ह्मणजे एका मोठ्याशा प्रांताचा राज्यकारभारच होय यांत संशय नाहीं.

पुढील सालीं ह्मणजे सन १८७८ इसवींत मुंबईच्या म्युनिसिप्यालिटीला जमा काय येईल व खर्च काय होईल याचा अजमास प्रसिद्ध झालेला आह्मी पाहिला त्या विषयीं तपशीलवार लिहिण्यास आमचे पत्र संकुचित आहे सबब वाचकांस कांहीं कल्पना व्हावी ह्मणून जमा खर्चाचे मुख्तसर आकडे देतो.

| जमा | रु. |
| --- | --- |
| घर पट्टी | ५४५५०० |
| दिवापट्टी | २१६२०० |
| पोलिसपट्टी | २१६२०० |
| सरकारीमदत पोलिसासाठीं | ९०००० |
| गाड्यापट्टी | २३६५०० |
| दारूचे लायसेन्स | १६३००० |
| गाड्याचे बिल्ले | २००० |
| तंबाकूपट्टी | १४७५०० |
| टौनडयूटी | ५६२००० |
| पेनशनफंड | ८००० |
| विमा | १७००० |
| हलालखोरपट्टी | ५२१५०० |

| | |
|---|---|
| पाणीपट्टी | ३२५००० |
| बाजारपट्टी | २१५४०० |
| किरकोळ दंड | ७००० |
| किरकोळ जमा | ४१३०० |
| किरकोळ फी | १३००० |
| किरकोळ बचत | ४३०० |
| बगीच्या | १२१०० |
| त्रामवेभाडें | १७००० |
| | ३०७०५०० |

याप्रमाणें मुंबईच्या म्युनिसिपालिटीस सुमार पावणेंएकतीस लक्ष रुपयांचें उत्पन्न लावे. त्याचप्रमाणे खर्चही ३०६७२३५ रुपये आहे. व चालू सालची शिलक ३४२००० रुपये आहे.

---

**पुस्तकाची पोंच**– ( Easy Interpreter इझी इंटरप्रिटर अथवा सुलभअर्थप्रकाशक या नावाचें एक नवीन इंग्लिश पुस्तक मि० सोराबजी बमनजी पेस्तमजी मास्तर मुंबईच्या प्रोप्रायटरी स्कुलावरील शिक्षक यानीं तयार केलें आहे. त्याची एक प्रत त्यांचे आकोले येथील एजंट मि० के कावस एम टाटा करन्सी आफीसाकडील हेडक्लार्क यानीं आम्हांस नजर पाठविली ती आदरपूर्वक स्वीकारून आह्मी त्यांचे आभार मानितों. या पुस्तकांत इंग्लिश भाषेंतील इडियम्स (भाषणसंप्रदाय)एक्सप्रेशन्स (शद्बप्रयोग) फ्रेजेस [ह्मणी] इत्यादिक अक्षरानुक्रमानें लिहून त्यांचा इंग्लिश भाषेंत विस्तारयुक्त अर्थानें चांगला खुलासा केला आहे. हें पुस्तक तयार करण्यास मि० सोराबजी यांस फार श्रम करावे लागले असतील यांत संशय नाहीं. त्यांनीं प्रस्तावनेंत लिहिलें आहे कीं, जेव्हां जेव्हां फुरसतीच्या वेळीं मी वाचावमास बसे तेन्हां तेव्हां त्यांत ज्या इडियम्स, फ्रेजेस वगैरे मला आढळत त्या वेगळया लिहून घेण्याकरितां कागद आणि पेन्सिल जवळ बाळगित असे व आढळलेल्या इडियम्स वगैरेचा जान्सन, वेबस्टर, रिचर्डसन वगैरेच्या कोशांत व अन्यत्र सापडेल तेथें खुलाशाचा अर्थ शोधून काढून टिपून ठेवित असे. असा कियेक वर्षें त्यांचा क्रम चालून पुष्कळ संग्रह जमला असें त्यांच्या मित्रांनीं पाहिलें तेव्हां अक्षरानुक्रमानें तो एका जागीं करून बहुतांचे उपयोगाकरितां छापून काढावा अशी त्यांस सला दिली. व त्यावरून त्यांनीं मोठ्या दक्षतेनें हें पुस्तक छापून तयार केलें. हें इंग्लिश विद्यार्थ्यांस व शिकून तयार झालेल्या इतर गृहस्थांसही इंग्लिश भाषेंतील गूढ प्रयोगाचें चांगलें मर्म समजण्यास अति उपयोगी असून संग्रहास अवश्यक असें आहे. व नामांकित अशा टाइम्स आफ इंडिया आणि बांबे ग्याझेट या पत्रांच्या कर्त्यानीं हीं सदर्हू पुस्तकाच्या उपयोगाविषयीं फार उत्तम मत दिलें आहे व ग्रंथकाराची वाखाणणी केली आहे; त्यावरूनही आमच्या वाचकांस सदर्हू पुस्तकाची योग्यता कळून येईल.

आमच्या वऱ्हाडांतही इंग्लिश शिकणारे विद्यार्थी, तयार झालेले मास्तर, आणि इतर बहुत गृहस्थ शद्बकोशाप्रमाणें Referance Book ह्मणून या पुस्तकाचा अवश्य संग्रह करितील असें आह्मी इंच्छितों.

सदर्हू पुस्तक आमचेकडे किंवा अकोले करन्सी आफीसचे हेड क्लार्क मि० के कावस एम टाटा यांजकडे विकत मिळेल. किंमत १ रुपया १० आणे

---

## वऱ्हाड.

पाऊस अगदी गेला. थंडी चांगली पडुन हवा रमणीय झाली आहे. इकडे जों धळपाचे पिकास शेवटा शेवटास एक पाऊस कमी झाल्यामुळें कित्येक ठिकाणीं वांडी झाली. हें नुकसान पाहून आह्मांस वाईट वाटतें.

मि० जोन्स साहेब कमिशनर इलिचपुराकडे या आठवड्यांत जाणार होते.

मि० अबदुल हक्क साहेब एकस्ट्रा असिस्टंट कमिशनर वाशीम यांस ५००० रुपयेपर्यंत दिवाणी व फर्स्ट क्लासचा माजिस्त्रेटी अधिकार मिळाला.

रा. रा. परशराम सखाराम ट्रेनिंगकालेजाचे प्रिन्सिपाल यांची प्रकृती अस्वस्थ असल्यामुळें त्यानी २ महिन्यांची आजारीपणाची रजा घेतली.

अकोला हाय स्कुलांतून ७ विद्यार्थी म्याट्रिक्युलेशनचे परीक्षेस गेले होते त्यांतून इंग्रजी विषयांत ३ पास झाले.

---

## नोटिसा.

खेडसीदास शिवलाल साहू दुकान खामगाव यास नोटिस देतों ऐसाजे मौजे मजकूर येथील शेतें च्यार त्यांत कांहीं हिशे आहे तीं शेतें नारायण रायमोलजी याची तुह्मी खरेदी घेतलेली आह्मास सुरूसन १२८६ पासून पांच वर्षे वाहण्यास देण्याचे करारानें कबूल केलें व त्याजबदल सारा आह्मी देऊन तुह्मास उक्त नफ्याचे १०० रुपये देणें ठरलें त्याप्रमाणें सदरील शेते गुदस्त सालों आमचे ताब्यात देणे असून तुह्मी दिली नाहीं व नारायण पाटील शेते वाहू देण्यास हरकत करू लागला तुह्मास पुष्कळ वेळ शेते ताब्यात मागितलीं असता देतो ह्मणून आजपावेतो दिलीं नाहीं शेतें नारायण पाटील वाहतो सबब आता मजकडे तुमचे शेतें वाहण्याचे संबंधानें नफ्याचे रुपयाची कांहीं एक जबाबदारी नाहीं तुह्मास कळावे शेतें माझे ताब्यात न दिल्यामुळें उलटें माझें नुकसान झाले आहे कळावें तारीख २७ माहे आक्टोबर सन १८७७ इसवी.

( सही ) मारुती वल्लद भिवसेन पाटील रहाणार महागाव ता० बाळापुर याचे हातची निशाणी खुद्द असे.

---

नोटिस.

सोनाबाई जवजे विठ्ठलगीर व खुशालगीर वल्लद विठ्ठलगीर गोसावी रहाणार दोनवडें यास खालीं सही करणार याजकडून देण्यांत येते कीं तुह्मी तारीख २१ माहे आक्टोबर १८७७ चे वऱ्हाडसमाचार पत्रांत नोटिस दिली त्याचा जवाब देण्याचें कारण नव्हतें पण त्यांत कांहीं गोष्टीची नवीनच रचना जगप्रसिध्धीस आणली यामुळें जवाब देणें भाग पडलें यास्तव असें कळविलें जातें कीं तुह्मी अज्ञान भागीरथी इचें पालन करणार नसोन तिचा पालन करण्याचा हक्क तुम्हास नाहीं. आजवर तिचें पालन तिची सासू लक्ष्मीबाई ही करीत असून भागिरथी सज्ञान होईपर्यंत करण्याचा अधिकार तीसच आहे व तिजला असलेल्या अधिकाराचा योग्य उपयोग ती करीत आहे. ही गोष्ट जगजाहीरच आहे. इतक्यावरच समाधान नाहीं. तर न्यायाचे कोर्टापर्यंत लेखी दाखल्यानिशीं महशूर आहे. सोनाबाई इनें आपले मुलीस माहेरीं भेटण्याकरितां या आठवड्यांत नलें इतक्याच आधारावर उभयता पालन करणार या सहीच्या दिलेल्या नोटिशीचा केवळ जें कायदेशीर काम करण्याचा आम्हास व आमचे तर्फे करणारास जो अधिकार आहे तें करण्याचें वर्ज्य करावें अशी भीति पडावी इतकाच अर्थ दिसतो.

दुसरी सूचना गोविंदगीर याणीं पैशाची खराबी केली व सासूचे लोभामुळें बक्षीस व मुख्त्यारपत्र वगैरे मजकुराचा दस्तैवज करून घेतला तो कपटाचा आहे. आणि आमचे नावें असलेलें मुख्त्यारपत्र रद्द केलें. व आठ दिवसांचे आंत बोरगाव व सांगळूद या दुकानांचा हिशेब समजून दावा ह्मणून नोटिस केली त्याचे उत्तर असे आहे कीं आह्मी पैशाची खराबी केली किंवा करीत नसोन हिताकडे लक्ष्य पुरवीत आहो. याचा तुह्मास अनुभव आला नाहीं काय? झालेला दस्तैवज कायदेशीर असून कपटाचा नाहीं व लक्षुबाई ईस अधिकार असल्याप्रमाणेंच तिनें करून दिला यात तुमची किती गैर समजूत झाली. आमचे नावें असलेले मुख्त्यारपत्र तुह्मास रद्द करण्याचा अधिकार नाहीं प्रथमत: पालन करण्याचा आपला हक्क आहे किंवा आपण आहो असें कोर्ट मार्फत ठरवून घेतलें पाहिजे हें तुह्मास ठाऊक नाहीं काय? तुह्मास या बाबदीत आह्मी कांहीं समजत नाहीं या मुळें हिशेब समजून देण्याची गरज नाहीं मात्र विशेष सूचना इतकीच करण्यात येते कीं तुह्माकडेस बोरगाव आणि सांगळुद दुकानची बाकी व धान्य वगैरे आहे त्याचा हिशेब मात्र नोटिस पावताच करून फडशा करावा तसें न केल्यास व या नोटिसीचा खर्च आणून न दिल्यास रीतीप्रमाणें तजवीज केली जाईल. कळावें, तारीख २६ माहे अक्टोबर सन १८७७ इसवी.

[ सही ] गोविंदगीर गुरु मयागीर गोसावी दुकान बोरगाव व सांगळुद दस्तुर खुद्द

---

नोटिस

पिरताई मर्द पांडोबा सुतार रहाणार अंजनीखुर्द परगणे मेहेकर जिल्हा बुलढाणा याजला पांडोबा वल्लद संभाजी सुतार रहाणार महागाव परगणे वाकद जिल्हा वाशीम याजकडून देण्यांत येतें कीं, आमची पूर्वीची बायको मयत झाल्यानें तुझ्याशी गंधर्व लाविलेवरून तूं तीन वर्षें माझ्या एथें संसार जनरीतीप्रमाणें केला. नंतर तुझा भाऊ कृष्णाजी याजला कांहीं काम पडल्यामुळें शंभर रुपये कर्ज मागितलें. मी कांहीं दिलें नाहीं कारण पूर्वीं मजपाशी त्यानें रुपये घेऊन दिले नाहीं. सबब तो कांहीं कार्याच्या निमित्यानें तुला घेऊन गेला तेव्हांपासून तुझी मती बिघडली याजबद्दल मी तुला नोटिशीनें वऱ्हाडसमाचारांतून कळविले होते त्याप्रमाणें तूं आली नाहींस नंतर मी व माझा मुलगा बारा वर्षांचा दहा पांच वेळ आणावयास आलो परंतु आली नाहींस हल्लीं तूं नोटिशीनें मजला कळविते कीं, जाचणूक आहे तुझ्याखेरीज माझे घरांत दुसरी स्त्री नाहीं व पुरुषही नाहीं जाळताप होण्याचें कारण नाहीं आपले भावाचे फरेबानें तूं असें कळवीत आहेस भावाचे घरीं जातेंसमयीं तूं आंगावर माझे डागिनें २१० रुपयाचे घेऊन गेलीस त्याबद्दल मी आजपर्यंत बोललो नाहीं तुझें वय चाळीस वर्षांचीं ह्मणजे आर्धे आहे. लोकांचे फरेप ऐकूं नको. आपला संसार येऊन सांभाळ तुझे करितां मी बायको दुसरी केली नाहीं व करणार नाहीं आता या नोटिसीचे तारखेपासून आठ दिवसांत यावे यातच चांगलें आहे अन्न वस्त्र व जेवणाबद्दल पूर्वीं नोटिशींत कळविलेंच आहे ह्मातारपणी बट्टा शोभत नाहीं. कळावें तारीख २४ आक्टोबर सन १८७७ इसवी.

( सही ) पांडोबा यांचे हातची असे.

---

## वर्तमानसार.

व्हाइसराय साहेब सिमल्याहून नोवेंबरचे ५ वे तारखेस निघून लासुरी, देरादून व शारणपुर एथें जाऊन २३ वे तारखेस आग्रयास जातील. ३ दिवस तेथें राहून कानपुरास जातील व २९ वे तारखेस कलकत्यास जातील.

जानेवारीचे पहिले तारखेस कलकत्यास कांहीं पदव्या देण्याचा समारंभ होणार आहे.

ग्लासगो शहराजवळ खाण फुटून २१९ मनुष्यें आंत काम करणारी मरण पावलीं असें वर्तमान आलें आहे.

रशियन लोक कबुल करितात कीं ता २७ सपटंबर पावेतो आमचे ५२००० लोक मरण पावले.

नागपुर इलाख्यांत सन १८७६।७७ सालीं २९१७२७ मनुष्यें जन्मलीं.

ग्वालेर स्टेटरेलवेचें काम झपाट्यानें चाललें आहे.

काश्मिरांत गेळे महिन्याचे १३ वे व १४ वे तारखेस अतिशय बर्फ पडलें. व पाऊसही पडला.

मुंबईच्या म्याट्रिक्युलेशनच्या परीक्षेला १०४९ उमेदवार होते त्यांतून इंग्रजीमध्यें ४१७ पास झाले.

मद्रास इलाख्याकडे आगष्ट महिन्यांत एक लाख मनुष्य मेले.

गोदावरी नदीला साल मजकुरीं पाणी कमी आहे ह्मणून तिच्या पाटानें होणाऱ्या बागाइतास धक्का बसेल असें ह्मणतात.

बंगाल व ब्रह्मदेश एथून मद्रासेकडे दररोज १२०० टनाहून अधिक धान्य नात आहे.

मद्रास दुष्काळ कमिटीच्या पोट कमिट्या व एजंट ६३ आहेत व ते सर्व हल्लीं कामांत गढून गेले आहेत.

कलकत्ता शहरांत २१ लक्ष मण तांदूळ आहेत. व जिमे बाहेर पाठविण्यास हरकत नाहीं असा हिशेब सरकारानें पाहिला आहे.

जी आय पी रेलवेचे ट्राफिक म्यानेजर यांस दिल्ली दरबारचे वेळीं त्याच्या उत्तम व्यवस्थेकरितां बहुमानाचा चांद मिळाला आहे. व विलायत सरकाराकडूनही हल्लीं त्यांस आभार आले आहेत.

बारन डी एच ला पेंट पुण्याचे नजन यांनीं विलायतेस आणखी ४ महिने रजा वाढविली.

मि. फिरोजशा जमशेटजी दमाणी वैद्यकखात्याची परीक्षा देण्याकरितां विलायतेस गेले. जातांना ते एका पाटना नावाच्या आगबोटीवर सरजनचें काम पतकरून गेले.

भूपाळच्या बेगम साहेबांनीं २४ लक्ष रुपये तुर्क लोकांस पाठविण्याकरितां जमविले आहेत.

आग्रा एथें हल्लीं धान्याचा साठा सहा लक्ष मणाचा आहे. ग्वालेरीकडे माल अधिकाधिक जाऊं लागला आहे. व रजपुत संस्थानांतूनही गिऱ्हाईक येऊं लागलें आहे.

बाबू गोविंद चंद्रदत्त यांची कन्या तारूदत्त मरण पावली ती मोठी विद्वुणी होती त्याबद्दल व्हाइसराय साहेबांनीं शोक प्रदर्शक तिच्या बापास पत्र लिहिलें आहे.

अक्टोबरच्या पहिल्या आठवड्यांत कलकत्याहून मद्रासेस दररोज २३६३ टन धान्य रवाना झालें.

नभाचे राजानें आपले मुलखांतून गहू व इतर धान्य बाहेर प्रांतीं जाण्याचें मना केलें.

दिल्लीस गेल्या आठवड्यांत उत्तम पाऊस पडला. आतां दुष्काळाची भीति राहिली नाहीं.

जोकिम ब्रिटो याला २८वे तारखेस वेंगुरल्यास पकडलें तो आजारी आहे.

व्हाईसराय नोवेंबरचे ५वे तारखेस सिमल्याहून निघून डिसेंबरचे ४थे तारखेस कलकत्यास जाणार.

मि. नानाभाई हरीदास मुंबईच्या हायकोर्टांतील सरकारी वकील यांस मि० जस्टिस केंबल साहेब तीन महिन्याच्या रजेवर विलायतेस गेले त्यांचे जागीं आक्टिंग नेमलें असें कळतें.

धुळे एथें शहरचे रस्ते झाडण्यास झाड़लोक नेमले होते; परंतु ते लोक कसूर व हरकत करतात यामुळें तेथील म्युनिसिपाल कमिटीनें कैदी लोकांची रस्ते झाडण्याच्या कामी नेमणूक केली आहे.

इंग्लंडांतील मुख्य व्यापाराचे ठिकाण म्यांचेस्टर एथें नवीन टौनहाल बांधला आहे त्यास सुमारें १ कोट रुपये खर्च लागला असें कळतें. या इमारतीची सुरुवात करण्याकरितां राणी साहेबांस बोलाविलें होतें, पण त्या आल्या नाहींत ह्मणून म्यांचेस्टर ऐथील बिशप यांनीं प्रसिद्धपणें असें बोलून दाखविलें कीं "आह्मी राजधर्मी आहोंत असें दाखविण्याचा आज जरी प्रसंग नाहीं तथापि असा प्रसंग पुढें मागें येणार आहे व असा प्रसंग ज्या दिवशीं येईल त्या दिवशीं आज राणी साहेब एथें आल्या नाहींत याचा पश्चात्ताप होईल" या प्रकारचें भाषण इंग्लंडांत केलें असतां चालतें. परंतु असें कोणी हिंदुस्थानांत लिहिलें अथवा बोललें असतां त्यांस तात्काळ आंडमान बेटांत जावें लागलें असतें.

बाबू निशीकांतमुकरजी यांस राशियामध्यें सेंटपिटर्सबर्ग येथें संस्कृत, हिंदुस्थानी आणि बंगाली या भाषांचे प्रोफेसर नेमलें आहे. सदर्हु गृहस्थ लेप्सिक युनिव्हर्सिटीमध्यें अभ्यास करीत होते.

डाक्तर फ्लेमिंग यांनीं बर्लिन येथील एका पत्रास असें लिहिलें आहे कीं, हातापायाचे सांधे दुखत असल्यास त्या मनुष्यास एका कोटंब्यांत बसवून ज्या ठिकाणचा सांधा दुखत असेल त्या ठिकाणचा सांधा तापलेल्या वाळूंत सुमारें अर्धा तास पर्यंत पुरावा. वाळूचीं उष्णता शंभर अंशांपेक्षां ज्यास्त असूं नये नंतर ती जागा ऊन पाण्यानें धुवावी या प्रमाणें सुमारें वीस वेळ केलें ह्मणजे वायु निघुन सांधा दुखणें राहते. याप्रमाणें उपच्यार सुमारें ४० मनुष्यांस केला असून सर्वांस गुण आला आहे.

गेल्या सात महिन्यांत मुंबई इलाख्यांतून उत्तर प्रांतीं जाणाऱ्या मिठावर जी जकात घेतात त्याचे ७३ लक्ष ६०७ साखरेवर जकात घेतात त्याचे ७ लक्ष उत्पन्न झालें, याच महिन्यांत गतवर्षी मिठाबद्दल सुमारें ६४॥ लक्ष रुपये उत्पन्न झालें होतें. ने. ओ.

---

## हिंदुधर्माचें ग्रहण.

बाबु प्रतापचंद्र मुजुमदार ब्रह्मसमाजाचे उपदेश यांणीं गेल्या ता० १० रोजीं प्रार्थना समाजमंदिरांत हिंदुधर्माचे ग्रहण या विषयावर इंग्रजींत व्याख्यान दिलें त्याचा सारांश. बाबु ह्मणाले कीं, प्रत्येक देशांतील लोकांच्या धर्माचें विशेष स्वरूप असतें असें माझें मत आहे प्रत्येक देशांतील लोकांचे चेहरे, शारीरिक व नीतिसंबंधी तऱ्हा जशा भिन्नभिन्न आहेत तशाच प्रकारें धर्मसंबंधी तत्वें निरनिराळ्या राष्ट्रांत देश कालवर्तमानाप्रमाणें भिन्नभिन्न रूपानें उपलब्ध होतात, इजिपशिपन, ग्रीक, हिब्रु, चिनी वगैरे लोकांची शारीरिक व व्यवहारिक जितकी भिन्नता आहे तितकीच नीति व धर्मसंबंधीं आहे. त्यांच्या पौराणिक भांडारांत धर्माचे असे कांहीं सिद्धांत आढळतात कीं, जे आज आपणास स्पष्ट कळत देखील नाहींत. प्राचीन काळच्या राष्ट्रांनीं ज्यांचे अध्यात्मिक तर्क जे सध्या भाषेंत बोलून दाखविणें कठिण त्यांवर लाक्षणिक कल्पना रचून जीं धर्म पुस्तकें लिहिली त्यासच पुराण ह्मणतात. परंतु अशा अर्थानें प्रत्येक राष्ट्राच्या पुराणांत जें अमुल्य शिक्षण मिळतें त्याचा कोणीच शोध करीत नाहीं. सृष्टीच्या गूढ व अतर्क्य नियमांचा एकाग्र चित्तानें विचार केल्यानें जें शिक्षण प्राप्त होतें तें शुष्क तर्क विषयक ग्रंथापासून मिळणाऱ्या शिक्षणापेक्षां अधिक हिताचें आहे.

या सर्व कारणांवरून हिंदु लोकांचा अगदी प्राचीन काळचा धर्म नीति व अध्यात्मिक संबंधाच्या विषयांनीं पूर्ण भरलेला आहे. हिंदुस्थानावर मूर्तिपूजेचा जो सर्व साधारण आरोप आहे तो आतिशयोक्तीचा व बहुत अंशीं खोटा आहे, परमेश्वराचें एकाकी स्वरूप व आत्मस्वरूप हें बहुत करून सर्व आवंतर देशाच्या अगोदर हिंदुस्थानांत कळलें होतें हिंदूचे पुरातन ऋषि ऐहिकाच्या नैश्वरते विषयीं एकाग्र चिंतन करतांनां ईश्वराच्या अस्थित्वाच्या परम सत्यांत इतके मग्न झाले कीं, त्या ज्ञानाच्या पूर्ण भरतींत जड सृष्टीचा विसर पडून समाधींत परमात्म्याशीं व त्यांच्या सच्चिदानंदांत ते इतके बुडाले कीं, परमात्मा व आपण दोन आहोंत ह्याचा विसर पडला व असल्या समाधींत हिंदुस्थानांतील प्रख्यात अद्वैत मत उपस्थित झालें. हें अद्वैत मत हजारों वर्षे चालू आहे व याचा समूळ नाश करणें दुरापास्त झालें आहे. हें मत दुष्ट आहे; तरी हिंदु धर्माच्या धर्म संस्थापनेचा दोहोंपैकीं एक महत नियम याच मतानें सिद्ध होतो. तो योग ह्मणजे परम वैराग्य आणि आत्म समर्पण सहित परत्म्याचे ठिकाणीं समाधी दृढ करून एकरूप होणें. आणि ख्रिस्तांचें जें एक ह्मणणें कीं "मी आणि माझा बाप एकच आहोंत" त्यांत आणि ह्यांत कांहीं अंतर नाहीं. हेंच सर्व धर्माच्या सुधारणुकेचें बीज, आणि सिद्धी होय: परंतु सर्व लोकांस अशा प्रकारची समाधी व असा सूक्ष्म विचार साधणें कठीण. त्यांच्या साठीं कांहीं तरी अशी वस्तु पाहिजे कीं, जी बुद्धीस सुगम असून जिच्यावर विश्वास व प्रेम करतां येईल. ह्मणून त्यांनीं ईश्वराच्या गुणाच्या व सामर्थ्याच्या पृथक् पृथक् स्वसंकल्पानें मूर्ति काल्पिल्या व याच्या परिणामीं अठरा पुराणें व अनेक अवतार व सर्व प्रकारच्या मूर्तीपूजेच्या प्रसाराची निष्पन्नता झाली. या मूर्तीपूजेचा अवश्य त्याग केला पाहिजे परंतु त्यांत जो भक्तिरस, प्रेमरस आणि अहंकार विसरून जी ईश्वरपूजा आहे तिचा स्वीकार केला पाहिजे. हिंदु धर्माचे दुसरें तत्व जी भक्ति ती येणेंकरून सिद्ध होतें. इकडे दक्षिणेंत विख्यात शंकराच्यार्यांनीं समाधी व योग साधून शिवाची मूर्ति काल्पिली- पूर्वेस चैतन्यानें परम प्रेमभक्तीनें कृष्णमूर्ति काल्पिली. याशिवाय हिंदुस्थानांतील इतर सर्व पंथ व मतें योग आणि भक्ति ह्या दोन सदराखालीं मोडतील, परंतु आलीकडे अपल्या लोकांत धर्म लयास जात आहेसें दिसतें. सु. प.

( पुढें चालू )

### नोटिस.

मोहना मर्द राघोजी लांडे वस्ती झाडेगाव तालुके खामगाव इजला माधोजी वल्लद हरीशिग लांडे याजकडून नोटिस देण्यांत येते कीं तूं १४ वे तारखेच्या वऱ्हाडसमाचारांत मजवर व करकाजी आणि रामजी यांजवर नोटिस दिली ती पाहिली तिचा जबाब येणेंप्रमाणें:—

तूं लिहिलें कीं तुझा नवरा मरून दोन वर्षे झालीं असतां आह्मी तुझ्या अन्नवस्त्राची बिलकूल काळजी केली नाहीं तर ही गोष्ट खोटी आहे. तूं झाडेगावाला गेल्याला ४ महिने झाले तों पावेतों आमचे एथें होतीस व तुला खाण्यापिण्याला कांहीं कमी नव्हतें, शिवाय गेल्या सालीं तूं मागितल्यावरून तिऱ्हाइताचे मार्फतीनें तुला ५० रुपये खर्चावयास दिले त्याचा पुरावा आहे. शिवाय राघोजीला कोणाचें कांहीं देणें नव्हतें हें आह्माला पुरते ठाऊक आहे. व मरतेवेळीं आह्मी त्याला पुसलें होतें. असें असतां आमच्या घरांतली शेती व अमराई दुसऱ्याचे घरांत घालण्याकरितां तूं कर्जाचें फंद केलें आहे यांत कांहीं संशय नाहीं. परंतु तुला कळवितों कीं अशा लबाडीच्या धंद्यानें आमचीं मिराशीचीं ३५ वर्षांचीं शेतें व अमराई आह्मी दुसऱ्याला देऊ असें समजू नको. जरी कदाचित तुझे नवऱ्याला ३५० रुपये कर्ज खरें होतें असें घटकाभर मानिलें तरी ते फेडण्याकरितां तुला शेतें विकण्याचें कारण नव्हतें. तूं ९०० रुपयांची रोकड व दुसरी पुष्कळ जिनगी आमचे घरांतून नेली आहेस. तिच्यांतून तें कर्ज देण्याविषयीं आह्माला विच्यारावयाचें होतें. तसें न करितां हा फंद करून नोटिस दिली असो. आह्मी तुला शेतें विकूं देणार नाहीं व खोटसाळपणाचा तुझा धंदा चालू देणार नाहीं. खरोखर तुझ्या नवऱ्याचें तुला कर्ज असलें तर ते तूं आह्माला कळवून आमची खात्री करून द्यावी. व एथून नेलेली रोकड व जिनगी आणून द्यावी, ह्मणजे आह्मी त्या कर्जाची आदाई करू. व पुढें ही तुझें पोषण करूं. याप्रमाणें न करतां तूं जंवर व अमराई झाडेगावकराच्या नावें करून देशील तर तुला आह्मी देऊ देणार नाहीं. व तुजवर आणि त्याजवर कायदेशीर रीतीनें तजवीज करूं. हें पक्कें समजावें. ही नोटिस पोचल्यापासून ८ दिवसाचे आंत तुझे नवऱ्याला कशा प्रकारचें कोणाचें किती कर्ज होतें तें कळवावें व नेलेल्या जिनगीची काय व्यवस्था आहे त्याविषयीं खात्री लायक कळवावें. नाहीं तर तुझी जंबराची विक्री खोटसाळ आहे व ती आह्मांस बुडविण्याचे इराद्यानें केली आहे. असें समजून फौजदारींत तुजवर फिर्याद केली जाईल. कळावें तारीख २३ अक्टोबर सन १८७७ इसवी.

( सही ) महादाजी वल्लद हरीशिगजी
लांडे वस्ती पारस तालुके
बाळापुर याचे हातची
निशाणी रेघ

---

हें पत्र अकोला एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.